# घटक १
# प्राचीन व मध्ययुगीन परंपरा

**अनुक्रमणिका**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ ग्रीक रोमन इतिहास परंपरा

१.२.२ अरब इतिहास परंपरा

१.२.३ भारतीय : इतिहासपुराणे आणि पर्शियन इतिहास परंपरा

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास खालील माहिती स्पष्ट करता येईल.

१. इतिहासलेखनाच्या विविध परंपरा समजून घेता येतील.

२. प्राचीन ग्रीक रोमन इतिहासलेखनाची परंपरा समजून घेता येईल.

३. मध्ययुगीन अरब इतिहासलेखन परंपरा जाणून घेता येईल.

४. भारतीय इतिहासाची पुराणे व पर्शियन इतिहासलेखन परंपरांची माहिती होईल.

## १.१ प्रास्ताविक :

मानवी जीवनाच्या वाटचालीचा समग्र आलेख म्हणजे इतिहास होय. मानवी जीवनात घडलेल्या सामाजिक, राजकीय, आर्थिक घटना, मानवी प्रयत्न याविषयी स्थळ, काळ व व्यक्ती यांच्या निर्देशांसह जे लेखन केले जाते त्यास इतिहास लेखन असे म्हटले जाते. प्रारंभीच्या कालखंडात राजे-रजवाडे त्यांच्या कुळी, युध्दप्रसंग, पराक्रम यांचा प्रामुख्याने इतिहास लेखनात समावेश होता. नंतरच्या कालखंडात यामध्ये

धर्माचा प्रभाव वाडला. पुराणकथा व दंतकथांचा जास्तीत जास्त समावेश होता. सुरुवातीच्या कालखंडामध्ये इतिहास लेखन हे शिलालेख, भूर्जपत्रे, ताडपत्रे, भाजलेल्या मातीच्या विटा व पपायरसे (ईजिप्तमधील कागद), कातडी ह्यांवर लिहिले गेले. इतिहासलेखनाचा उदय कधी झाला यासंदर्भात अनेक मतप्रवाह दिसून येतात. मात्र इतिहासलेखन प्रथम ग्रीसमध्ये व नंतर रोमन संस्कृतीच्या काळात सुरू झाले. प्राचीन इतिहास लेखनाचे पूर्व क्लासिक युग व क्लासिक (अभिजात) युग अशा दोन भागामध्ये विभागणी केली जाते. पूर्व क्लासिक युग हिराडोटसच्या अगोदर मानले जाते, तर क्लासिक युग हे हिरोडोटस–थ्युसिडाइस यांचे समकालीन मानले जाते. इतिहासलेखनाविषयी माहिती करून घेण्याकरीता इतिहासलेखनाच्या परंपरांचा आढावा घेणे गरजेचे आहे. सदर घटकामध्ये आपण प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक इतिहासलेखनाच्या विविध परंपरांचा आढावा घेणार आहोत.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ प्राचीन ग्रीक, रोमन परंपरा

**अ) ग्रीक इतिहासलेखनाची परंपरा –**

इतिहासकार जे. बी. बेरी यांच्या मते ''ग्रीकांनी इतिहासाची चिकित्सा करून त्याच्या सत्यासत्यतेची मीमांसा केली, म्हणून इतिहासलेखनाची खरी सुरुवात त्यांच्यापासून झाली''. ग्रीकांच्या अगोदर काही प्रमाणात मानवी घटनांची नोंद घेण्याचा प्रयत्न झाला मात्र त्यामध्ये अनेक त्रुटी होत्या. स्मृतीच्या अधारे मौखिक पद्धतीने महत्त्वाच्या घटना जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला गेला. यामध्ये देवदेवतांच्या कथा, मिथके, म्हणी, लोककथा व लोकगीते याचा वापर केला गेला. या काळात सार्वजनिक ठिकाणी लोकांपुढे काव्य, कथाकथन करून त्यांचे मनोरंजन केले जात असे. त्यामुळे या गीतांमध्ये कल्पनाविलास व रंजकता असे.

इ.स. पूर्व सहावे शतक ग्रीस इतिहासामधील संक्रमणाचा कालखंड होता. या काळामध्ये लेखन व गद्यलेखनाची परंपरा विकसित झाली. यामुळे साहित्य, तत्त्वज्ञान व शास्त्रीय ज्ञानामध्ये मोलाची भर पडली. ग्रीकमधील प्राचीन लेखकांनी प्रथम महाकाव्ये लिहिली. त्यात पूर्वजांच्या कर्तृत्वाविषयी पाल्हाळिक व दंतकथात्मक पद्धतीने निरुपण केलेले दिसते. महाकवी 'होमर' याने लिहलेल्या महाकाव्यामुळे जगाला इतिहासाचे पहिले दर्शन घडले. 'इलियड' व 'ओडेशी' ही दोन महाकाव्य लिहून होमरने साहित्यिक जगाला इतिहास व काव्य यांची ओळख करून दिली. इलियडची निर्मिती केल्यानंतर महान व्यक्तींच्या शौर्यकथा शब्दांकीत करण्याची परंपरा सुरू झाली. इ.स.पू. सातव्या शतकांतील रचना पद्यात्मक व पौराणिक होती, परंतु त्यात राजांच्या वंशावळी, त्यांचे पराक्रम ह्यांचे रंजित वर्णन आढळते. ह्या पद्धतीमुळे ढोबळ कालमान मिळू लागले.

- **हिरोडोटस (इ.स. पूर्व ४८४ ते ४२५):–**

हेरोडोटस हा ग्रीकांचा पहिला इतिहासकार होय. हेरोडोटसचा जन्म पर्शियन युद्धांच्या सुमारास हॅलिकर्नासस (आधुनिक तुर्की शहर बोडरम) येथे झाला. इ.स.पू. सहाव्या शतकात सुसंगत इतिहासलेखनास

सुरुवात झाली, त्याचे श्रेय हिरोडोटस यास द्यावे लागेल. सिसरो याने हिरोडोटस यास 'इतिहासाचा जनक' असे म्हटले आहे. हेरोडोटस याने पुढील पिढीसाठी गद्यात इतिहास लिहून त्यामध्ये तत्कालीन महत्त्वपूर्ण घटनांची व व्यक्तींची नोंद आणि सविस्तर चर्चा केली. त्याने दंतकथांचा उल्लेख करून तत्कालीन चालीरीतींद्वारे काही अनुमाने काढली. ग्रीस इराण युद्धाचा इतिहास नऊ भागामध्ये लिहिला. युद्धाविषयी लेखन करीत असताना त्याने अनेक संबंधित विषयांची माहिती दिली आहे. हिरोडोटसच्या इतिहासलेखन परंपरेची वैशिष्टये पुढील प्रमाणे सांगता येतील.

१. विषयाच्या मांडणीमध्ये सुसूत्रता व लयबद्धता आहे.

२. विषयाची मांडणी सोप्या भाषेमध्ये आहे.

३. विषयाच्या मांडणीमध्ये कालक्रम असून विषयाचे निवेदन एकसंध आहे.

४. लिखाणामध्ये पूर्वग्रह नसून वस्तूनिष्ठता आहे.

५. सांस्कृतिक इतिहास लिहिण्याचा प्रथम प्रयत्न केला आहे.

६. गद्य लेखन व पद्य लेखन या दोन्हीही गुणांचे मिश्रण आहे.

७. वाचकामध्ये जिज्ञासा निर्माण करणारी लेखन पध्दती.

८. इतिहासाला ज्ञानशाखेचे रूप दिले.

९. सकारामत्मक इतिहास लेखन.

- **हिरोडोटसच्या लेखनाच्या त्रुटी :–**

१. हिरोडोटसला इतर भाषा येत नसल्याने ऐकीव माहितीवर अधिक भर दिल्याने लिखाणात अपूरेपणा दिसून येतो.

२. मूळ व पुरेशा संदर्भसाधानांचा वापर केल्याचे दिसत नाही.

३. चिकित्सक विश्लेषणाचा अभाव दिसून येतो.

४. घटनेच्या कार्यकारणभावामागे आध्यात्मिक प्रेरणा असते असे त्याचे मत असल्याने सत्य बाजूला पडल्याचे जाणवते.

एकंदरीत हिरोडोटस यांने ग्रीक व इराण यांचा संघर्ष कशाप्रकारे झाला, त्याची कारणे काय होती या विशिष्ट हेतूने इतिहासाचे लेखन केले. ग्रीक व इराणी संघर्षाची कारणे पुढील पिढीला माहिती व्हावी हा त्याच्या लिखाणाचा मुख्य हेतू होता. इतिहासलेखनाचा हेतू स्पष्ट करताना गतकाळातील घटनांची नोंद पुढील पिढयांसाठी करून ठेवणे हा आहे असे तो सांगतो. वस्तुनिष्ट माहिती, विषयाची सुसूत्र मांडणी, निरीक्षण वृत्ती व भाषाशैली यामुळे हिरोडोटसला शास्त्रीय इतिहासलेखनाचा जनक असेही म्हटले जाते. हिरोडोटसचे

महत्वपूर्ण कार्य म्हणजे त्यांने ग्रीसमध्ये इतिहासलेखनाचा पाया घातला व त्यामुळे पुढे अनेक इतिहासकार निर्माण झाले. शॉटवेल याने हिरोडोटस यास 'पर्शियन युध्दाचा होमर' असे म्हटले आहे.

- **थ्यूसिडिडिज (इ.स.पूर्व ४६० ते ४००)**

थ्यूसिडिडिज याचा जन्ममृत्युच्या कालखंडाविषयी निश्चित माहिती उपलब्ध नाही. तथापि आधुनिक इतिहासकार त्याचा जन्म इ. स. पू. ४६ ते ४ च्या दरम्यान मानतात. अथेन्स येथे सधन घराण्यात त्याचा जन्म झाला. वडीलांचे नाव ओलोरस व आईचे नाव हेजिसिपाइल असे होते. त्याच्या बालपणाविषयी आणि शिक्षणासंबंधी फारशी माहिती उपलब्ध नाही तथापि त्याने अथेन्समध्ये उपलब्ध असणारे सर्व शिक्षण घेतले होते. अथेन्स विरुद्ध स्पार्टा यांतील पेलोपनीशियन युद्धात तो एक सेनानी होता. हे युध्द एकूण तीस वर्ष चालले. या युध्दातील तत्कालीन दैनंदिन घटनांची नोंद युध्दाच्या प्रारंभापासून थ्यूसिडिडिजने ठेवली व पुढे त्यांवरून 'द हिस्टरी अफ द पेलोपनीशियन वॉर' हा आठ खंडाचा ग्रंथ लिहिला. युध्द समाप्तीच्या अगोदर सहा वर्षापर्यंतचा इतिहास या ग्रंथात आहे. कार्यकारणभावाच्या तत्त्वाचे भान त्याच्या लेखनात सतत प्रत्ययास येते. ग्रंथात त्याने सांगितलेल्या घटना एकतर प्रत्यक्ष अनुभविलेल्या आहेत किंवा प्रत्यक्ष अनुभवलेल्यांकडून ऐकलेल्या आहेत.

प्रा.लालबहाद्दूर वर्मा यांच्या मते ''थ्यूसिडिडिज याचे लेखन व्यवस्थित व सूक्ष्म पध्दतीचे होते. कल्पनावर अधारीत लेखन नसून साधनाच्या अधारावर लेखन केले होते.'' थ्यूसिडिडिजच्या लिखाणामध्ये निष्पक्षपातीपणा, स्पष्टता याचा समावेश होता. इराणी युद्धापासूनच्या पुढील इतिहासलेखनास थ्यूसिडिडीझने सुरुवात केली. थ्यूसिडिडीझचा दृष्टिकोन विशाल होता. दंतकथा अथवा आश्चर्यकारक कथा याची त्याने पडताळणी करूनच लिखाणामध्ये समावेश केला. थ्यूसिडिडिज याचा इतिहास म्हणजे केवळ लष्करी इतिहास आहे. सामाजिक, सांस्कृतिक बाबींचा समावेश दिसून येत नाही.

''वैज्ञानिक इतिहास पध्दतीचा जनक'' असे इतिहासकार आर. जे. कॉलिंगवूड थ्यूसिडिडिजबाबत म्हणतात. जे.बी.ब्युरी मते इतिहासाला आज व्यापक स्वरूप प्राप्त झाले आहे त्याचे प्रमुख कारण थ्यूसिडिडिज आहे. इतिहासाविषयी हिरोडोटस याच्यापेक्षा थ्यूसिडिडिजचा दृष्टिकोन पुर्णत: वेगळा होता. त्याने वर्णननात्मक इतिहास लेखनास जास्तीत जास्त महत्त्व दिले. बी. शेख अली यांच्या मते थ्यूसिडिडिज यांने सर्वात प्रथम इतिहासाचे मूळ सत्य मांडले. शास्त्रशुद्ध इतिहासलेखनपद्धतीचा पाया त्याने घातला. थ्यूसिडिडिजच्या ग्रंथांचे इंग्रजी भाषांतर टमस हब्ज याने प्रथम केले असून पुढे डेव्हिड ग्रीनने ते संपादित केले.

- **पॉलीबियस (इ.स.पू. १९८ ते ११७),**

इतिहासकार पॉलीबियस यांचा जन्म पेलोपोनीजमधील मेगालोपोलिसच्या प्रमुख कुटुंबात झाला. पॉलीबियस अनेक वर्षे शस्त्रास्त्रे आणि मुत्सेगिरीकरीता अचेनलीगमध्ये कार्यरत होता. मात्र १६८ ते १५१ पर्यंत त्याला रोममध्ये ओलिस ठेवण्यात आले. याच कालखंडात तो स्किपिओ एमिलियनसचा मित्र बनला. पुढे अनेक मोहिमांमध्ये त्याने भाग घेतला. ग्रीस आणि रोमन यांच्यातील विश्वासू मध्यस्थ म्हणून त्याने

कार्थेजबरोबरच्या अंतिम युद्धापूर्वी झालेल्या चर्चेत मदत केली. रोमन लोकांना ग्रीक इतिहासलेखनाचा वारसा मिळाला. पॉलिबियसने प्रथम रोमन राज्याच्या विकासाबल आणि रोमन समाजाच्या पैलूंवर चर्चा केली. पॉलीबियसने रोमन आणि ग्रीक यांच्यातील तुलना केली. पॉलिबियसच्या मते रोमच्या यशाचे प्राथमिक कारण रोमन वर्ण होते, जसे की राजकारणीपणा, सार्वजनिक भावना आणि पराभूत लोकांप्रती संयम यातून दिसून येते. पॉलीबियसच्या इतिहासाचा मुख्य भाग रोमचा उदय, कार्थेजचा नाश आणि ग्रीक जगाच्या अंतिम वर्चस्वाचे वर्णन आहे. पॉलिबियसने असेही मत मांडले की रोमन राजकीय संस्था ग्रीकपेक्षा श्रेष्ठ आहेत. पॉलीबियसने 'हिस्ट्रीज' हा महत्वपूर्ण ग्रंथ लिहिला. चाळीस भागामध्ये लिहिलेल्या ग्रंथाचे पहिले पाच भाग सोडून बाकी सर्व अपूर्ण स्थितीत असूनही इतिहासातील हे एक महत्त्वाचे साधन आहे. पॉलिबियसने इतिहासाचे वर्णन राजकीय आणि लष्करी घडामोडींशी संबंधित आहे. पॉलीबियसच्या इतिहास लेखनाचे वैशिष्टये म्हणजे पद्धतीशास्त्र व निष्पक्षपातीपणे लेखन होय. एक इतिहासकार म्हणून, पॉलिबियसला त्याच्या कथनाच्या सत्यतेबल सखोल चिंता होती. संदर्भसाधने आणि साक्षीदारांचा काळजीपूर्वक सल्ला घेणे, मानवी स्वभाव आणि कृ ती यावर लक्ष केंद्रित करणे, कारण आणि परिणामाचे योग्य स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे असे त्यास वाटत असे. एकूणच इतिहासलेखनाला पॉलीबियसची मोठी देणगी आहे.

- **झेनॉफिन (इ.स.पू. ४३० ते ३५४)**

झेनॉफिन हा ग्रीक इतिहासकार होता. त्याचा जन्म अथेन्स येते झाला. तो उत्तम पत्रकारही होता. झेनॉफिन याने अर्थशास्त्र, राजनिती, युध्दविद्या, कृषी, व्यापार, शिकार व शिक्षण इत्यादी विषयावर लेखन केले. त्याने 'हेलनिका' हा महत्वपूर्ण ग्रंथ सात खंडामध्ये त्याने लिहला. हेलेनिका या ग्रंथामध्ये थ्यूसीडिडीजच्या ग्रंथामध्ये पेलोपोनेशियनच्या युद्धाचा न लिहिलेल्या भागाचे वर्णन केले आहे. 'ऐनाबेसिस', 'वे ॲन्ड मिन्स' यासारखे इतर ग्रंथही त्याने लिहले. इराणचा राजा सायरस याच्या मोहिमांची माहिती त्याने 'अनाबेसिस' या ग्रंथामध्ये दिली आहे.

**ग्रीक इतिहासलेखनाची वैशिष्ट्ये :-**

१. ग्रीक इतिहासलेखन वस्तुनिष्ठपणे लिहलेले आहे.

२. ग्रीक इतिहासलेखनामध्ये मौखिक कथा, दंतकथा यांचा समावेश नाही.

३. ग्रीक इतिहासकारांनी घटनांचा कार्यकारणभाव व घटनांचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे.

४. ग्रीक इतिहासकारांनी राजकिय घटनांबरोबरच सामाजिक व आर्थिक जीवनावरही प्रकाश टाकला आहे.

५. भूगोल हे इतिहासाचे सहायकारी शास्त्र आहे त्यामुळे भौगोलिक माहिती इतिहासकाराला असणे गरजेचे आहे असे ग्रीक इतिहासकारांचे मत होते.

६. माहिती अथवा साधने जमा करणे व त्याची सत्यता तपासणे महत्त्वाचे आहे हे ग्रीक इतिहासकार जाणत होते.

७. इतिहास म्हणजे गतकाळातील घटनांचा आढावा आहे व तो पुढील पिढीस मार्गदर्शक आहे याची ग्रीक इतिहासकारांना जाणीव होती.

एकूणच इतिहासलेखन पुर्णत: मूळ संदर्भसाधनांच्या आधारे केले जावे. साधनांचे शास्त्रशुद्ध विश्लेषण केले जावे याबाबतीत ग्रीक इतिहासकार आग्रही होते. त्यामुळेच ग्रीक इतिहास लेखकांचे महत्व आजही अनन्यसाधारण आहे.

**ब) रोमन इतिहासलेखन परंपरा :–**

इ.स. पूर्व तिसऱ्या शतकामध्ये रोमन इतिहास लेखनाला सुरुवात झाली. इतिहासलेखन परंपरेमध्ये ग्रीक इतिहासकारांनंतर रोमन इतिहासकारांनी मोलाची भर घातली. रोमन लोकांना इतिहासलेखनाकडे वळायला काही शतके लागली. रोमन लोक प्रारंभीच्या काळी ऐतिहासिक स्वरूपाच्या ढोबळ नोंदी करत असत. इ.स.पूर्व तिसऱ्या शतकामधील रोमन इतिहासकारांमध्ये कॅटो याला अग्रस्थान दिले जाते.

- **कॅटो (इ.स.पूर्व २३४ ते इ.स. पूर्व १४९)**

कॅटो हा रोमन इतिहासचा जनक समजला जातो. रोमन सिनेटचा सदस्य असल्याने तो राजकीय घटनांचा प्रत्यक्ष साक्षीदार होता. रोमन प्रजासत्ताकच्या कालावधीमध्ये प्युनिक युद्धाच्या कालखंडामध्ये त्याने राजकारणामध्ये सक्रिय सहभाग होता. त्याने 'ओरिजीन' हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ सात भागात असून यामध्ये प्युनिक युद्धाचा इतिहास आहे. या ग्रंथामध्ये युद्धाच्या माहितीशिवाय इटलीमधील सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, भौगोलीक व अर्थिक माहिती दिलेली आहे. त्यामुळे हा ग्रंथ रोमन इतिहासलेखनातील महत्त्वाचा ग्रंथ मानला जातो. इतिहासाचे शैक्षणीक महत्त्व असून उद्‌बोधन करणे हा इतिहासाचा हेतू असून त्यामध्ये राष्ट्रीयत्वाचे, नैतिक मूल्यांचे व चरित्र संवर्धनाचे धडे मिळावेत ही त्याची भूमिका होती. कॅटोच्या लेखनाचे वैशिष्टे म्हणजे युद्धमोहिमांचा इतिहास लेखन करीत असताना त्या एक पराक्रमी हत्तीच्या नावाशिवाय दुसऱ्या कोणाच्याही नावाचा उल्लेख केलेला नाही. युद्धामध्ये सेनानीपेक्षा सैनिक महत्त्वाचे असतात. ही त्याची भूमिका होती. यावरून तो उच्चपदावर कार्यरत असूनही सामान्याच्या कार्याची त्याला जाण असल्याचे दिसते. परंतु कॅटोचा हा ग्रंथ आज उपलब्ध नाही.

- **लीव्ही (इ.स.पूर्व ५९ ते १७)**

रोमन इतिहासलेखनाला ग्रीकांच्या जोडीला नेऊन बसविण्याचे श्रेय ज्या इतिहासकारांना दिले जाते त्यापैकी एक लीव्ही. लीव्हीचा काळ रोमन इतिहासातील मन्वंतराचा काळ होता. या काळामध्ये रोमन प्रजासत्ताकाचा शेवट होऊन रोमन साम्रज्याचा पाया घातला गेला. रोमन सम्राट व लीव्ही यांचे संबंध जवळचे असल्याने लीव्हीला दरबारातील घटनांची माहिती होती. त्याने 'हिस्ट्री अफ रोम' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाचे १४२ भाग असून त्यापैकी आज फक्त ३५ भाग अस्तित्त्वात आहेत. या ग्रंथामध्ये रोमच्या स्थापनेपासून इ.स. ९ पर्यंतचा इतिहास लिहिलेला आहे. रोमच्या इतिहासामध्ये सेंट अगस्टसची कारकिर्द सुवर्णयुग असल्याचे लिव्ही मानतो. इतिहासाचा हेतू प्रबोधनपर असावा असे लीव्हीला वाटते. राष्ट्रभक्ती, नीतीमूल्ये, शिस्त व उत्तम नागरिकाला आवश्यक असलेले गुण इ. इतिहासातून दिले जावेत व इतिहासाच्या अभ्यासातून उत्तम नागरीक घडावा या उपयुक्ततावादी दृष्टीकोणातून लीव्हीने इतिहासाकडे पाहिले.

- **लीव्हीच्या इतिहासलेखनाची वैशिष्टे :–**

  १. लीव्हीने राजकीय घडामोडींची माहिती देताना रोम कार्थेज युद्ध, यादवी, प्रजासत्ताकाचा अंत, साम्राज्याची पायाभरणी याची माहिती दिली आहे.

  २. लीव्हीने ग्रंथाचे लेखन विश्वसनीय माहितीच्या आधारे केले आहे त्यामुळे त्याचे लेखन माहितीपूर्ण आहे.

  ३. लीव्हीची लेखन शैली वर्णनात्मक रसाळ व साहित्यगुणांनी युक्त आहे.

- **लीव्हीच्या इतिहासलेखनामध्ये पुढील त्रुटी दिसून येतात.**

  १. लीव्हीच्या इतिहासलेखनामध्ये रोमन सैन्याच्या इटलीमधील मोहिमांचा जेवढी माहिती देतो तेवढी माहिती इटलीबाहेरील मोहिमांची दिली नाही.

  २. मिळालेल्या माहितीचे चिकित्सक विश्लेषण केले नाही.

  ३. मूळ कागदपत्रांच्या आधारे लेखन करण्याचा प्रयत्न केला नाही.

  ४. घटनांची मांडणी पद्धतशीर केली नसल्याने त्याच्या मांडणीमध्षे परस्पर विरोधी विधाने आढळतात.

  ५. कालनिर्देशामध्ये संदिग्धता व चुका आढळतात.

  ६. घटनांच्या कारणांची चर्चा केली नाही.

- **कार्नेलियस टॅटिटस** (Cornelius Tacitus)

टॅटिटस हा रोमन इतिहासलेखनामधील अग्रगण्य इतिहासकार मानला जातो. उच्च वर्गामध्ये जन्मलेल्या या इतिहासकाराचा वक्तृत्त्व कला व कायद्याचा विशेष अभ्यास होता. अनेक महत्त्वाच्या व उच्च पदावर काम केले असल्याने त्याला दरबारी व शासकीय कामाचा फार मोठ अनुभव होता.

टॅटिटसने विविध प्रकारचे ग्रंथ लिहिले व रोमन इतिहासलेखन परंपरेमध्ये मोलाची भर घातली. यापैकी 'डायलॉग अन ओरॅटरर्स', 'लाईफ अफ अ‍ॅग्रीकोला', 'जर्मनीया', 'हिस्ट्रीज व अ‍ॅनल्स' हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. हिस्ट्रीज (Histories) या ग्रंथामध्ये त्याने इ.स. ६८ ते ९६ या कलावधीमधील रोमन सम्राटांच्या इतिहासाची माहिती दिली आहे. यापूर्वीच्या सम्राटांची महिती त्याने अ‍ॅनल्स या ग्रंथामध्ये दिली आहे. 'लाईफ अफ अ‍ॅग्रीकोला' या ग्रंथामध्ये त्याने आपल्या सास-याच्या जीवन कार्याची माहिती दिली आहे.

**टॅसिटसच्या इतिहासलेखनामध्षे पुढील वैशिष्टे दिसून येतात.**

१. टॅसिटसने आपल्या विषयासाठी काळजीपूर्वक अनेक ठिकाणावरून माहिती गोळा केली.

२. त्याने ऐतिहासिक घटनांचे तर्कशुद्ध विश्लेषण केले आहे.

३. घटनांच्या कारणांची चर्चा करून त्यांचा अन्वयार्थ लावला आहे.

४. व्यक्ती व्यक्तीतील संघर्षाच्या रूपाने त्याने घटनांचा अर्थ लावला आहे.

५. रोमन साम्राज्याच्या घडणीतील दोष त्याने स्पष्टपणे दाखविले आहेत.

६. उच्च पदावरील व्यक्तीच्या वर्तणूकीवर त्याने कठोरपणे टिका केली आहे याला सम्राटही अपवाद राहीला नाही.

७. त्याच्या लिखाणाची भाषा प्रभावी असून निवेदनामध्ये कल्पकता, रंजकता व वैचारिकता आहे. व्यक्तीला सुखी व चांगले जीवन व्यतीत करण्याचे धडे इतिहास देतो, व्यक्तीमधील सुप्त गुणांची वाढ करतो अशी त्याची इतिहासाबल भूमिका होती.

- **ज्यूलियस सीझर (इ.स.१००–४४)**

ज्यूलियस सीझर हा थोर मुत्सी, कुशल सेनापती, अनुभवी शासक, उत्तम वक्ता व कवी होता. इतिहासलेखनामध्येही त्याने चांगली कामगिरी केली आहे. त्याने 'कॉमेंट्रीज अन गॅलिक वॉर' (Comentries on Galic) हा तीन खंडाचा ग्रंथ लिहिला. यामध्ये त्याने गॅलिक युद्धातील लष्करी मोहिमांचे, लष्करी डावपेचांचे वर्णन केले आहे. परंतु मोहिमांच्या तपशीलामध्ये कालक्रम अचूक नाही. याशिवाय ॲपियन याचा 'रोमन हिस्ट्री' (Roman History) हा वीस भागातील ग्रंथ महत्त्वाचा असून यामध्ये रोमन प्रजासत्ताकाच्या स्थापनेपासून दुसऱ्या शतकापर्यंतच्या राजकीय घडामोडींचा इतिहास लिहिला आहे. यामध्ये राजकीय घटनांबरोबरच रोमची शासन पद्धती, शासनसंस्था, कायदा यांची माहिती दिलेली आहे.

इ.स. दुसऱ्या शतकामध्ये फ्लेव्हिओ ओरियन याने अलेक्झांडरच्या मोहिमांचे चिकित्सक पद्धतीने इतिहास लिहिण्यासाठी विश्वसनीय माहितीचा आधार घेतला. यामध्ये लष्करी मोहिमांच्या भौगोलिक पार्श्वभूमीची चर्चा केलेली आहे. रोमन इतिहासलेखन परंपरेमध्ये चरित्रलेखनाचा प्रकार आढळतो.

- **रोमन इतिहासलेखन परंपरेची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे सांगता येतील.**

१. रोमन इतिहासलेखन परंपरेचा केंद्रबिंदू राजकीय व लष्करी घडामोडी आहेत.

२. रोमन इतिहासकारांनी लिखित साधनांचा वापर केला.

३. इतिहासाला शैक्षणीक मूल्य असल्याची रोमन इतिहासकारांचे मत आहे. इतिहासाबाबत त्यांची व्यावहारीक व लौकिक भूमिका दिसून येते.

४. रोमन इतिहासलेखन परंपरेमध्ये रंजकता व भाषासौष्ठव दिसून येते.

- **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न १**

**अ. योग्य तो पर्याय निवडून पुन्हा वाक्य लिहा**

१. होमरने ............. या ग्रंथाची निर्मिती केली.

अ) इलियड ब) पॅरलल लाईव्ह क) अनाबेसीस ड) हिस्ट्रीज

२. ................ यास इतिहासाचा जनक म्हटले जाते.

अ) थ्यूसीडीडीज ब) पॉलिबियस क) हिरोडोटस ड) स्ट्रॅबे

३. .................. ने इतिहासाला शास्त्र मानले.

अ) पॉलिबियस ब) कॅटो क) थ्यूसीडीडीज ड) लिव्ही

४. .................. हा रोमन इतिहासाचा जनक मानला जातो.

अ) लिव्ही ब) कॅटो क) टॅसिटस ड) सीझर

५. ............ ग्रंथाचे १४२ भाग लिहीले गेले.

अ) हिस्ट्री ऑफ रोम ब) ओरीजीन क) अनाबेसीस ड) हेलीनिका

**ब. एका वाक्यात उत्तरे लिहा**

१. पर्शियन युद्धाचा होमर कोणाला म्हटले जाते?

२. शास्त्रीय इतिहासलेखनशास्त्राचा जनक म्हणून कोणाला ओळखले जाते?

३. 'हिस्ट्रीज' हा ग्रंथ कोणी लिहिला?

४. 'ॲनल्स' हा ग्रंथ कोणी लिहिला?

५. 'कॉमेंट्रज अन गॅलीक वॉर' हा ग्रंथ कोणी लिहिला?

## १.२.२ अरेबिक इतिहास परंपरा

इ.स. सातव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये अरब इतिहासलेखन परंपरेस सुरूवात झाली. तोपर्यंत अरब लोक आपल्या स्मृती मौखिक स्वरूपात जतन करीत असत. सातव्या शतकामध्ये अरबांच्यामध्ये ऐतिहासिक दृष्टी निर्माण झाली. इतिहासलेखनाचे महत्त्व समजल्याने इतिहास लेखनाची प्रवृत्ती निर्माण झाली. यासाठी इस्लामचा उदय, प्रादेशिक विस्तार व साम्राज्य निर्मिती आणि पर्शियन इतिहासलेखनाचा प्रभाव याबाबी कारणीभूत झाल्या. सातव्या शतकापर्यंत भटका असणारा अरब समाज इस्लाम धर्मामुळे एकत्रित बांधला गेला. इस्लाम धर्माच्या समता व बंधुता या शिकवणूकीमुळे आपसातील संघर्ष संपून अरब समाजामध्ये एकता निर्माण झाली. इस्लाम धर्माच्या प्रसारासाठी अरबांनी तलवारीच्या अवलंब करून साम्राज्य निर्माण केले. त्यांनी युरोप व अशिया खंडादरम्यान व्यापारावर वर्चस्व मिळविले. यातून वेगवेगळया संस्कृतींचे व प्रदेशातील ज्ञानाची अरबांना माहिती झाली. यातून केलेल्या पराक्रमाची व अनुभवाची नोंद करण्याची गरज वाटू लागली. धर्मप्रसार व साम्राज्य निर्मिती हे अरब इतिहासलेखनाचे प्रेरणा स्त्रोत होते.

- **पर्शियन इतिहासलेखन परंपरेचा प्रभाव**

सातव्या शतकामध्ये अरबांनी इराणवर विजय मिळविल्यानंतर त्यांना प्रगत इराणी संस्कृतीची व इतिहासाची माहिती मिळाली. आठव्या शतकात त्यांनी 'बुक्स ऑफ किंग्ज' (Books of Kings) या इतिहास ग्रंथाचे अरबी भाषेमध्ये भाषांतर केले. यातून अरब इतिहासलेखन परंपरेला प्रेरणा मिळाली. अरब इतिहासलेखन परंपरेमध्ये पर्शियन लेखनशैली, अलंकारीक भाषा, महान व्यक्तीचे कार्य, स्मरणीय घटनांचे

वर्णन व साहित्यिक साफाईदारपणा स्पष्ट जाणवतो. अरबांनी पर्शियन भाषेतही लेखन केले. यामुळे पुढील काळात इतिहासलेखनाच्या विषय व मांडणीमध्ये बदल झाला. आठव्या शतकामध्ये जितांच्या संस्कृतीला इस्लामी संस्कृतीमध्ये सामावून घेण्याचा प्रयत्न केल्याने विज्ञान, कला व वाङ्याचा विकास झाला. अरब इतिहासलेखनपरंपरेमध्ये पुढील इतिहासकारांनी मोलाची भर घातली.

- **अबू इब्न**

याने अनेक महान व्यक्तींवर व महत्त्वाच्या घटनांवर ३३ ग्रंथ लिहीले. यातील 'हिस्ट्री ऑफ द कॉन्केस्ट ऑफ इराक' (History of the Conquest of Iraq) हा ग्रंथ महत्त्वाचा मानला जातो.

- **अल वकीदी**

आठव्या शतकातील अल वकीदी याने आपल्या जीवनामध्ये अनेक लांबच्या प्रदेशाचा प्रवास केला. प्रवास करताना त्याचे फिरते ग्रंथालय वाहून नेण्यासाठी १२० उंट लागत. त्याने 'किताब उल मघाजी' (Kitab-ul-Maghaji) हा ग्रंथ लिहीला. यामध्ये इस्लाम धर्माच्या प्रसाराची व त्यासाठी केलेल्या लष्करी मोहिमांची सविस्तर माहिती दिलेली आहे.

- **अल मदाइनी**

नवव्या शतकातील या इतिहासकाराने इस्लाम धर्माच्या प्रचाराचा इतिहास लिहीला. याने मोठ्या प्रमाणावर लेखन केले आहे. त्याचा 'बुक ऑफ खलीफज' (Books of Khalifs) हा ग्रंथ प्रसिद्ध आहे.

- **अल बहादूरी**

नवव्या शतकातील या अलबहादूरीने सिरिया, मेसोपोटेमिया, इजिप्त, स्पेन व सायप्रस या प्रदेशातील इस्लामच्या प्रसाराची व इस्लामी आक्रमनाची सविस्तर माहिती लिहिलेली आहे. त्याने लिहीलेला 'हिस्ट्री ऑफ कॉन्केस्टस' (History of Conquests) हा ग्रंथ विश्वसनीय मानला जातो.

- **मिस्कावाही**

अकराव्या शतकातील या लेखकाने लिहीलेल्या 'The Experience of Nations' या ग्रंथामध्ये इराणच्या करपद्धतीची व अर्थिक व सामाजिक परिस्थितीची माहिती दिलेली आहे.

- **अल मसूदी**

दहाव्या शतकात होऊन गेलेल्या या लेखकाने ३६ ग्रंथ लिहिले. यापैकी 'Murudj' हा महत्त्वाचा ग्रंथ लिहिण्यासाठी १६५ साधनांचा अभ्यास केलेला आहे.

- **इब्न खल्लीखान**

तेराव्या शतकातील या इतिहासलेखकाने 'Obituaries of Eminent Men' ग्रंथ लिहिला आहे. यामध्ये ९०० इस्लामी महान व्यक्तींची चरित्रे लिहिली आहेत.

## ● अल बिरूनी

अकराव्या शतकातील हा इतिहासकार गझनीच्या महंमदाबरोबर भारतामध्ये आला. भारतामध्ये तो तेरा वर्षे राहीला. त्याने संस्कृत भाषा शिकली. काही अभिजात संस्कृत भाषेतील ग्रंथांचे अरबी भाषेमध्ये भाषांतर केले. याबरोबरच ग्रीक ग्रंथांचे अरबी भाषेमध्ये भाषांतर केलेल्या ग्रंथांचे संस्कृत भाषेमध्ये भाषांतर केले. त्याचा 'Kitaba-ul-Hind' हा ग्रंथ महत्त्वाचा आहे. हा ग्रंथ त्याच्या भारतातील अनुभवावर आधारीत असून यामध्ये भारतीय तत्त्वज्ञान, गणित, खगोलशास्त्र, समाजपद्धती याची माहिती दिली आहे. हिंदूंच्या सांस्कृतिक जीवनातील काही बाबींची स्तुती करताना हिंदूंमध्ये आत्मसंतुष्टता, आत्मकेंद्रीत संकुचितवृत्ती व ऐतिहासिक दृष्टीचा अभाव असल्याचा स्पष्ट करतो.

## ● इब्न बतुता

चौदाव्या शतकामध्ये उत्तर अफ्रिकेमध्ये हा इतिहासकार होऊन गेला. त्याने इजिप्त, सिरीया, भारत, श्रीलंका, जावा सुमात्रा व चीन या देशांचा प्रवास केला. या काळामध्ये एकत्रित केलेल्या माहितीच्या आधारे त्याने प्रवास वर्णने लिहीली. भारतामध्ये आल्यानंतर महंमद तुघलकाने त्याला काझी म्हणून नेमणूक केली. परंतु गैरसमजामुळे त्यास तुरूंगवास भोगावा लागला. गैरसमज दूर झाल्यानंतर त्याची तुरूंगवासातून सूटका झाली. त्यास आपला दूत म्हणून चीनला पाठविण्यात आले. त्याचा 'Rihala' हा ग्रंथ विश्वसनीय आहे. प्रत्येक मुसलमानाने मक्का मदिना या धार्मिक स्थानांना भेट दिलीच पाहिजे यावर इस्लाम धर्माने दिलेला भर, अरबांची साम्राज्य निर्मिती व सागरी व्यापारावरील वर्चस्वामुळे अरबांनी अनेक लांबचे प्रवास केले. प्रवासामध्ये मिळालेल्या माहिती व अनुभव त्यांनी लिहून ठेवले. त्यामुळे मध्ययुगामध्ये प्रवासवर्णन हा इतिहासलेखनाचा महत्त्वाचा घटक बनला.

## ● इब्न खल्दून

अरब इतिहासलेखनातील हा अग्रगण्य इतिहासलेखक होय. इतिहासाच्या अभ्यासाविषयी त्याचा नवीन शास्त्रीय दृष्टीकोण व त्याचे नवे विचार ही त्याची महत्त्वाची कार्ये होत. इब्न खल्दूनने 'Kitab-al-Ibar' हा जागतिक इतिहासावर ग्रंथ लिहीला. हा ग्रंथ तीन भागात असून पहिल्या भागात मानवी संस्कृतीची, वैशिष्टे व त्याचा मानवी जीवनावरील परिणामांची तर्कशुद्ध चर्चा केलेली आहे. दुसऱ्या भागामध्ये मध्य आशियापासून इटलीपर्यंतच्या मुस्लिम अरब राष्ट्रांचा इतिहास लिहिला आहे. तिसऱ्या भागामध्ये अफ्रिकेच्या वायव्य भागाचे ऐतिहासिक वर्णन आहे.

या ग्रंथाला असलेली ३०० पानांच्या प्रस्तावनेतील इतिहासाच्या विवेचनाने इतिहासाच्या तत्त्वज्ञानाने क्रांती केली. या प्रस्तावनेमध्ये इतिहासाचे व ऐतिहासिक घटनांचे स्वरूप, घटनांचा इतर संबंध, त्यातील विचार प्रवाह, त्यातील सत्यता, बदल व बदलामागील कारणांची त्याने चर्चा केली आहे. मानवी जीवनाचा व समाज व्यवस्थेचा त्याने आदिकाळापासून आढावा घेतलेला आहे. त्याने इतिहासाला संस्कृती शास्त्र मानले. इतिहासाचा समाजशास्त्रीयदृष्टीने अन्वयार्थ लावला. मानव आपला विकास स्वतःच करत असतो.

समाजाच्या विकासाला पर्यावरण, हवामान, जमीनीचा कस, वस्तूंचे उत्पादन या बाबी उपयोगी असतात. सर्व ज्ञानाचे अंतिम उद्दिष्ट समाजाचे कल्याण आहे असे त्याचे मत होते. समाजाच्या सांस्कृतिक विकासाला सामाजिक व राजकिय व्यवस्थापनाची गरज असून समाज व राजव्यवस्था परिवर्तनशील आहे हे त्याने स्पष्ट केले. एकात्मता, न्याय, सामंजस्य, विवेक या सामाजिक संकल्पना व नैतिक तात्विक मूल्ये यामुळे संस्कृतीचा विकास होतो. अर्थव्यवहार हा समाज व्यवस्थेचा आधार असून समाजाच्या विकासावर उत्पादनचे स्वरूप व पद्धती यांचा प्रभाव पडतो. लोकसंख्यावाढीमुळे श्रमामध्ये वाढ होते. गरजेच्या वस्तूंचे उत्पादन पुरेसे झाल्यानंतर चैनीच्या वस्तू उत्पादानावर श्रम खर्ची पडतात असे त्याचे मत होते. संस्कृती ही परिवर्तनीय असून ती मानवी जीवनाप्रमाणे चक्राकार गतीने वाटचाल करते असे त्याचे मत होते. मानवी कृती मानवाला जबाबदार असून संपूर्ण व सर्वांगीण मानवी जीवन हा इतिहासाचा विषय आहे असे त्याचे मत होते. त्याने इतिहासाच्या अभ्यासामध्ये सत्यशोधन, चिकित्सक तर्कनिष्ठ दृष्टीकोनाला महत्त्व दिले. इतिहासलेखकाने चिकित्सेशिवाय इतर बाबींवर विश्वास ठेवू नये, सर्व माहितीची तपासणी साशंकतेने करावी, कोणत्याही विषयावर लिहिताना संबंधीत अनेक साधनांचा अभ्यास करून विषयाच्या विविध अंगाने मूळ माहिती मिळवून त्याची छाननी करावी व सत्य शोधावे असे त्याने सांगितले. पूर्वग्रह, आग्रही मते, स्तुतीपर विधाने व ऐकीव माहितीमुळे इतिहासलेखनामध्ये चुका होतात असे त्याचे मत होते.

- **अरब इतिहासलेखन परंपरेची वैशिष्ट्ये :**

अरब इतिहासलेखन हा जागतिक इतिहासलेखनातील महत्त्वाचा टप्पा मानला जातो. अरब इतिहासलेखनातील वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. अरब इतिहासलेखनामध्ये लौकिक जीवनाविषयी सकारात्मक दृष्टी दिसून येते. मानवी कृतीचे व मानवी व्यवहाराची वस्तूनिष्ठता दिसून येते.

२. अरब इतिहासलेखनामध्ये ऐतिहासिक दृष्टी दिसून येते.

३. अरब इतिहास लेखनामध्ये धार्मिक व राजकीय विषय आहेत. इतिहासलेखनामध्ये व्यापकता व विविधता दिसून येते. अरब इतिहासलेखनाने विश्वसनीय प्रवास वर्णनांची नवीन परंपरा सुरू केली.

४. अरब इतिहासलेखनामध्ये प्रथमच एकसूत्री कालगणना पद्धतीचा वापर करण्यात आला. यामुळे इतिहासलेखनामध्ये एकसूत्रता व विश्वसनीयता आली.

५. अरब इतिहासलेखकांनी ऐतिहासिक साधनांच्या विश्वसनीयतेला महत्त्व देऊन त्यासाठी शास्त्रीय पद्धती वापरली.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – २**

**अ. योग्य तो पर्याय निवडून पुन्हा वाक्य लिहा**

१. ............ शतकामध्ये अरबांमध्ये ऐतिहासिक दृष्टी निर्माण झाली.

अ) सातव्या ब) सहाव्या क) आठव्या ड) नवव्या

२. ............ चे फिरते ग्रंथालय होते.

अ) इब्न खल्दून  ब) अल वकीदी  क) इब्न बुतता  ड) मिस्कावाही

३. ............... ने रिहाला हा ग्रंथ लिहिला.

अ) अल मदाइनी  ब) अल मसूदी  क) इब्न बुतता  ड) अबू इब्न

४. ........... याने ९०० महान इस्लामी धर्मियांची चरित्रे लिहिली आहेत.

अ) इब्न खल्लीखान  ब) मिस्कावाही  क) अल वकीदी  ड) अबू इब्न

५. ............ हा इतिहासकार महंमद गझनी बरोबर भारतात आला.

अ) इब्न खल्दून  ब) अल बिरूनी  क) अल बहादूरी  ड) अल मसूदी

**ब. एका वाक्यात उत्तरे लिहा**

१. कोणत्या ग्रंथाला ३०० पानांची प्रस्तावना आहे?

२. अल बिरूनीने कोणता ग्रंथ लिहिला?

३. अरब इतिहासलेखनावर कोणत्या इतिहासलेखन परंपरेचा प्रभाव पडला?

४. हिस्ट्री अफ कॉन्क्वेस्ट हा ग्रंथ कोणी लिहिला?

५. इतिहासाला संस्कृती शास्त्र कोणी मानले?

## १.२.३ भारतीय : इतिहासपुराणे आणि पर्शियन

### अ) इतिहासपुराणे:–

प्राचीन कालखंडातील पुराणे हे संस्कृत भाषेतील भारतीय ग्रंथ आहेत. पुराण या संस्कृत शब्दाचा शब्दश: अर्थ प्राचीन, जुना असा आहे. पुराण हा हिंदू साहित्याचा एक प्रकार मानला जातो. यामध्ये विविध विषयांबलच्या दंतकथा आणि इतर पारंपारिक कथांचा समावेश आहे. पुराणाची रचना अनेकांनी केली आहे. पुर्वी शंभर कोटी श्लोकाचे एकच पुराण होते मात्र व्यासांनी ४ लाख श्लोकांच्या १८ पुराणामध्ये याची विभागणी केली असा मत्सपुराणामध्ये उल्लेख सापडतो. यामध्ये प्रामुख्याने भक्तीबरोबरच ज्ञान, कर्मकांड, योगविषयक तसेच भौतिक विषय यासंदर्भात माहिती दिली गेली आहे. पुराणसंहिता कालानुसार सदैव बदलत गेल्यामुळे त्यांचा काळ निश्चितपणे सांगता येत नाही. मात्र पुराणांचा कालखंड हा वेदांच्या नंतरचा मानला जातो.

पुराणातील अनेक ग्रंथांची नावे विष्णू, शिव, ब्रह्मा आणि आदिशक्ती या प्रमुख हिंदू देवतांच्या नावावर आहेत. पुराणामधील विषय हे प्रामुख्याने देव, देवी, राजे, नायक, ऋषी आणि देवदेवता यांच्या वंशावळी, लोककथा, तीर्थक्षेत्रे, मंदिरे, वैद्यकशास्त्र, खगोलशास्त्र, व्याकरण यांसारख्या विविध विषयांचा समावेश आहे. विनोद, प्रेमकथा तसेच धर्मशास्त्र आणि तत्वज्ञान याचाही यामध्ये समावेश करण्यात आला आहे.

- **पुराणांचे वर्गीकरण :–** पद्मपुराणामध्ये आलेल्या उल्लेखानुसार पुराणाचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे

१. सात्तविक पुराणे - विष्णु, नारदीय, भागवत, गरुड, पद्म, वराह.

२. राजस पुराणे - ब्रह्मांड, ब्रह्मवैवर्त, मार्कंडेय, ब्रह्म, वामन, भविष्य.

३. तामस पुराणे - मत्स्य, कुर्म, लिंग, शिव, अग्नि, स्कंद.

- अठरा पुराणांची महत्त्वाची वैशिष्टे पुढीलप्रमाणे आहेत -

**१. ब्रह्मपुराण :-**

पुराणांच्या यादीत पहिले असल्यामुळे यास 'आदिपुराण' असेही म्हटले जाते. या पुराणामध्ये सूर्योपासना वर्णिलेली असल्यामुळे त्याला 'सौरपुराण' असेही म्हणतात. हे पुराण इ.स.च्या सातव्या-आठव्या शतकांपूर्वी बनले असावे आणि दहाव्या, बाराव्या व पंधराव्या शतकांत त्यात भर पडली असावी असे मानले जाते. या पुराणात ४ अध्याय असून सु. ४ हजार श्लोक आहेत.

**२. पद्मपुराण :-**

इ.स.च्या पाचव्या शतकानंतर या पुराणाची निर्मिती झाली. बंगाली व देवनागरी अशा दोन भाषेत हे पुराण आढळून येते. हे पुराण सु. ५५ हजार श्लोकांचे आहे. सृष्टी, भूमी, स्वर्ग, पाताल व उत्तर अशा पाच खंडात हे पुराण विभागलेले असून त्याचे ६२८ अध्याय आहेत. कालिदासाचे शांकुंतल हे नाटक या पुराणातील शाकुंतल उपाख्यानावर आधारलेले आहे, असे मानले जाते.

**३. विष्णूपुराण :-**

इ.स.च्या ३ ते ५ या शतकांच्या दरम्यान हे पुराण तयार झाले असावे असे मानले जाते. यामध्ये एकूण १२६ अध्याय आहेत. विष्णुभक्तिला प्राधान्य दिल्यामुळे याचे नाव विष्णुपुराण पडले असे मानले जाते. अनेक आख्यानांबरोबरच कृष्णचरित्रही यामध्ये वर्णिलेले आहे. विल्सनने या पुराणाचे इंग्रजीत भाषांतर प्रसिद्ध केले आहे.

**४. वायूपुराण :-**

वायूने कथन केल्यामुळे या पुराणास वायुपुराण म्हटले जाते. हे पुराण सर्वात जुने आहे असे मानले जाते. या पुराणाची एकूण प्रक्रिय, उपोद्घात, अनुषंग आणि उपसंहार या चार पादांत विभागणी झालेली आहे. या पुराणात ११२ अध्याय असून त्याची श्लोकसंख्या संख्या ११ हजार आहे. यामध्ये शिवचरित्राचे विस्तृत वर्णन आले आहे.

**५. भागवतपुराण :-**

भागवतधर्माचे विवेचन करणारे आणि सर्वश्रेष्ठ मानले जाणारे हे पुराण अत्यंत लोकप्रिय आहे. १२ स्कंधांत विभागलेल्या या पुराणात सु. १८ हजार श्लोक आहेत. हे पुराण व्यासांनी आपला पुत्र शुक याला सांगितले, असे म्हटले जाते. हे पुराण दहा लक्षणांनी युक्त असून कृष्ण हा नायक आहे. भक्ती, तत्त्वज्ञान इ. दृष्टींनी ते महत्त्वाचे आहे. त्याची प्रादेशिक भाषांत व इंग्रजीतही भाषांतरे झाली आहेत.

**६. नारदीयपुराण :-**

या पुराणामध्ये नारदाने विष्णूभक्तीचे वर्णन केले आहे म्हणून यास नारदीय पुराण म्हटले जाते. इ.स. ७०० ते १००० या काळात ते तयार झाले. याचे दोन भाग असून पूर्वभागात १२५ आणि उत्तरभागात ८२ अध्याय आहेत. ऐतिहासिक दृष्ट्या हे पुराण महत्त्वाचे आहे.

**७. मार्कंडेयपुराण :-**

मार्कंडेय ऋषींनी सांगितल्यामुळे याचे नाव मार्कंडेयपुराण असे पडले आहे. हे पुराण अत्यंत प्राचीन आहे असे मानले जाते. या पुराणामध्ये एकूण १३७ अध्याय आहेत तसेच या पुराणात सु. ६,६०० श्लोक आहेत. यामध्ये द्रौपदीचे पंचपतित्व, हरिचंद्र, ब्रह्मवादिनी मदालसा, कृष्ण, मार्कंडेय इत्यादींच्या कथा आहेत. पार्जिटरने याचे इंग्रजी भाषांतर केलेले असून प्रारंभीच्या काही अध्यायांचे जर्मन भाषेतही भाषांतर झाले आहे.

**८. अग्निपुराण :-**

इ.स.च्या सातव्या ते नवव्या शतकांच्या दरम्यान हे पुराण तयार झाले असावे असे मानले जाते. हे पुराण अग्नीने वसिष्ठांना सांगितले आहे. रामायण व महाभारताचे सार, बुद्धावतारासह इतर अवतार, छंद, व्याकरण, अलंकार, योग, ज्योतिष मंदिरे, मूर्ती, धर्म, आयुर्वेद, वृक्ष आणि पशूंचे वैद्यक, रत्नपरीक्षा, धनुर्विद्या, मोहिनी व इतर काही इ. विषयांचे विवेचन आलेले आहेत.

**९. भविष्यपुराण :-**

इ.स.सहाव्या सातव्या शतकात याची निर्मिती झाली. याची ब्राह्म, विष्णू, शिव, सूर्य व प्रतिसर्ग अशी पाच पर्वे असून श्लोकसंख्या सु. १४ हजार आहे. यामध्ये सूर्योपासना विशेषत्वाने आली असून कित्येक घटनांची व राजवंशांची वर्णने ऐतिहासिक दृष्टीने महत्त्वाची आहेत.

**१०. ब्रह्मवैवर्तपुराण :-**

इ.स. आठवे, नववे व दहावे शतक हा याचा काळ मानलेला आहे. यामध्ये एकूण २७६ अध्याय असून श्लोक सु. १८ हजार आहेत. ब्रह्म, प्रकृती, गणेश व कृष्णजन्म अशा चार खंडांत याची विभागणी झालेली आहे.

**११. वराहपुराण :-**

इ.स. नवव्या-दहाव्या शतकांत हे पुराण तयार झाले. याचे एकूण २१८ अध्याय असून त्यांपैकी काही गद्यात्मक आहेत, तर काहींमध्ये गद्य व पद्य यांचे मिश्रण आहे. द्वादशीच्या व्रतासारखी अनेक वैष्णव व्रते यात असून रामानुज संप्रदायाने यातून अनेक वैष्णव अनेक विषय स्वीकारले आहेत.

**१२. लिंगपुराण :-**

इ.स. सातवे-आठवे शतकात याची निर्मिती झाली. याचे पूर्वार्ध १०८ अध्याय व उत्तरार्ध ५५ अध्याय असे दोन भाग आहेत. यात ब्रह्मांडरूपी लिंगाची उत्पती, लिंगपूजा, शैवव्रते, शिवाचे २८ अवतार, काशीचे वर्णन, तंत्रविद्या इ. विषय प्रामुख्याने आले असून हा लिंगायतांचा एक प्रमुख धर्मग्रंथ मानला जातो.

**१३. स्कंदपुराण :–**

इ.स. सातव्या व नवव्या शतकांच्या दरम्यान याची निर्मिती झाली. सर्व पुराणांत आकाराने मोठे असलेले हे पुराण ८१ हजार श्लोकांचे आहे. याच्या सूतसंहितेत ब्रह्मगीता व सूतगीता आहेत, तर रेवाखंडात सत्यनारायणव्रताची कथा आहे.

**१४. वामनपुराण :–**

इ.स.च्या पहिल्या-दुसऱ्या वा सहाव्या ते नवव्या शतकांत हे पुराण तयार झाले असावे, अशी मते आढळतात. यामध्ये वामनावताराचे वर्णन आलेले आहे. हे पुराण पुलस्त्य ऋषीने नारदाला सांगितले आहे. ९५ अध्याय व सु. ६ हजार श्लोक आहेत. यामध्ये शैव, कालदमन, पाशुपत व कापालिक अशा चार शैव संप्रदायांचे वर्णन, असुरांच्या कथा, शिवपार्वतीचे चरित्र आलेले आहे.

**१५. कूर्मपुराण :–**

इ.स.च्या दुसऱ्या, पाचव्या वा सहाव्या-सातव्या शतकांत हे पुराण तयार झाले. विष्णूने कूर्मावतारात इन्द्रद्युम्न राजाला हे पुराण सांगितले, अशी समजूत आहे. याचा पूर्वार्ध (अध्याय) व उत्तरार्ध (४६ अध्याय) असे दोन भाग असून ग्रंथात सु. ६ हजार श्लोक आहेत. या पुराणात 'ईश्वरगीता' व 'व्यासगीता' अशा दोन गीता आलेल्या आहेत.

**१६. मत्स्यपुराण :–**

इ.स. दुसऱ्या ते चौथ्या शतकाच्या दरम्यान हे पुराण तयार झाले. विष्णूने मत्स्यरूपाने मनूला हे पुराण सांगितले आहे. याचे २९१ अध्याय असून श्लोक सु. १४-१५ हजार आहेत. यामध्ये वितृवंश, ऋषिवंश, राजवंश, राजधर्म, हिमालय, तीर्थे इ. विषयांचे वर्णन प्रामुख्याने आलेले आहे.

**१७. गरुडपुराण :–**

इ.स. सातव्या ते दहाव्या शतकाच्या दरम्यान हे पुराण तयार झाले. यामध्ये एकूण अध्याय २६४ असून श्लोक सु. ७ हजार आहेत. याची पूर्वखंड व उत्तरखंड अशी दोन भागात विभागणी झाली आहे. याच्या उत्तरखंडाचे जर्मन भाषांतर झाले आहे.

**१८. ब्रह्मांडपुराण :–**

इ.स. चौथ्या, पाचव्या व सहाव्या शतकात हे पुराण तयार झाले आहे. ब्रह्मांडाची उत्पती आणि विस्तार यांचे वर्णन हा याचा मुख्य विषय असल्यामुळे याला ब्रह्मांडपुराण असे नाव आहे. याचे प्रक्रिया, अनुषंग, उपोद्घात व उपसंहार असे चार पाद असून श्लोक सु. १२ हजार आहेत.

वरील महत्त्वाच्या १८ पुराणाबरोबरच एकूण १८ उपपुराणे आहेत. कालखंडानुसार पुराणाचे विषय बदलत गेले. पुराणामध्ये काही ठिकाणी दंतकथा व ऐतिहासिक घटनांचे वर्णन अतिशक्तीपूर्ण आहे असे असले तरी प्राचीन कालखंडातील तत्कालीन माहिती पुराणातून मिळत असल्यामुळे या पुराणांना ऐतिहासिक दृष्टिने महत्त्वाचे स्थान आहे.

### ब) पर्शियन

भारतामध्ये बाराव्या शतकामध्ये इतिहासलेखनास सुरूवात झाली. बाराव्या शतकापासून भारतीय इतिहासलेखनाच्या स्वरूपामध्ये व तंत्राच्यादृष्टीने मूलभूत बदल झाले. बारावे ते आठरावे शतक हा भारतीय इतिहासलेखनातील मध्ययुगीन कालखंड मानला जातो. भारतातील झालेला बदल नवीन इतिहासलेखन परंपरा सुरू होण्यास कारणीभूत झाला. भारतामध्ये सुलतानशाहीचा उदयाबरोबर येथे अरब, तुर्की व इराणी लेखनकला सुरू झाली. मध्ययुगीन भारतीय इतिहासलेखनाला सुलतानशाहीच्या उदयाबरोबरच इस्लामी संस्कृतीने चालना दिली. त्यामुळे मध्ययुगीन भारतीय इतिहासलेखनामध्ये अरब व पर्शियन इतिहासलेखन परंपरेचा प्रभाव दिसतो. परंतु इतिहासलेखन करीत असताना माहितीचे चिकित्सक विश्लेषण व त्याची विश्वसनीयता तपासली गेली नाही. त्यांनी कालगणनेचे तंत्र व घटनांचा कालक्रम मात्र पाळलेला दिसतो. मध्ययुगीन इतिहासलेखन परंपरेमध्ये क्रांतीकारी बदल घडल्यामुळे हा इतिहासलेखन परंपरेतील नवा टप्पा मानला जातो. इतिहासलेखनाच्या स्वरूपावरून पर्शियन इतिहासलेखनाचे सुलतानशाहीतील इतिहासलेखन व मुगलकाळातील इतिहासलेखन असे दोन टप्पे पडतात. सुलतानशाही इतिहासलेखन परंपरेचे सहा प्रकार पुढीलप्रमाणे

#### १. सर्वसामान्य इतिहास

- **मिनाज–उल–सिराज**

अमीर कुटुंबामध्ये जन्मलेला मिनाज–उल–सिराज बाहेरून भारतात आला. याच्या बुद्धीमत्तेने प्रभावित होऊन सुलतान नसीरुद्दीन याने त्यास दिल्लीचा काझी म्हणून नेमणूक केली. याने बातमीदारांकडून मिळालेली माहिती व आपल्या अनुभवाच्या आधारे 'तबकत–इ–नासिरी' हा ग्रंथ लिहिला. यामध्ये प्रत्येक राजवंशावर एक प्रकरण व एका राजावर एक उपविभाग लिहिला. या ग्रंथामध्ये दैववाद दिसून येतो, घटनांची कारणे शोधण्याचा प्रयत्न केलेला दिसत नाही. याचे स्वरूप निवेदनात्मक आहे.

- **याह्या–इब्न–अहमद–सरहिंदी**

याने 'तारीख–ए–मुबारकशाही' हा ग्रंथ लिहिला. हा सय्यद घराण्याच्या दरबारामध्ये काही वर्षे राहिलेल्या या इतिहासलेखकाने महंमद घोरीपासून इ.स.१४३४ पर्यंतच्या राजकिय घटनांची माहिती दिली आहे. यामधील फिरोज तुघलकपर्यंतचा इतिहास लिखित ग्रंथावरून लिहिला आहे. त्यानंतरचा इतिहास आपल्या अनुभव व अधिकृ त बातम्यांवरून लिहिलेला आहे. प्रत्येक राज्यकर्त्याची व सरदाराची माहिती स्वतंत्र प्रकरणात लिहिलेली आहे.

#### २. स्तुतीपर इतिहास

या प्रकारच्या इतिहासामध्ये उतबी यांच्या 'तारीख–इ–यामिनी' ग्रंथाचा समावेश होतो. यामध्ये महंमद गझनीची स्तूती केलेली आहे.

- **शमसुद्दीन सिराज अफीफ**

याने लिहिलेला 'तारीख-ए-फिरोजशाही' हा ग्रंथ महत्त्वाचा आहे. इतिहासकाराने केवळ घटनांची नोंद न करता तत्त्वचिंतक, शिक्षक व मार्गदर्शक असावे असे त्याचे मत होते. तो स्वता फिरोज तुघलकाच्या पदरी अधिकारी पदावर होता. त्याचे वडील महसूल मंत्रालयामध्ये अधिकारी पदावर होते. त्यामुळे त्यास प्रशासकी यंत्रणेची व कार्याची माहिती होती. त्याने फिरोज तुघलकाच्या कार्याची स्तुती केली. त्याबरोबरच फिरोजच्या राजकीय प्रभाव कमी होण्याची कारणेही सांगितली आहेत. परंतु मिळालेल्या माहितीची चिकत्सक पडताळणी करण्याचा प्रयत्न त्याने केल्याचे दिसत नाही.

**३. उपदेशपर व नैतिक मुल्यांचा पुरस्कार करणारे इतिहासलेखन**

यामध्ये झियाउद्दीन बरनी याने लिहिलेला 'तारीख-ए-फिरोजशाही' ग्रंथाचा समावेश होतो.

- **झियाउद्दीन बरनी**

एका सधन व प्रतिष्ठीत कुटुंबामध्ये जन्मलेल्या झियाउद्दीन बरनी अनेक वर्षे दरबारी वर्तुळात होता. त्याने नऊ सुलतानाचा कालखंड पाहिला. त्याने 'तारीख-इ-फिरोजशाही' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथामध्ये त्याने बल्बन ते फिरोजशहा पर्यंतचा इतिहास लिहिला आहे. फिरोजशहाच्या पहिल्या सहा वर्षाच्या कारकिर्दीचा इतिहास लिहिला आहे. यासाठी काही पूर्वीचे लेखन, स्वताचा अनुभव, आठवणी व सुक्ष्म निरीक्षणाचा आधार घेतला आहे. पुरावा म्हणून नातेवाईक व इतर व्यक्तीची वाक्ये दिलेली आहेत. यामध्ये तत्कालीन प्रशासकीय कामे, अर्थिक व्यवहार, व महसूलाचे उत्पन्न या बाबींची माहिती मिळते. याशिवाय तत्वज्ञ, कवी, मौलवी, वैद्य, व संतांची माहिती यामध्ये दिलेली आहे. इतिहासाचे उद्दिष्ट सत्य सांगणे व नैतिक धडे देणे आहे. इतिहासमध्ये नोंद केलेला अनुभव, घटना व उदाहरणे दिशा दर्शक असतात. त्यामुळे माणसांना ओळखण्याची दृष्टी मिळते, चांगल्या वाईटामधील फरक समजतो, व्यवहारीक माहिती मिळते. चांगले जीवन जगण्यासाठी इतिहासाचे अध्ययन केले पाहिजे असे त्याचे मत होते. मानवी जीवनातील इतिहासाचे महत्त्व सांगताना त्याने इतिहासाला शास्त्रांची राणी म्हणले आहे.

**४. काव्यात्मक, कलात्मक व साहित्यिक लिखाण**

या प्रकारच्या इतिहासलेखनामध्ये हसन निजामी, इसामी व अमीर खुस्रो यांच्या लेखनाचा समावेश होतो. हसन निजामी हा तेराव्या शतकामध्ये होऊन गेला. त्याने महंमद घोरीच्या लष्करी मोहिमा व विजयांचे वर्णन केले आहे. याने विषयाच्या सखोलतेपेक्षा अलंकारीक भाषेला महत्त्व दिले.

- **इसामी**

याने फतूहत-उस-सलातीन हा पद्यमय ग्रंथ लिहिला असून त्यामध्ये महंमद गझनी व महंमद घोरीच्या मोहिमांची माहिती दिली आहे. याशिवाय सुलतानांच्या दरबारातील कारस्थाने, राज्यकर्ते व सरदार वर्गाची जीवनपद्धतीची माहिती मिळते. परंतु यातील बरीचसी माहिती ऐकीव माहितीवर आधारीत आहे.

- **अमीर खुस्रो**

दिल्लीच्या दरबारातील हा प्रसिद्ध कवी निजामुीन औलियाच्या जवळचा होता. दिल्लीच्या सहा सुलतानांची कारकिर्दी त्याने पाहिल्या होत्या. त्याने ९० ग्रंथ लिहिले. यापैकी 'आशिका' या ग्रंथामध्ये त्याने खिज्रखान हा अल्लाउीन खिलजीच्या मुलगा व राजपूत राजकन्या यांच्या प्रेम कथेचे वर्णन केले आहे. दुसरा ग्रंथ 'नुहसिफिर' या ग्रंथामध्ये भारतातील लोक, त्यांचे जीवन, भाषा, भौगोलिक स्थिती व हवामानाचे वर्णन केले आहे. 'तुघलकनामा' हा त्याचा सर्वात महत्त्वाचा ग्रंथ मानला जातो. या ग्रंथामध्ये घियासुद्दिन तुघलकच्या यशस्वी मोहिमा, राज्यारोहण, उत्तर भारतातील भौगोलिक परिस्थिती, हवामान, हिंदूचे धार्मिक जीवन, श्रद्धा, चालीरिती, करमणुकीची साधने, ऋतू यांची माहिती मिळते. यामध्ये अलंकारीक भाषा व काव्यात्मक शैलीचा वापर केलेला आहे. या ग्रंथामध्ये विषयाच्या मांडणीतील सुसूत्रतेचा अभाव व कालगणनेतील संदिग्धता दिसून येते.

- **फेरीस्ता**

सोळाव्या शतकातील या इतिहासकाराने 'तारीख-इ-फेरिस्ता' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथामध्ये सुलतानशाहीचा बाराव्या शतकापासून सोळाव्या शतकापर्यंत राजकीय इतिहास लिहिला आहे.

- **सुलतानशाहीतील इतिहासलेखन परंपरेची वैशिष्ट्ये**

१. या काळातील इतिहासकार प्रतिष्ठित कुटुंबातील व चांगले शिक्षण घेतलेले व विद्वान होते. राज्यकर्ते, दरबारी लोकांच्या जवळचे, राजिकय वर्तुळामध्ये वावरणारे व लौकिक जीवनात रमणारे असल्याने त्यांनी लेखनामध्ये माणसाच्या कार्य कर्तृत्त्वावर भर दिला.

२. लेखनाचे विषय प्रामुख्याने राजकीय आहेत.

३. इतिहासलेखकांना मिळालेल्या राजाश्रयामुळे लेखनामध्ये आश्रयदात्याची स्तुती आढळते.

४. इतिहासलेखनामागे धडे देणे, मार्गदर्शन देणे, उपदेशाद्वारे नीतीमूल्ये शिकविणे हे हेतू दिसतात.

५. इतिहासलेखनामध्ये घटनाक्रम व कालगणनेचे जाणीव दिसते.

६. घटनांची तर्कशुद्ध व सुसंगत मांडणी व घटनांचा अन्योन्य संबंध निर्माण करून कार्य कारणभाव सांगण्याचा अभाव दिसतो.

७. या काळातील बहुतांश इतिहासलेखक घटनांचे प्रत्यक्ष साक्षीदार असल्याने माहितीमध्ये विश्वसनीयता बरीच दिसते. परंतु ऐकीव माहितीची चिकित्सक पडताळणी केल्याचे दिसत नाही.

या काळातील इतिहासलेखनाचे स्वरूप संशोधनात्मकतेऐवजी निवेदनात्मक आहे.

- **मुघलकालीन इतिहासलेखन परंपरा**

मुघलकालीन इतिहासलेखन परंपरेमध्ये विविधता व वस्तुनिष्ठता आली. लेखन परंपरेमध्ये परिपक्वता, प्रगल्भता आली. इतिहासलेखनामध्ये जीवनाच्या विविध अंगाची दखल घेण्यात आली. काही इतिहासलेखकांनी स्वतंत्र वृतीने लेखन केले. याकाळामध्ये आत्मचरित्र हा इतिहालेखनाची नवीन परंपरा सुरू

झाली. इतिहासलेखन परंपरेला आवश्यक असलेले साधनसामग्री तयार झाली. सोळाव्या शतकामध्ये अनेक विद्वान इराणी उलेमा भारतामध्ये आले. त्यांनी पर्शियन विद्येचा, भाषेचा पुरस्कार केला. राज्यककर्त्यांनी पर्शियन भाषेमध्ये लेखन करण्यास प्रोत्साहन दिले. पर्शियन भाषा उच्चवर्गीय प्रतिष्ठांची भाषा बनली. मुघलकाळमध्ये इतिहासलेखन परंपरेचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केले जाते.

१) आत्मचरित्रे, २) दरबारी लेखकांचे अधिकृ त इतिहास, ३) खाजगीरित्या लिहिलेले अनधिकृत इतिहास, ४) सर्वसामान्य इतिहास, ५) सुफी संतांची चरित्रे.

**१) आत्मचरित्रे :**

हा इतिहासलेखन परंपरेतील नवीन प्रवाह वैशिष्टयपूर्ण आहे. राज्यकर्त्यांनी हा प्रवाह सुरू केला. यामध्ये प्रामाणिकपणे केलेले निवेदन आढळते. 'तुझूक-इ-बाबरी' आणि 'तुझुक-इ-जहांगिरी' या ग्रंथांचा यामध्ये समावेश होतो.

**अ) तुझुक-इ-बाबरी :**

बाबरने हा ग्रंथ तुरानी पर्शियन भाषेत लिहिला. यातून बाबराचे व्यक्तीमत्त्वाचे दर्शन दिसून येते. त्याने या ग्रंथामध्ये भारतामधील हवामान व लोकांविषयी स्पष्टपणे नापसंती दाखविली आहे. स्थान व काळाच्या चौकटीमध्ये त्याचे लेखन आहे. त्याची विषयाची मांडणी सुसंगत असून त्याच्या निवेदनामध्ये तुटकपणा जाणवतो. यातील भाषा ओघवती, सोपी व पारदर्शक आहे.

**ब) तुझूक-इ-जहांगिरी :**

जहांगिरने लिहीलेल्या या आत्मचरित्रामध्ये पहिल्या बारा वर्षाचा इतिहास आहे. आपल्यातील असणारे दोष त्याने प्रमाणिकपणे कबूल केलेले आहेत. अबुल हसनच्या हत्याची जबाबदारी त्याने स्वीकारली परंतु नुरजहॉं, खुस्रो व शेर अफगाण यांच्याबाबत उल्लेख केलेला नाही. यामध्ये तत्कालीन राजकीय, प्रशासकीय व लष्करी मोहिमांची माहिती दिलेली आहे. वेगळया समाजगटातील सांस्कृतिक जीवनाचे वर्णन केले आहे. यावरून जहांगरिची सूक्ष्म निरक्षिण शक्ती व निवेदन कौशल्य दिसून येते.

**२) दरबारी अधिकृत इतिहासलेखन परंपरा :**

अकबर ते शहाजहान यांच्या काळामध्ये सम्राटांच्या सांगण्यावरून बरेच इतिहासलेखन झाले आहे. यामध्ये पुढील इतिहासलेखकांचा व ग्रंथांचा समावेश होतो.

**अ) तारीख-इ-आल्फी :**

अकबराने इस्लामच्या विकासाचा एक हजार वर्षाचा इतिहास लिहीण्याचे काम इतिहासकारांच्या एका गटाकडे दिले. त्यांनी 'तारीख-इ-आल्फी' हा ग्रंथ लिहीला. यामध्ये इ.स. १५९१ पर्यंतचा इतिहास लिहिला आहे. यामध्ये कालक्रम असून प्रत्येक वर्षानुसार घटनांची नोंद करण्यात आली आहे.

**ब) ख्वाजा निजामुीन अहमद :**

याने इ.स. १५९३ मध्ये 'बकत-इ-अकबरी' हा ग्रंथ लिहिला. यामध्ये अकबराच्या अडतीस वर्षाच्या कारकिर्दीचा इतिहास लिहिला आहे. अकबराच्या ताब्यात असलेल्या नऊ प्रदेशांची माहिती या ग्रंथामध्ये मिळते. यामध्ये व्यक्तीपेक्षा घटनांवर भर दिलेला आहे. लिखाणाचे स्वरूप चिकित्सक नसून निवेदनात्मक आहे. प्रादेशिक इतिहास म्हणून या ग्रंथाला महत्त्वाचे स्थान आहे.

**क) बदायूनी :**

याचे मूळ नाव मुल्ला अबूदर कादर असून बदायुनी म्हणून प्रसिद्ध आहे. बदाऊनचा राहणारा लेखक विद्वान धर्मशास्त्रज्ञ होता. त्याच्या विद्वत्तेने प्रभावित होऊन अकबराने त्याची इमाम पदी नेमणूक केली. वतन म्हणून एक हजार जमीन दिली. इस्लामचा कट्टर अनुयायी असलेल्या बदायूनीला अकबराचे धार्मिक धोरण मान्य नव्हते. अकबराशी अबुल फजलची असणारी जवळीकमुळे अबुल फजल विषयी प्रतिकूल मत बनले. त्याने 'मुन्तखब-उल-लुबब' हा ग्रंथ लिहिला. यामध्ये त्याने अकबर व अबुल फजल यांच्यावर कठोरपने टिका केली आहे. हा ग्रंथ तीन भागामध्ये लिहिलेला असून पहिल्या भागामध्ये हूमायून व शेरशहाची माहिती आहे. दुस-या भागामध्ये अकबराच्या चाळीस वर्षाच्या कारकिर्दीची माहिती व त्याच्याविषयीची मते स्पष्टपणे मांडली आहे. तिस-या भागात समकालीन कवी, तत्त्वज्ञ, धर्मगुरू यांची चरित्रे आहेत. विरोधकांवर त्याने अत्यंत खालच्या पातळीची भाषेमध्ये टिका केली आहे.

**ड) अबुल फजल :**

इ.स.१५७४ मध्ये अकबराच्या दरबारामध्ये विद्वतेमुळे याला प्रवेश मिळाला. आपल्या विद्वतेने तो अकबराच्या विश्वासास पात्र ठरला. दरबारातील राजकारणामध्ये व लष्करी मोहिमांमध्ये सक्रिय राहिला. अकबराचा हा सर्वात जवळचा सल्लागार होता. तो उदार व धर्मसहिष्णू होता. त्याचे 'अकबरनामा' व 'ऐने अकबरी' हे ग्रंथ महत्त्वाचे आहेत. या ग्रंथातून अकबरकालीन सामाजिक परिस्थिती, प्रशासकीय व्यवस्था व राजकिय घडामोडींवर प्रकाश टाकण्यात आला आहे. अकबरनाम्यामध्ये बाबर, हुमायून व अकबरच्या ४६ वर्षाचा राजकिय इतिहास सांगितला आहे. दुसऱ्या भागामध्ये त्याने इतिहासाबाबत आपली मते मांडली आहेत. इतिहासाला तो शास्त्रांचा मोती म्हणतो. त्याच्या लेखनामध्ये हिंदूच्या धार्मिक निष्ठा, सामाजिक रूढी परंपरांची माहिती दिलेली आहे. अबुल फजलचा ऐने अकबरी हा ग्रंथ अकबराच्या प्रशासन यंत्रणेची माहिती देतो. अकबरच्या आदेशानुसार लिहिलेल्या ग्रंथासाठी सर्व कागदपत्रे पुरविण्याचा आदेश अकबरने दिला होता. त्यामुळे हा ग्रंथ मूळ कागदपत्रांवर आधारलेला आहे. हा ग्रंथ पाच भागामध्ये लिहिलेला असून साम्राज्याच्या उत्पन्नाची साधने, महसूल पद्धत, खर्चाच्या बाबी, बाजारातील वस्तूंच्या किंमती, लोकसंख्या, अधिकार पदे, अधिकाध्यांची कर्तव्ये व सम्राटाचे आदेश याबाबतची माहिती या ग्रंथामध्ये मिळते. ऐतिहासिक साधनांविषयी शास्त्रीय दृष्टी, माहितीचे चिकित्सक परिक्षण, इतिहासाविषयीची बुद्धीनिष्ठ दृष्टी, सुसंगत मांडणी, कालगणनेची निश्चिती, साधनांची चिकित्सक तिंाळणी करून केलेले लेखन हे पर्शियन इतिहासलेखन परंपरेला दिलेले महत्त्वपूर्ण योगदान होय.

**इ) मुतामतखान :**

अकबरनंतर सत्तेवर आलेला जहांगीरने मुतामतखानास इतिहासलेखन करण्यास सांगितले. मुतामतखानाने 'इकबालनामा-इ-जहांगिरी' हा ग्रंथ लिहिला. ख्वाजा याने मासीरी जहांगीरी या ग्रंथामध्ये जहांगीरच्या कारकिर्दीची माहिती दिली आहे.

**ई) मिर्झा अमीन काझवान :**

शहाजहानने मिर्झा अमीन काझवीन यास इतिहासलेखन करण्यास सांगितले. परंतु त्याचे काम पसंतीस न उतरल्याने ते काम हमीद लाहोरीकडे देण्यात आले. हमीद लाहोरी याने 'पादशहानामा' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथामध्ये शहाजहानच्या वीस वर्षाच्या कारकिर्दीतील राजकिय घडामोडी, सामाजिक, अर्थिक व सांस्कृ तिक परिस्थितीची माहिती दिलेली आहे.

याच काळामध्ये इनायतखान याने 'शहाजहाँनामा' हा ग्रंथ लिहिला. यामध्ये बाबरपासून १६५७ पर्यंतची राजकिय माहिती मिळते. इतिहासलेखनाला विरोध असणाध्या औरंगजेबाने नंतर महंमद कासीम याला लेखन कारण्यास सांगितले. परंतु ते लेखन न आवडल्याने लेखन बंद करण्यास सांगितले. हा ग्रंथ 'आलमगीरनामा' म्हणून प्रसिद्ध आहे. यामध्ये औरंगजेबाच्या कारकिर्दीची अकरा वर्षाचा इतिहास आहे.

**३) खाजगीरीत्या लिहिलेले अनाधिकृत इतिहालेखन परंपरा**

महंमद साकी मुस्तेद याने शासकीय कागदपत्रांच्या साह्याने 'मासीरी आलमगिरी' हा ग्रंथ लिहीला. यामध्ये औरंगजेबाच्या एक्कावन्न वर्षाच्या कारकिर्दीचा इतिहास लिहिला आहे. याला राजज्ञा नसल्याने त्यामध्ये वस्तूनिष्ठता आलेली आहे.

**अ) खाफीखान :**

औरंगजेबाच्या समकालीन असणारा महंमद हशीम अली खान हा खाफीखान म्हणून ओळखला जातो. त्याने 'मुन्तखाब-उल-लुबाब' हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ 'तारीख-इ-खाफीखान' असेही म्हटले जाते. इ.स. १६८८ मध्ये तो मुगल दरबारामध्ये आला. औरंगजेबाच्या दक्षिण मोहिमेमध्ये तो हजर होता. फारूखशियरच्या काळात तो दिवाण होता. तीन भागामध्ये लिहिलेल्या या ग्रंथामध्ये घटनांची नोंद सुक्ष्मपणे केलेली आहे. महंमद घोरीच्या भारतावरील आक्रमणापासून इ.स. १७३३ पर्यतच्या घटना यामध्ये सांगितलेल्या आहेत. औरंगजेबकालीन इराणी तुराणी संघर्ष, मनसबदारीमध्ये औरंगजेबाने केलेल्या सुधारणा, केंद्रीय मुघल शासन व्यवस्था, मुघल मराठा संघर्ष याबाबतचे वर्णन यामध्ये केले आहे. याने औरंगजेबाची स्तुती केली आहे. शिवाजी महाराजांच्या धार्मिक व स्त्रीविषयक धोरणाची स्तुती केलेली आहे. इतिहालेखनामध्ये घटनाक्रम असावा व इतिहासकाराने प्रामाणिकपणे व निरूपक्षपातीपणे सत्य निवेदन केले पाहिजे असे त्याचे मत होते.

**ब) महंमद कासीम :**

याने 'अहवाल-उल-खवाकीन' हा ग्रंथ लिहिला. हा निजामउलमुल्कचा तो बक्षी होता. या ग्रंथामध्ये त्याने औरंगजेबाच्या मृत्यूनंतरच्या ३९ वर्षाचा इतिहास लिहिलेला आहे. तो स्वतः याकाळातील घटनांचा साक्षीदार आहे. त्याने घटनांच्या निवेदनाबरोबरच घटनांची कारणेही सांगितली आहेत.

- **भिमसेन ब-हाणपुरी**

औरंगजेबाच्या दरबारी हा होता. त्याने 'नुस्का-इ-दिलकुशा' हा ग्रंथ लिहिला. नोकरी निमित्त त्या साम्राज्याच्या निरनिराळ्या भागामध्ये प्रवास केला. औरंगजेबाची हिंदूंच्या दृष्टिकोणातून लिहिलेली आहे. औरंगजेबाच्या दक्षिण मोहिमेमधील अनेक आतील बाबींवर त्याने प्रकाश टाकलेला आहे. ईश्वरदास नागर याने 'फातुहत-इ-आलमगिरी' या औरंगजेबाच्या कारकिर्दीवर ग्रंथ लिहिला.

- **मुघलकालीन इतिहालेखन परंपरेची वैशिष्टे**

१. या काळातील इतिहासकार शासकीय सेवेतील, प्रतिष्ठित कुटुंबातील विद्वान व व्यासंगी होते. त्यांच्या लेखनामध्ये परिपक्वता व प्रगल्भता आढळून येते.

२. या काळतील लेखनामध्ये धार्मिक दृष्टिकोनाचा प्रभाव दिसत नाही. मानवी कृतीवर भर दिलेला दिसून येतो. घटनांच्या वस्तूनिष्ठ नोंदी केलेल्या आहेत.

३. समकालीन घटनांची नोंद, प्रत्यक्ष साक्षीदार व मूळ साधनांची उपलब्धता यामुळे लेखनामध्ये वास्तवता आलेली आहे.

४. दरबारी अधिकृत इतिहालेखनाचे स्वरूप प्रशंसापर व पक्षपाती तर दरबारी अनाधिकृत इतिहासलेखनामध्ये विचार व मते मोकळेपणाने मांडली आहेत.

५. इतिहासलेखनामध्ये काही ठिकाणी सत्याचा अपलाप जाणवतो

६. इतिसलेखनाचे विषय राजकिय असले तरी तत्कालीन अर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक बाबींवरही प्रकाश टाकलेला आहे

७. कालगणनेचा अचूक वापर केलेला आहे.

८. घटनांची सुसंगत मांडणी केली असली तरी त्यामधील त्यांची तर्कशुद्ध संगती लावण्याचा व त्यामागील कारणे सांगण्याचा जाणून बुजून कोणी प्रयत्न केल्याचे जाणवत नाही.

**स्वयंअध्ययन प्रश्न क्र ३**

**अ. योग्य तो पर्याय निवडून पुन्हा वाक्य लिहा.**

१. पुराणांची एकूण संख्या ........... आहे.

अ) १८ ब) १६ क) ३६ ड) २६

२. पुराणांची रचना ........... यांनी केल्याचे समजले जाते.

अ) वेद व्यास    ब) कौटिल्य    क) वाल्मिकी    ड) अगस्त्य

३. ‘तुघलकनामा’ हा ग्रंथ ............. याने लिहिला.

अ) अमीर खुस्रो    ब) खाफिखान    क) फेरिस्ता    ड) हसन निजामी

४. खाफीखान हा इतिहासकार ................ च्या दरबारात होता.

अ) शहाजहान    ब) अकबर    क) औरंगजेब    ड) जहांगीर

५. ‘अकबरनामा’ हा ग्रंथ ............. याने लिहिला.

अ) ईश्वरदास नागर    ब) अबुल फजल    क) मुतामत खान    ड) महंमद कासीम

**ब. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. पुराणे कोणाला समर्पित केली आहेत?

२. राजकीयदृष्ट्या कोणती पुराणे महत्त्वाची आहेत?

३. सुलतानशाहीतील इतिहासलेखन परंपरेमध्ये कशाची जाणीव दिसते.

४. छ. शिवाजी महाराजांच्या धार्मिक धोरणाची कोणत्या मुघल इतिहासकाराने स्तुती केली आहे.

५. मुघल इतिहासलेखन परंपरेमध्ये कशाचा अचूक वापर केला आहे?

## १.३ सारांश

इतिहासलेखन परंपरेचा आढावा घेताना असे दिसून येते की प्रारंभीच्या काळी मौखिक स्वरूपामध्ये असलेला इतिहासाला कल्पकतेचे स्वरूप होते. ग्रीक इतिहासकारांनी इतिहासाला पुराव्याच्या आधारे इतिहालेखन करून इतिहासाला शास्त्रीय स्वरूप देऊन त्यामध्ये वस्तूनिष्ठता आणली. इ.स. पाचव्या शतकामध्ये इतिहासलेखनामध्ये कथातून सत्य घटनांचे वर्णन करण्याची परंपरा सुरू झाली. याकाळात सत्या सांगण्याबरोबरच घटनाक्रमाला महत्त्व दिले. याकाळमध्ये राजकीय घटनांबरोबरच सामाजिक व अर्थिक जीवनालाही महत्त्व दिले गेले.

रोमन इतिहासलेखन परंपरेमध्ये इतिहासाला शैक्षणिक मुल्य असल्याची धारणा सुरू झाली. त्यामुळे या इतिहालेखन परंपरेमध्ये राष्ट्रप्रेमाचे नितीमूल्यांचे व उत्तम नागरीकाला आवश्यक असलेल्या गुणांचे धडे देण्याची परंपरा सुरू झाली. परंतु रोमन इतिहालेखनामध्ये शास्त्रीय पद्धतीची आवश्यकता दिसत नाही. या इतिहालेखन परंपरेमध्ये वैचारिक बैठकीचा अभाव आढळतो. या परंपरेमध्ये चरित्रलेखनाची परंपरा सुरू झाली.

अरब इतिहासलेखन परंपरेवर पर्शियन इतिहासलेखनपरंपरेचा प्रभाव दिसून येतो. या इतिहासलेखनपरंपरेमध्ये लौकिक जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहिले गेले. या परंपरेमध्ये एकसूत्री कालगणना पद्धतीचा वापर सुरू झाला. इतिहालेखन परंपरेला सत्याचा आधार देणारे, साधनांची पडताळणी करणारे तंत्र अरबांनी विकसित केले. ही अरबांची इतिहालेखन परंपरेला मिळालेली मोठी देणगी आहे.

भारतीय इतिहासलेखन परंपरा फार उशिरा सुरू झाली. प्राचीन काळातील भारताचा इतिहास वेद, उपनिषदे, आरण्यके व पुराणे यातून शोधावा लागतो. परंतु यातील घटनांची पुराव्या अभावी पडताळणी करता येत नाही. याचे स्वरूप काव्यात्मक असून यामध्ये दंतकथा ही असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे पुराणांना शास्त्रीय आधार नाही. तरीही यामधून तत्कालीन सामाजिक, राजकीय, अर्थिक व सांस्कृतिक स्थिती समजते.

भारतामधील पर्शियन इतिहासलेखन परंपरेमध्ये सुलतानशाही व मुघलकालीन इतिहासलेखन परंपरा असे दोन भाग पडतात. सुलतानांनी इतिहासकारांना राजाश्रय दिला. परंतु घटनांची तर्कशुद्ध मांडणी, घटनांचा सबंध जोडून त्याची कारण मीमांसेचा अभाव जाणवतो. बहुतेक इतिहासकार घटनांचे प्रत्यक्ष साक्षीदार होते. त्यामुळे माहिती बऱ्याच अंशी विश्वसनीय आहे. परंतु ऐकीव माहितीची शहानीशा केलेली दिसत नाही. त्यामुळे इतिहासलेखनाचे स्वरूप निवेदनात्मक झाले आहे. मुघलकालीन इतिहासलेखन परंपरेमध्ये घटनांच्या वस्तूनिष्ठता दिसते. या काळातील सम्राटांच्या प्रेरणेने लिहिलेला इतिहास स्तुतीपर व पक्षपाती आहे. या काळातील इतिहासलेखनातून राजकिय विषयाबरोबर आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक बाबींवरही प्रकाश पडतो. यामधील कालगणना अचूक आहे या काळामध्ये आत्मचरित्र व प्रवासवर्णन ही इतिहालेखनामध्ये नवीन परंपरा सुरू झाली.

## १.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१. कालक्रम - काळानुसार मांडणी करणे

२. वस्तूनिष्ठता - सत्यता

३. कालगणना - काळ मोजणे

४. हिजरी - इस्लामी कालगणना

५. पपायरसे - इजिप्त मधील कागद

## १.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न -१**

अ. योग्य तो पर्याय निवडून पुन्हा वाक्य लिहा

१. अ) इलियड २. क) हिरोडोटस ३. अ) पॉलिबियस

४. ब) कॅटो ५. अ) हिस्ट्री अफ रोमन

ब. एका वाक्यात उत्तरे लिहा

१. हिरोडोटस २. थ्यूसीडीडीज ३. पॉलिबियस

४. कॉर्नोलियस टॅसिटस ५. ज्यूलिअस सीझर

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – २**

अ. योग्य तो पर्याय निवडून पुन्हा वाक्य लिहा

१. अ) सातव्या २. ब) अल वकीदी ३. क) इब्न बुतता

४. अ) इब्न खल्लीखान ५. ब) अल बिरूनी

ब. एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. किताब अल इबर २. किताब उल हिंद ३. पर्शियन

४. अल बहादूरी ५. अल खल्दून

**स्वयंअध्ययन प्रश्न क्र–३**

अ. योग्य तो पर्याय निवडून पुन्हा वाक्य लिहा.

१. क) १८ २. वेद व्यास ३. अ) अमीर खुस्रो

४. क) औरंगजेब ५. ब) अबुल फजल

ब. एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. देवदेवतांना २. विष्णूपुराण, मत्सपुराण, ब्रह्मांडपुराण

३. घटनाक्रम व कालगणना ४. खाफीखान ५. कालगणना

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) टिपा लिहा.

१) हिरोडोटस २) पॉलिबियस

३) अबुल फजल ४) अमीर खुस्त्रो

५) खाफीखान

ब) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१) ग्रीक इतिहासलेखन परंपरेचा आढावा घ्या.

२) रोमन इतिहासलेखन परंपरेचा आढावा घ्या.

३) अरब इतिहासलेखन परंपरेची चर्चा करा.

४) सुलतानशाही काळातील इतिहासलेखन परंपरेचे महत्त्व विशद करा.

५) भारतीय पुराणांची महत्वाची वैशिष्टे सांगा.

६) मुघल इतिहासलेखन परंपरेचे महत्त्व सांगा.

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००५

२. सरदेसाई बी. एन., इतिहासलेखनशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२

3. B. Sheikh Ali, History: Its Theory and Method, Macmillan, 1978

4. Godolphin, F. R. B. Ed. The Greek Historians, Vol.I, New York, 1942.

5. Westlake, H. D. Individuals in Thucydides, London, 1968.

6. Woodhead, A. G. Thucydides on the Nature of Power, Cambridge (Mass.), 1970.

7. https://vishwakosh.marathi.gov.in/21002/


❑❑❑

# घटक २
# इतिहासातील नवीन दृष्टीकोण
(New Approaches in History)

**अनुक्रमणिका**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ सांस्कृतिक इतिहास, पर्यावरण इतिहास: (Cultural History, Environmental History)

२.२.२ सूक्ष्म इतिहास, समकालीन इतिहास: (Micro History, Contemporary History)

२.२.३ स्थानिक इतिहास, मौखिक इतिहास: (Local History, Oral History)

२.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.४ स्वय-अध्ययन प्रश्न व प्रश्नांची उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनसाठीची पुस्तके

## २.० उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास खालील माहिती स्पष्ट करता येईल.

१. सांस्कृतिक इतिहास म्हणजे काय ते सांगता येईल.

२. पर्यावरण इतिहासाची संकल्पना स्पष्ट करता येईल.

३. सूक्ष्म इतिहासाचा दृष्टीकोण स्पष्ट करता येईल.

४. सूक्ष्म इतिहास लेखनाचा उदय, विकास, फायदे व तोटे सांगता येतील.

५. समकालीन इतिहासाची संकल्पना स्पष्ट करता येईल.

६. समकालीन इतिहासाचा उदय, विकास, फायदे व तोटे स्पष्ट करता येतील.

७. स्थानिक इतिहासलेखनीची संकल्पना स्पष्ट करता येईल.

८. स्थानिक इतिहासाचा उदय, विकास, फायदे व तोटे स्पष्ट करता येईल.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ सांस्कृतिक इतिहास, पर्यावरण इतिहास (Cultural History, Environmental History)

#### अ) सांस्कृतिक इतिहास (Cultural History)

सांस्कृतिक इतिहास प्रवाह अथवा अभ्यास हा अतिशय क्लिष्ट आणि राजकीयदृष्ट्या गुंतागुंतीचे आंतरविद्याशाखीय संशोधन क्षेत्र आहे, विशेषतः समकालीन संस्कृतीची गतिशीलता आणि त्याचे सामाजिक, ऐतिहासिक मूळ शोधण्याचा प्रयत्न करते. सांस्कृतिक इतिहास संशोधक सामान्यत: सामाजिक घटनांशी निगडित, अथवा त्याद्वारे चालवल्या जाणाऱ्या विविध शक्तीच्या व्यापक प्रणालींशी सांस्कृतिक पद्धतींचा संबंध कसा आहे याचा शोध घेण्याचा प्रयत्न करतो. जसे की, विविध विचारधारा, वर्ग संरचना, राष्ट्रीय रचना, वांशिकता, लैंगिक प्रवृत्ती, लिंग, पिढी इत्यादीचा यामध्ये समावेश होतो. सांस्कृतिक विश्लेषणाचा उपयोग करून, सांस्कृतिक अभ्यास संस्कृतींना निश्चित, बंधनकारक, स्थिर व स्वतंत्र घटक म्हणून पाहत नाही, तर त्याऐवजी सतत संवाद साधणारे, पद्धती आणि प्रक्रियांचे संच बदलत असतात. सांस्कृतिक अभ्यासाच्या क्षेत्रात सैद्धांतिक, पद्धतशीर दृष्टीकोन आणि पद्धतींचा समावेश आहे. जरी सांस्कृतिक इतिहास मानववंशशास्त्र आणि वांशिक अभ्यासाच्या आंतरशाखीय क्षेत्रापासून वेगळे असले तरी, सांस्कृतिक अभ्यासक या प्रत्येक क्षेत्राकडे आकर्षित होतात.

#### १) सांस्कृतिक इतिहास म्हणजे काय? :

सांस्कृतिक इतिहास एका विशिष्ठ समूहाच्या वैशिष्ट्यपूर्ण जीवनाचा अभ्यास करणारा नवीन इतिहासलेखन प्रवाह आहे. मूलत: सांस्कृतिक इतिहास ही जी संकल्पना आहे ती इतिहास आणि मानवंशास्त्र या दोन्ही विद्याशाखांच्या संशोधन पद्धतींना एकत्र आणते. सांस्कृतिक इतिहासामध्ये ज्या प्रकारे अभिजन वर्गांच्या कला, स्थापत्याचा अभ्यास केला जातो, त्यापेक्षाही अधिक सर्वसामान्य लोकांच्या सामूहिक अभिव्यक्तींचा विचार केला जातो. यामध्ये समूहाचे दृष्टिकोन, भाषा, सण, समारंभ, उत्सव, जत्रा-यात्रा, संगीत, श्रध्दाविश्व कीर्तन, भजन, भारुड, आहार-विहार, विविध सवयी, पेहराव, पोशाख, अलंकार, उपजीविकेची साधने दशावतारासारखे खेळ इत्यादी सारख्या अगदी क्षुल्लख वाटणाऱ्या बाबींचा अभ्यास केला जातो. याशिवाय त्यांच्या विविध कला, साहित्य, विज्ञानामध्ये झालेल्या प्रगतीचा देखील विचार केला जातो. सामाजिक जीवनातील सत्ता संघर्ष, त्यांची वैचारिक भूमिका, वर्गसंबंध, अस्मिता, दृष्टिकोन आदींचा अभ्यास केला जातो. सांस्कृतिक इतिहासलेखन प्रकारात विविध पारंपारिक सांस्कृतिक दृष्टिकोनबरोबरच अलिकडच्या काळातील टिव्ही, रेडिओ, वृत्तपत्रे, पोस्टर्स, चित्रपट, इंटरनेट यासारख्या समाज माध्यमांचादेखील सांस्कृतिक इतिहासामध्ये समावेश होऊ लागलेला आहे, कारण, ही माध्यमं एका समूहाची विशिष्ठ सांस्कृतिक धारणा बनवण्यासाठी फार महत्वाची भूमिका बजावताना दिसतात.

सांस्कृतिक इतिहास लेखन आणि इतिहासातील इतर लेखन प्रकारातील फरकही लक्षात घेणं गरजेचं आहे. लोकसंख्याक इतिहासामध्ये ज्या प्रकारे कुटुंब, विवाहाच्या वयातील बदल लक्षात घेतले जातात

त्याचप्रमाणे सांस्कृतिक इतिहासलेखन प्रवाहामध्ये देखील या बाबी बरोबर कुटुंबातील विविध घटकांच्या धारणा, एकमेकांतील संबंध, ताण-तणाव, वाद-विवाद, समस्यांना प्रतिसाद देण्याची वृत्ती, लैंगिकता इत्यादी सारख्या असंख्य इतर बाबींचा देखील गांभीर्याने विचार केला जातो. पारंपरिक धर्मिक इतिहासलेखन प्रवाहामध्ये एखाद्या धर्माचे तत्वज्ञान, अध्यात्म इत्यादी संकल्पनांचा अभ्यास केला जातो त्याच प्रमाणे सांस्कृतिक इतिहासालेखनामध्ये कोणकोणत्या माध्यमातून एखादा धर्म लोकांच्यापर्यंत पोहचतो याचा विचार करतो, जसे की कला, स्थापत्य, साहित्य, प्रवचनं, किर्तनं, जत्रा-यात्रा, सण-उत्सव इत्यादी घटकांचा बारकाईने अभ्यास केला जातो. याशिवाय धर्माकडे लोक कशा पध्दतीने पाहतात, धर्माची संस्था कशी बनते, धर्मातील अर्थकारण आदीचा अभ्यास होतो. कला इतिहासलेखन प्रकारात केवळ कलेचा इतिहास अभ्यासला जातो, तर सांस्कृतिक इतिहासामध्ये कलेबरोबरच त्या कलेचे विविध सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, सौदर्य विषयक संदर्भ अथवा एखादी कला विशिष्ट लोकांतून कशी उदयाला आली अथवा त्या कलेतील सामाजिक संकेत इत्यादी बाबींचा देखील अभ्यास होतो. सांस्कृतिक अभ्यास (Cultural Studies) अशी विद्याशाखाच विविध ठिकाणी स्थापन होऊ लागलेली आहे. यामध्ये विविध समाजाची संस्कृती अभ्यासली जाते. इतिहासाबरोबरच, साहित्य, चित्रपट, तत्वज्ञान, मानवशास्त्र इ. विविध अंगाने हा अभ्यास केला जातो. यामध्ये, एखाद्या समूहाच्या कृतीमागे, त्या समूहाच्या संस्कृतीतील विविध संकल्पना (लिंगभाव, अस्मिता, धारणा) कसे प्रभाव टाकतात हे अभ्यासले जाते.

**२) विविध दृष्टीकोन प्रतिबिंबित करणाऱ्या सांस्कृतिक अभ्यासातील काही प्रमुख संकल्पना :**

सांस्कृतिक अभ्यास/संशोधक, अभ्यास गट आणि संस्था यांच्यातील परस्परसंवादाद्वारे सांस्कृतिक पद्धती, अर्थ आणि ओळख सतत वाटाघाटी, स्पर्धा रूपांतरित कसे होतात याचे परीक्षण करतात. हा दृष्टीकोन संस्कृतींमधील गुंतागुंत, विरोधाभास आणि संकरितता प्रकाश टाकतो.

१) संकरितता: (Hybridity) विविध सांस्कृतिक रूपे आणि पद्धती यांचे मिश्रण.

२) आंतरविभागीयता: (Intersectionality) भिन्न सामाजिक श्रेणींमधील संवाद आणि परस्परसंवाद (उदा. वंश, वर्ग, लिंग, लैंगिकता).

३) सांस्कृतिक प्रवाह: कल्पना, प्रतिमा आणि पद्धतींचे जागतिक अभिसरण.

४) ओळख निर्मिती: जटिल प्रक्रिया ज्याद्वारे व्यक्ती आणि समूह त्यांची सांस्कृतिक ओळख तयार करतात.

सांस्कृतिक अभ्यास हे एक वैविध्यपूर्ण आणि आंतरविद्याशाखीय क्षेत्र आहे जे विविध सैद्धांतिक आणि पद्धतशीर दृष्टिकोनांवर आकर्षित करते,

१) मार्क्सवाद

२) उत्तर संरचनावाद व उत्तर आधुनिकतावाद

३) स्त्रीवाद आणि लिंग अभ्यास

४) वसाहतवाद आणि उत्तर-वसाहतवाद

५) माध्यम आणि संप्रेषण अभ्यास

सांस्कृतिक अभ्यास हे सांस्कृतिक मानववंशशास्त्राला देखील छेदतात, जे संस्कृतींच्या वांशिक अभ्यासावर लक्ष केंद्रित करतात, जे उपेक्षित वांशिक गटांच्या अनुभवांचे व सांस्कृतिक उत्पादनांचे परीक्षण करतात.

सांस्कृतिक अभ्यास या क्षेत्रांमध्ये काही समान दुवे देखील की, त्याचे स्वतःचे वेगळे लक्ष आहे:

१) सांस्कृतिक शक्ती गतिशीलता आणि संबंध

२) सांस्कृतिक ग्रंथ आणि प्रतिनिधित्व (उदा. माध्यम, साहित्य, कला)

३) ओळख निर्मिती आणि कार्यक्षमता

४) सांस्कृतिक उपभोग आणि दैनंदिन जीवन

५) जागतिकीकरण आणि आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक प्रवाह

**३) सांस्कृतिक अभ्यासाची वैशिष्ट्ये :**

प्राच्यविद्या अभ्यासक झियाउद्दीन सरदार यांनी त्यांच्या 'इंट्रोड्युसिंग कल्चरल स्टडीज' या ग्रंथात सांस्कृतिक अभ्यासाची खालील पाच मुख्य वैशिष्ट्ये नमूद केलेली आहेत; ती पुढील प्रमाणे,

१) सामाजिक आणि राजकीय संदर्भ लक्षात घेऊन संस्कृतीला तिच्या सर्व गुंतागुंतीमध्ये समजून घेण्याचा प्रयत्न करतो.

२) राजकीय समालोचनासह अभ्यास आणि विश्लेषण एकत्र करते, संशोधनाला मोठ्या राजकीय प्रकल्पांशी जोडते.

३) ज्ञानाच्या तयार केलेल्या विभागांना उघड करते आणि आव्हान देते, ते निसर्गापेक्षा शक्तीच्या गतिशीलतेमध्ये कसे रुजलेले आहेत हे उघड करते.

४) सांस्कृतिक पद्धतींचे नैतिक परिणाम लक्षात घेऊन आधुनिक समाजाचे नैतिक मूल्यमापन करण्यासाठी वचनबद्ध आहे.

५) सत्तेच्या संबंधात सांस्कृतिक पद्धतींचे परीक्षण करते, अनेकदा प्रबळ संस्कृती उपेक्षित गटांच्या अनुभवांना कसे आकार देतात याचे विश्लेषण करण्यासाठी सिद्धांत वापरते.

**४) सांस्कृतिक इतिहास संकल्पनेचा उदय व विकास :**

स्वित्झर्लंडमधील जेकब बर्कहार्ड (Jacob Burckhardt) (१८१८-१८९७) या इतिहाससंशोधकाने 'सांस्कृतिक इतिहास' या संकल्पनेची अथवा विद्याशाखेची निर्मिती केली असे मानले जाते. बर्कहार्डला युरोपियन पुनरुज्जीवन काळातील कला आणि साहित्यातील विकासामध्ये विशेष रुची असल्याने इटलीमधील पुनरुज्जीवन काळाचा अभ्यास केलेला होता. एका विशिष्ट काळाचे 'समग्र' स्वरूपाचे संशोधन करावे अशी

बर्कहार्डची भूमिका होती. बर्कहार्ड याच भूमिकेतून इटलीमधील पुनरुज्जीवन काळाकडे आपले लक्ष केंद्रीत करतो. इटलीमधील फक्त चित्र, शिल्प, स्थापत्य आदि बाबींचा विचार न करता तो इटलीमधील त्या काळातील राजकारण, अर्थकारण, सामाजिक संस्था यांचादेखील विचार करतो आणि 'उस्फुर्तपणे झालेला कोणताही बौध्दिक विकास' म्हणजे संस्कृती अशी तो संस्कृतीची व्याख्या करतो. बर्कहार्डला भौतिक जीवनातील प्रगती आणि त्याखाली जे काही चाललेले होते ते आजिबात पसंद नव्हते. सांस्कृतिक इतिहासाच्या अभ्यासामध्ये, बर्कहार्डनंतर, हबरमास आणि गिझचे नाव महत्वाचे आहे. जर्गन हबरमास त्याच्या "The Structural Tranformation of the Public Sphere' (१९८९) या ग्रंथामध्ये 'समाजविश्व' ही संकल्पना मांडतो. तर क्लिफर्ड गीर्ट्झ यांचा "Thick Description: Toward an Interpretive Theory of Culture' या लेखात ही "Thick Discription' संकल्पना मांडतो.

१९ वे शतकामध्ये सांस्कृतिक इतिहासालेखनामध्ये बरेच संशोधन व लेखन झाले. मात्र सन १८८८ मध्ये डायट्रिच शेफर यांने (Dietrich Schafer), सांस्कृतिक इतिहासापेक्षा राजकारणावर जास्त भर दिला. शेफरच्या राजकीय इतिहासाचा प्रतिवाद करताना एबरहार्ड गोथेन (Eberhard Gothein) याने सांस्कृतिक इतिहासाचे समर्थन केले. गोथेनच्या मते ऐतिहासिक बदल समजून घेण्यासाठी, राजकारण आणि भौतिकवादापेक्षा धर्म, कला, कायदा, अर्थव्यवस्था इत्यादीमधील बदल समजून घेणे अत्यावश्यक असते. सन १८८६ मध्ये लॅम्प्रेक्ट (Lamprecht) यांने लिपझिग विद्यापीठामध्ये जर्मनीच्या संपूर्ण सांस्कृतिक इतिहासाचे सर्वेक्षण सुरु केले आणि याविषयाचे एक चर्चासत्र घेतले. लॅम्प्रेक्टला 'सांस्कृतिक आणि वैश्विक इतिहासाचा' विभाग स्थापन करावयाचा होता. लॅम्प्रेक्टची जी 'नव इतिहासा'ची संकल्पना होती त्यावर भाषाशास्त्र, पुरातत्वशास्त्र, कला इतिहास यामध्ये होत असलेल्या प्रगतीचा प्रभाव होता. पहिले महायुध्द सुरू झाल्यानंतर जर्मनीमध्ये सांस्कृतिक इतिहासाच्या अभ्यासाचा वापर जर्मन वंशाच्या श्रेष्ठत्वाची संकल्पना उदयास होण्यात झाली. लॅम्प्रेक्टच्या या संकल्पनेचा प्रभाव अमेरिका आणि फ्रान्सवर देखील जाणवत होता. अमेरिका आणि फ्रान्समध्ये इतिहासाच्या अभ्यासामधील 'संस्कृती'चे महत्त्व समजून आलेले होते.

१९ व्या शतकामध्ये मानवशास्त्राच्या विकासामुळे, सांस्कृतिक इतिहासाच्या अभ्यासाला चालना मिळाली. मानवशास्त्रज्ञ एडवर्ड टेलरने सन १८८१ मध्ये त्याचा 'Primitive Culture' हा ग्रंथ प्रकाशित केला. टेलर म्हणतो की, 'संस्कृती म्हणजे अशी एक गुंतागुंतीची रचना असते की ज्यामध्ये, एका समाजाचा घटक या नात्याने, मानवाने ज्ञान, श्रध्दा, कला, नैतिक मूल्यं, कायदा, रीतीरिवाज यांच्या क्षमता आणि सवयी प्राप्त केल्या. तरीही व्हिक्टोरियन अभ्यासक संस्कृतीच्या दोन कल्पनांमध्ये अडकून पडलेले होते. काही जण 'संस्कृती म्हणजे आदिमानवाची भौतिक संस्कृती' असे पहात होते. तर काही जण 'संस्कृती म्हणजे कला, साहित्य, तत्वज्ञान, धर्म अशा अधिभौतिक संस्कृती' असे पहात होते.

अमेरिकेत सन १९१२ मध्ये जेम्स रॉबीन्सन यांने पारंपारिक राजकीय इतिहासापेक्षा, सांस्कृतिक अभ्यासाला महत्व देणारी 'नव इतिहासाची' संकल्पना मांडली. तर दुसरीकडे संस्कृतीसाठी "Culture' आणि "Civilization' या शब्दांमध्ये द्वंद्व सुरू होते. थोडक्यात काय तर 'रानटीपणा' आणि 'मानवाचा सर्वोच्च

विकास' असे हे द्वंद्व होते. फ्रेंच राज्यक्रांतीचा विचार करताना मार्क्सवादी इतिहासकार केवळ वर्गसबंधांवर भर देत होते. मात्र, तत्कालिन फ्रान्समधील लिंगभाव, श्रध्दास्थानं, धारणा, लोकांमधील चर्चा यातून जी काही विशिष्ठ राजकीय संस्कृती निर्माण झालेली होती त्या राजकीय संस्कृतीच्या अभ्यासाकडे इतिहास संशोधकांचे लक्ष नव्हते. ते आता त्यांच्या दृष्टीपथात आलेले होते.

२० व्या शतकात सांस्कृतिक इतिहासाने विकासाचा पुढील टप्पा गाठला. या काळामध्ये मानवंशास्त्राचा प्रचंड प्रभाव सांस्कृतिक इतिहासावर निर्माण झाला. परिणामी सांस्कृतिक इतिहासाच्या अभ्यासक्षेत्रामध्ये वैयक्तिक, सामाजिक, वास्तविक, काल्पनिक, नैसर्गिक अशा सर्व घटकांचा समावेश झाला. हॅरी बार्न हा संशोधक देखील 'नव इतिहास म्हणजे भूतकाळात घडलेल्या प्रत्येक बाबींची नोंद' अशी संकल्पना या काळात मांडतो. अमेरिकेमध्ये 'इतिहासाकडे पाहण्याचा सांस्कृतिक दृष्टिकोन' या शिर्षकाखाली एक खंड सन १९४० मध्ये प्रकाशित झाला. यामध्ये संस्कृतीचे विश्लेषण करणाऱ्या विविध पध्दती, समूह, राष्ट्रीयत्व, संस्था, विचारप्रवाह यांचे विश्लेषण करणाऱ्या पध्दती इत्यादि विषयावरील लेख प्रकाशित करण्यात आले. १९८९ मध्ये, लिन हंट याने ही सांस्कृतिक चालीरिती आणि मानसिकता अथवा दृष्टिकोण यांच्या अभ्यासाचा समावेश 'सांस्कृतिक इतिहासा' मध्ये केला. आता, गुन्हा, वेडसरपणा, बालपण, वृध्दत्व, देहबोली, विनोद, गंध, अवकाश, व्यसन, विद्रोह इ. अनेक विषय यामध्ये समाविष्ट करण्यात आले.

**५) सांस्कृतिक इतिहासाचे महत्त्वाचे अभ्यासक :**

**अ) जेकब बर्कहार्ड :**

सांस्कृतिक इतिहासाच्या क्षेत्रात जेकब बर्कहार्ट हे अग्रणी होते. बर्कहार्डला 'सांस्कृतिक इतिहास' या संकल्पनेचा संस्थापक म्हंटले जाते. बर्कहार्ड हा धर्मोपेदशकाचा मुलगा होता मात्र त्याला धर्मोपदेशक बनायचे नव्हते. बर्लिन विद्यापीठामध्ये कलेचा इतिहास शिकायला गेला. याठिकाणी त्याने इतिहासतज्ज्ञ रँकेची व्याख्याने ऐकली. पुढे तो कलेचा इतिहास शिकवणारा प्राध्यापक बनला. त्यावेळी, राजकीय इतिहास हाच एक सर्वमान्य प्रकार होता. अशावेळी बर्कहार्डने इतिहास अभ्यासामध्ये 'कलेचा अभ्यास' केंद्रस्थानी ठेवला. तो स्वित्झर्लंडमधील कला आणि संस्कृतीचा विशेषत: पुनरुज्जीवन काळाचा अभ्यासक होता. पुनरुज्जीवन काळ हा प्रामुख्याने त्या काळातील सुंदर कला, स्थापत्य, साहित्याबाबत प्रसिध्द आहे. पुनरुज्जीवन काळावर असंख्य ग्रंथ उपलब्ध होते. मात्र, बर्कहार्डने फक्त यांचाच अभ्यास केला नाही तर त्याला त्या काळातील, दैनंदिन आयुष्यातील विविध सामाजिक संस्थांमध्ये रुची होती. बर्कहार्डच्या मते कागदपत्रे आणि पुस्तकं म्हणजे इतिहासाची साधने नव्हेत, तर कला, स्थापत्य, साहित्य असे अभिव्यक्तीचे प्रत्येक प्रकार आणि लोकांच्या श्रध्दा ही सुध्दा इतिहासाची साधनेच आहेत. बर्कहार्डला राजकीय आणि लष्करीच नव्हे तर एखाद्या स्थळ-काळातील लोकांचा समग्र अभ्यास करावयाचा होता. बर्कहर्डाट यांनी युरोप, विशेषत: इटलीतून प्रवास केला आणि भूतकाळातील कलांचा अभ्यास केला आणि त्याच्या सांस्कृतिक महत्त्वपूर्ण अंतर्दृष्टी विकसित केली. त्याच्या लिखाणांत त्याने ग्रीस आणि रोममधील प्राचीन संस्कृतींसाठी एक विशेष आत्मानुभाव प्रकट केला. 'द एज ऑफ कॉन्स्टॅटाईन द ग्रेट' या ग्रंथात कॉन्स्टंटाईनच्या जीवनचरित्रापेक्षा त्या

काळातील लोकांच्या दृष्टिकोनामध्ये रुची असलेली दिसते. लुकासच्या मते, बर्कहार्डनेच खऱ्या अर्थाने 'सांस्कृतिक इतिहासाची' बैठक घातली. बर्कहाडच्या मते, इतिहासाच्या अभ्यासकाने, विशिष्ठ लोकांचा, विशिष्ठ स्थळाचा अथवा विशिष्ठ काळाचा आत्मा आणि तेथील अभिव्यक्तीचे प्रकार समजून घेतले पाहिजेत. यासाठी कलेच्या अभ्यासाला, इतिहास अभ्यासामध्ये केंद्रस्थान मिळायला हवे. म्हणूनच बर्कहार्डला 'कलेच्या इतिहासाचा' संस्थापक समजले जाते. बर्कहार्डने प्रचंड लेखन केले. यामध्ये 'The Civilization of the Renaissance in Italy', आणि 'The History of the Renaissance in Italy' हे महत्वाचे ग्रंथ होते. हे ग्रंथ पुनरुज्जीवन काळातील इटलीचा समग्र इतिहास मांडतात.

**ब) जर्गेन हबरमास :**

जर्गेन हॅबरमास यांचा जन्म १९२९ मध्ये जर्मनी येथे डसेलडॉर्फ मध्ये झाला. त्यांनी गोटिंगेन, झुरिच आणि बॉन या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेतले आणि शेलिंगच्या तत्त्वज्ञानावर डॉक्टरेट प्रबंध लिहिला. मारबर्ग विद्यापीठात सादर केलेल्या त्यांच्या 'हॅबिलिटेशनस्क्रिफ्ट' या पोस्ट-डॉक्टरेट प्रबंधाने सार्वजनिक क्षेत्राच्या स्ट्रक्चरल ट्रान्सफॉर्मेशनचा आधार बनवले. हेडलबर्ग आणि फ्रँकफर्ट या विद्यापीठांमध्ये ते प्राध्यापक होते. 'स्ट्रक्चरल ट्रान्सफॉर्मेशन ऑफ द पब्लिक स्फेअर' व्यतिरिक्त त्यांच्या प्रमुख कामांमध्ये 'थिअरी अँड प्रॅक्टिस', 'नॉलेज अँड ह्युमन इंटरेस्ट्स' 'थिअरी ऑफ कम्युनिकेटिव्ह ॲक्शन' यांचा समावेश आहे.

हबरमास समाजामध्ये दोन क्षेत्रांची कल्पना करतो. 'प्रातिनिधिक' व 'समाजविश्व' (Public Sphere). मध्ययुगामध्ये ज्या काही संस्कृती, सभ्यतेच्या कल्पना होत्या, त्या फक्त राजा अथवा अभिजन वर्ग ठरवतील त्याचप्रमाणे होत्या. हे एकपक्षीय अथवा प्रातिनिधिक चित्रण होतं. आधुनिक काळामध्ये, 'समाजविश्व' पुढे आलं. यामध्ये फ्रेंच राज्यक्रांती आणि औद्योगिक क्रांती महत्वाची ठरली. वृत्तपत्रे, मासिकं, चर्चासत्रं, कॉफीहाऊसेसमधील गप्पा याद्वारे समाजविश्वामध्ये विविध चर्चा मोकळेपणाने सुरू झाल्या; दृष्टिकोन विकसित होऊ लागले. आता संस्कृती, काही विशिष्ठ वर्ग ठरवत नाहीत तर, या 'समाजविश्व' संस्कृतीची व्याख्या ठरवू लागले. 'चिकित्सक' असणे हे या समाजविश्वाचे प्रधान वैशिष्ट्य होते. त्यामुळे, इथे विचारांचा साचेबंदपणा राहिला नाही. आता, बहुसंख्य समाज हा सक्रिय झाला होता. हबरमासच्या मते, अलिकडे मात्र हे समाजविश्व विविध कारणांमुळे कोसळत चाललेले आहे. माध्यमं ही निव्वळ नफ्याचा विचार करु लागलेली आहेत. त्यामुळे पूर्वीचा सक्रिय, चिकित्सक समाज आता निष्क्रिय ग्राहक बनलेला आहे.

**क) क्लिफर्ड गिर्ट्झ :**

गिर्ट्झ यांचा जन्म कॅलिफोर्नियातील सॅन फ्रॅन्सिस्को येथे झाला. ओहायवो येथील ॲरिओक महाविद्यालयातून तत्त्वज्ञान हा विषय घेऊन बी. ए. आणि हार्व्हर्ड विद्यापीठातून सामाजिक मानवंशशास्त्रातील पीएच. डी. ची पदवी प्राप्त केली. इ. स. १९७० ते २००० या काळात प्रीन्स्टन येथील इन्स्टिट्यूट फॉर ॲडव्हान्स स्टडी येथे त्यांनी सामाजिक शास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केले. 'इंटरप्रिटेशन ऑफ कल्चर' आणि 'लोकल नॉलेज' हे दोन ग्रंथ विशेष प्रसिद्ध आहेत. गिर्ट्झ यांनी सामाजिक शास्त्रातील विचारप्रवाहांचा

चिकित्सक अभ्यास केला होता. त्या विचारांमधील उणिवांची आणि मर्यादांची त्यांना जाणीव होती. म्हणूनच त्यांनी सामाजिक शास्त्रामध्ये वस्तुनिष्ठता असली पाहिजे असा आग्रह धरला. गिर्ट्झ यांनी आपल्या संशोधनाला जावा, बाली आणि मोरोक्को येथून सुरुवात केली. त्यांनी केलेल्या या क्षेत्रकार्यामुळे त्यांचा संस्कृतिविषयक दृष्टिकोन तयार झाला होता. त्यांच्या मते संस्कृतीचा अभ्यास करणे म्हणजे तिच्या विविध पैलूंचा अभ्यास करणे असे नाही; तर संस्कृतीचा अन्वयार्थ लावणे म्हणजे संस्कृतीचा अभ्यास करणे होय. कारण व्यक्तीचे आर्थिक, राजकीय, धार्मिक व सामाजिक विचार आणि आचार हे ती ज्या संस्कृतीमध्ये वाढलेली असते, त्या संस्कृतीच्या चौकटीतच अर्थपूर्ण ठरतात. म्हणून संस्कृतीचा अभ्यास करताना त्या कृतीमागील अर्थ समजून घेणे आवश्यक आहे.

पारंपरिक मानवंशशास्त्रामध्ये संस्कृतीचे स्वरूप स्पष्ट करताना संस्कृतीला 'Organic Whole', 'Super Organic Whole' अशा उपमा दिलेल्या दिसतात. गिर्ट्झ यांना संस्कृतीचे सांगितलेले हे स्वरूप मान्य नाही. त्यांच्या मते संस्कृती समाजातील व्यक्तींच्या परस्परांमधील कृतींच्या जाळ्यातून निर्माण होते. व्यक्तीची कृती ही अर्थपूर्ण प्रतीक असते. संस्कृती ही अशा अर्थपूर्ण प्रतीकांचे जाळे असते. म्हणून संस्कृतीचा अभ्यास करताना या प्रतीकांच्या पलीकडे जाऊन त्यांचा अन्वय लावण्याची आवश्यकता आहे. गिर्ट्झ यांनी येथे कृतीला प्रतीक म्हणणे हे भाषेच्या तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. भाषेच्या तत्त्वज्ञानामध्ये चिन्ह (Sign) आणि प्रतीक (Symbol) यांच्यात फरक केला जातो. चिन्हाला अनुसरून बाह्यजगात वस्तू असते म्हणून चिन्हांना विशिष्ट अर्थ असतो. याउलट, प्रतीकांना अनुसरून वस्तू असतेच असे नाही, तर प्रतीकांना संदर्भानुसार अर्थ प्राप्त होतो. म्हणून एकच प्रतीक वेगवेगळ्या संस्कृतींमध्ये वापरले गेले असले, तरी त्याचा अन्वयार्थ वेगळा असतो. उदा., स्त्रीने कुंकू लावणे ही सामाजिक कृती घेतली, तर त्या कृतीचा संस्कृतीनुसार अर्थ वेगवेगळा असतो.

गिर्ट्झ यांनी संस्कृतीची व्याख्या केलेली आहे. ते म्हणतात की, ''प्रतीकांमध्ये अंतर्भूत असलेल्या अर्थपूर्ण आकारबंधाचे ऐतिहासिक वहन म्हणजे संस्कृती.'' संस्कृती ही अर्थपूर्ण प्रतीकांच्या विणीतून तयार झालेली एक प्रणाली असते. व्यक्ती व्यवहार करते आणि स्वत:चा जीवनविषयक दृष्टिकोन बनविते. संस्कृतीविषयी त्यांचे असे मत असल्यामुळेच संस्कृतीचा अभ्यास हा मूलभूत विज्ञानातील अभ्यासापेक्षा वेगळा असतो, असे त्यांचे प्रतिपादन होते. मूलभूत विज्ञानामध्ये आपण सार्वत्रिक नियम शोधत असतो. असे नियम संस्कृतीच्या अभ्यासकाने न शोधता, प्रतीकांचा अर्थ शोधण्यासाठी त्यांचा अन्वयार्थ लावण्याचे काम त्याने केले पाहिजे.

गिर्ट्झ यांनी संस्कृतीविषयी चिन्ह-मीमांसाशास्त्रीय संकल्पना मांडली. चिन्ह-मीमांसाशास्त्रामध्ये वस्तूचे प्रतिनिधित्व करणारे चिन्ह आणि प्रतीक यांचा त्या वस्तूशी काय संबंध आहे, याचा अभ्यास केला जातो. संस्कृतीच्या संदर्भात विचार करताना आपल्याला असे दिसते की, प्रतीकांचा अर्थ कायम नसतो, तो संदर्भानुसार, संस्कृतीनुसार तसेच वक्त्याच्या स्वभावानुसार बदलत जातो. गिर्ट्झ यांच्या मते प्रत्येक संस्कृतीला संदर्भ असतो. या संदर्भाच्या चौकटीत परस्परांमध्ये विणल्या गेलेल्या चिन्हांची प्रणाली समजून घेता येते. अशा पद्धतीने संस्कृती समजून घेणे म्हणजेच संस्कृतीचे आशयघन वर्णन (Thick Description)

होय. गिर्ट्झ यांच्या मते अभ्यासकाने व्यक्तीच्या जीवनव्यवहारानुसार तिच्या कृतीचा अर्थ उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. लोकांची संस्कृती समजून घेणे म्हणजे संस्कृतीचे स्वरूप तिचे वैशिष्ट्य न हरवता उलगडून दाखविणे होय.

गिर्ट्झ यांनी सांगितलेले मानवंशास्त्राचे स्वरूप हे अन्वयार्थक मानवंशास्त्राचे स्वरूप आहे. त्यांच्या मतानुसार मानवंशास्त्रामध्ये जेव्हा आपण संस्कृतीचे विश्लेषण करतो, तेव्हा ते विश्लेषण एखादा सार्वत्रिक नियम करण्यासाठी करू नये; तर त्या संस्कृतीचा अर्थ समजून घेण्यासाठी केलेले ते अन्वयार्थिक विश्लेषण असले पाहिजे. आशयघन ही संकल्पना गिर्ट्झ यांनी गिल्बर्ट राइल या ब्रिटिश तत्त्वज्ञाकडून घेतलेली आहे. सामाजिक मानवंशास्त्र हे संस्कृतीच्या अभ्यासावर आधारित असते. संस्कृती ही प्रतीकांमधून आविष्कृत होत असल्यामुळे व्यक्तीच्या सामाजिक जीवनामध्ये प्रतीकांची भूमिका किंवा सहभाग काय आहे, यावरून प्रतीकांना अर्थ प्राप्त होत असतो; कारण व्यक्तीची कृती आणि संस्कृती यांचे स्वरूप परस्परांमध्ये गुंतलेले असते. म्हणून संस्कृतीचे विश्लेषण करून संस्कृतीचे आशयघन वर्णन करता येते. या वर्णनाच्या आधारे त्या संस्कृतीमधील रहिवासी कोणत्या पद्धतीचा विचार करतात, याची सविस्तर नोंद करता येते. आशयघन वर्णन म्हणजे संस्कृतिबाह्य व्यक्तीने संस्कृतीमध्ये राहणारी व्यक्ती कोणत्या पद्धतीने विचार करते, याचा लावलेला अन्वयार्थ होय. याला अन्वयार्थ यासाठी म्हणायचे की, अभ्यासकाला पूर्णपणे अपरिचित असलेल्या संस्कृतीचा तो अन्वयार्थ लावत असतो. आशयघन वर्णनाचा उद्देश अधिक स्पष्ट करायचा झाल्यास आपल्याला असे म्हणता येईल की, गिर्ट्झ यांच्या मते संस्कृतीचा अभ्यास करताना एखादी संकल्पनात्मक चौकट त्या संस्कृतीवर लादण्यापेक्षा त्या संस्कृतीतील व्यक्तीची कृती कोणत्या पद्धतीने व का केली जाते, याचा अन्वयार्थ लावणे योग्य आहे. आशयघन वर्णनामध्ये नेमके हेच केले जाते. म्हणून आशयघन वर्णन हे केवळ संस्कृतीविषयीचे माहितीसंकलन नसते, तर ते माहितीचे अन्वयार्थक संकलन असते. माहितीसंकलन हा तर मानवशास्त्रीय अभ्यासपद्धतीचा अविभाज्य घटक आहे. पण असे असले तरी हे माहितीसंकलन अन्वयार्थक असले पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता; कारण असे संकलन असेल, तरच ती संस्कृती यथार्थपणे समजून घेता येते. या अर्थानेही मानवशास्त्रीय संशोधन हे दुय्यम पातळीवरचे असते. संस्कृती, मानवशास्त्र, आशयघन वर्णन यांच्या आधारे मानवशास्त्र आणि संस्कृती यांचा नव्याने अर्थ सांगण्याचा प्रयत्न गिर्ट्झ यांनी केलेला दिसतो.

**ब) पर्यावरण इतिहासलेखन :**

मानव व पर्यावरण यांच्यातील संबंध अनादी आणि अतूट आहे. मानवाने पृथ्वीवर आपल्या सुलभतेसाठी निसर्गात निरंतर हस्तक्षेप केल्याने विविध बदल घडवून आणले. परिणामी, इतिहास या ज्ञानशाखेचा निसर्गाशी पर्यायाने आजच्या परिभाषेत पर्यावरणाशी संबंध जोडला गेला. पर्यावरणशास्त्र अभ्यास हा बहुविध स्वरूप असणारा विषय आहे, ज्यामध्ये विज्ञान, समाजशास्त्र, मानव्यशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र यासारखे विविध आणि परस्पर संबंध असणाऱ्या शैक्षणिक विषयांचा समावेश आहे. केवळ भौतिक पर्यावरणाशी संबंधित नसून त्याचा मानवी वर्तणूक आणि दृष्टिकोन यांच्याशीसुद्धा संबंध आहे. मानव व पर्यावरण यांचा परस्पर संबंध हा प्रत्येक स्तरावर विविधांगी पैलू असलेला व फार गुंतागुंतीचा विषय आहे.

यामध्ये निसर्गातील सर्व निर्जीव, सजीव व निर्जीव घटकांचा एकमेकांशी असलेल्या संबंधांचा देखील अंतर्भाव होतो. सन १९७० च्या दशकात यातून पर्यावरणीय इतिहास संशोधनास अमेरिकेमध्ये सुरुवात झाली. मानवी घडामोडी, प्रसंग यामध्ये निसर्गाची भूमिका या अनुषंगाने इतिहास संशोधन क्षेत्रातील एक समकालीन लेखनप्रवाह म्हणून भारतीय इतिहासात रूढ होत आहे. जागतिक स्तरावर पर्यावरणाची समस्या निर्माण झाल्याने सद्यस्थितीत पर्यावरणाच्या इतिहास अभ्यास आणि संशोधनास महत्त्व प्राप्त झालेले आहे. भारतात मोठ्या प्रमाणात पर्यावरणविषयक शासकीय अहवाल, शासकीय दस्ताऐवज, नियतकालिके, वृत्तपत्रे, सामाजिक संस्था, शासकीय व बिगर शासकीय संस्थेकडील कागदपत्रे उपलब्ध आहेत. या साधनांचा वापर करून मानवी, समाजोपयोगी इतिहासाचे नवसंशोधन, आकलन व्हावे या हेतूने पर्यावरणीय इतिहास संशोधन होणे ही काळाची गरज आहे. भूतकालीन, गतकालीन चुकांमधून बोध घेऊन मानवी क्रियाकलापांचा, कार्यकर्तृत्वाचा पर्यावरणावर होणारा नकारात्मक, विपरीत परिणाम कमी करता येते. नैसर्गिक संसाधनांचा अतिवापर टाळून पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होते. पर्यावरणीय इतिहासाची आंतरविद्याशाखीय–बहुविद्याशाखीय दृष्टीकोन, विविध आयाम, इतिहास लेखनपद्धती, अभ्यासाचे विविधांगी क्षेत्र निश्चितच मानव आणि पर्यावरण यांच्यातील परस्परसंबंधांचे सखोल, समग्र अभ्यास करण्यास आणि बारकावे समजून घेण्यास मदत होईल. शिवाय पर्यावरण संवर्धन, शाश्वत विकासाला देखील चालना मिळू शकेल. जंगल, जमीन, पाणी, वनस्पती आणि प्राणी यासारख्या नैसर्गिक संसाधनांचा समावेश असलेल्या पर्यावरणीय पायाभूत सुविधा मानवी समाजाची उत्क्रांती आणि परिवर्तनाची दिशा ठरविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. पर्यावरणीय इतिहास आपल्याला हे समजण्यास मदत करतो की, मानवी समाजाने पृथ्वीवरील मानवी उत्पत्तीपासून नैसर्गिक संसाधनांचा कसा वापर केले आहे आणि नंतर हळूहळू त्याचे शोषण करण्यास सुरुवात केले त्यामुळे त्याचा निसर्गावर कोणते परिणाम झालेले आहेत व होत आहेत. या ज्ञानाचा उपयोग आपणास भविष्यात पर्यावरणीय समस्या टाळण्यासाठी, नैसर्गिक समतोल राखण्यासाठी आणि शाश्वत समाज निर्माण करण्यासाठी होऊ शकतो.

### १) पर्यावरणीय इतिहासाची ओळख :

पर्यावरणीय इतिहास म्हणजे मानव व निसर्गा यांच्यातील परस्पर संबंधाचा चक्रीय अस्तित्व आणि निर्वाण संदर्भात केलेला अभ्यास आहे. मानवांने पर्यावरणाला कसा आकार दिला? पर्यावरणाने मानवी समाजाला कसे घडवले? यांचा प्रामुख्याने अभ्यास केला जातो. पर्यावरणावर याचा कश्याप्रकारे सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम घडून आला याचे आकलन होणे अभिप्रेत आहे. काळाच्या ओघात हे परिणाम कसे बदलत गेले यांचा देखील अभ्यास केला जात आहे. निसर्गाकडे पाहण्याचा मानवांचा दृष्टीकोण कालक्रमात कसा–कसा बदल होत गेला याचा अभ्यास करण्यासाठी पर्यावरणीय इतिहासकार कला, साहित्य आणि लोककथांचा अभ्यास करतात. पर्यावरणीय इतिहास हे तुलनेने नवीन क्षेत्र असले तरी, गेल्या काही वर्षांत त्याचा अत्यंत जलद गतीने विकास झाला आहे. याची अनेक कारणे आहेत, त्यापैकी पर्यावरणाच्या समस्यांबद्दल लोकांची वाढती चिंता हे एक महत्त्वाचे कारण आहे. अनेक अभ्यासकांचा असा विश्वास आहे

की भूतकाळातील पर्यावरणाचा अभ्यास करून आपण वर्तमान अधिक चांगल्या प्रकारे समजून घेऊ शकतो आणि भविष्यातील निर्णय अधिक योग्यरित्या घेऊ शकतो.

पर्यावरणीय इतिहास हा मानवी समाज आणि त्याच्या सभोवतालच्याच्या नैसर्गिक वातावरण यांच्यातील परस्पर संबंधांचा अभ्यास करणारी एक विद्याशाखा आहे. मानवी कृतींमुळे होणाऱ्या पर्यावरणीय बदलांचा अभ्यास केला जातो, याशिवाय त्यांचा समाजावर कसा परिणाम होतो याचाही अंतर्भाव केला जातो. १८ व्या शतकातील औद्योगिक क्रांतीमुळे मानवी जीवनात आमूलाग्र बदल घडून आले. विज्ञान व तंत्रज्ञानातील मानवी शोध व आविष्कारातून उत्पादन प्रक्रियेत प्रचंड मोठ्या प्रमाणात यांत्रिकीकरण झाले. मानवी श्रमाची जागा यंत्राने घेऊन जीवाश्म इंधनाचा वापर सुरु झाला. वाढती कारखानदारी, उद्योगधंदे, शहरीकरण, भांडवलशाही यातून नैसर्गिक साधनसंपत्तीचे अनिर्बंध वापर सुरु झाला. परिणामी पर्यावरणाचा ऱ्हास होऊ लागला. अमेरिकन सागरी जीवशास्त्रज्ञ, लेखिका राचेल कार्लसन यांनी 'द सायलंट स्प्रिंग' हा ग्रंथ लिहिला. कार्लसन यांनी या ग्रंथामध्ये रासायनिक पदार्थांच्या अतिवापरामुळे हवेचे प्रदूषण व त्याचे मानवी आरोग्यावर होणाऱ्या विपरीत परिणामाची सटीक, निर्भीड मांडणी केलेले आहे.

**२) पर्यावरणीय इतिहासाची संकल्पना व व्याख्या :**

'एनव्हारॉनर' (Environer) या फ्रेंच शब्दापासून 'एनव्हारॉनमेन्ट' (Environment) या शब्दाची व्युत्पत्ती झालेली आहे. ज्याचा शब्दशः अर्थ, ''आपल्या आसपासचा सभोवताल, परिसर होय; ज्यामध्ये सर्व 'जैविक' (biotic) व 'अजैविक' (abiotic) या दोन्ही बाबींचा अंतर्भाव अभिप्रेत आहे, त्याला 'पर्यावरण' म्हणतात'. एकंदरीत जल, हवा, जमीन यातील संबंध आणि मानवाचा इतर सजीव व निर्जीव घटकांशी असणारा सहसंबंध/आंतरसंबंध होय. नैसर्गिक, भौतिक व सामाजिक शास्त्रातील विविध विद्याशाखा अथवा ज्ञानशाखा यांना एकत्र जोडणारा विषय आहे. सन १९७२ मध्ये 'पर्यावरणाचा इतिहास' ही संज्ञा प्रथमत: रुढ झाली असे या क्षेत्रातील विद्वानांची सर्वसाधारण धारणा आहे. रॉडरिक नॅश या अमेरिकन इतिहासकारांने सन १९६७ मध्ये लिहिलेला 'वाईल्डरनेस अँड द अमेरिकन माईंड' हा ग्रंथ जागतिक पर्यावरणाच्या इतिहासातील अभिजात ग्रंथ मानला जातो. अमेरिकेमध्ये पर्यावरण इतिहास हा लेखन प्रवाह सर्वप्रथम सुरु झाला व त्यानंतर युरोपमधील इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी इ. देशामध्ये यावर लेखन व संशोधनास मोठ्या प्रमाणात चालना मिळाली. आपण आज ज्याला प्राचीन 'संस्कृती' अथवा 'सभ्यता' म्हणतो, त्यावर निसर्गाचा लक्षणीय प्रभाव दिसून येतो. 'पर्यावरण' व 'संस्कृती' यांचा परस्पर संबंध फार निकटचा असतो याची नोंद संशोधकांनी घेतलेली आहे. पाश्चिमात्य देशात या विषयावर ज्या पद्धतीने मौलिक संशोधन झाले आहे तसे आपल्याकडे फारसे संशोधन झालेले दिसून येत नाही. पाश्चिमात्य देशात विशेषतः अमेरिका, युरोपमध्ये या लेखन प्रवाहाला प्रामुख्याने चालना मिळाली. या देशातील विविध इतिहासकारांनी याची व्याख्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

पर्यावरणवादी अमेरिकन इतिहासकार डोनॉल्ड वॉरस्टर: ''मानवी संस्कृती, सभ्यता व पर्यावरण यांच्यातील सुसंवाद म्हणजे पर्यावरणाचा इतिहास होईल''.

अमेरिकन इतिहासकार जॉन मॅंकनिल: ''मानवी समुदाय विसंबून असणाऱ्या परिसंस्थेशी एकमेकांशी असणाऱ्या आंतर-संबंधातून घडणाऱ्या घडामोडी किंवा घटना म्हणजे पर्यावरणाचा इतिहास होय''. वरील दोन्हीही व्याखेतून साधारण संकल्पना व अर्थ आपल्या लक्षात येते.

**पर्यावरण इतिहासाचे विविध दृष्टीकोन :**

पर्यावरण इतिहासकार हे भूतकाळातील मानव आणि पर्यावरण यांच्यातील संबंधांचा अभ्यास करून भूतकाळ समजून घेण्याचा प्रयत्न करतात. त्यांनी विविध दृष्टिकोनांचा वापर करून विविध निष्कर्षापर्यंत पोहोचतात.

**१) डोनाल्ड वर्स्टर :** वर्स्टर यांनी ''मानव हा निसर्गाचाच एक भाग आहे'' या संकल्पनेचा वापर करून पर्यावरणाचे रक्षण करण्याची आपली जबाबदारी अधोरेखित केली आहे. वर्स्टर यांनी त्यांच्या 'नेचर्स इकॉनॉमी: अ हिस्ट्री ऑफ इकोलॉजिकल आयडियाज' या ग्रंथात असा युक्तिवाद केला आहे, आपण निसर्गापासून वेगळे नाही तर त्याचाच एक अविभाज्य घटक आहोत. त्यामुळे आपल्याला पर्यावरणाचे जतन व संवर्धन करणे गरजेचे आहे.

**२) जेरेड डायमंड :** डायमंड यांनी ''पर्यावरणीय बदल ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे'' या संकल्पनेचा उपयोग करून काही समाजांची भरभराट का झाली? आणि काही समाजाची अधोगती का झाली? हे स्पष्ट केले आहे. 'गन्स, जर्म्स अँड स्टील: द फेट्स ऑफ ह्युमन सोसायटीज' या ग्रंथात त्यांनी मानवी समाजाचे यश किंवा अपयश ठरविण्यात हवामान आणि भूगोल यांसारख्या पर्यावरणीय घटकांचा मोठा वाटा असल्याचे ते निर्भीडपणे प्रतिपादन करतात.

**३) विल्यम क्रोनॉन :** क्रोनॉन यांनी ''पर्यावरणीय बदलाचा मानवी समाजावर खोलवर परिणाम होऊ शकतो'' या संकल्पनेचा उपयोग करून मानवी कृतींमुळे होणाऱ्या पर्यावरणीय परिणामांबद्दल अधिक जागरूक असणे आवश्यक आहे, असा युक्तिवाद केला आहे. क्रोनॉन यांनी त्यांच्या 'चेंजेस इन द लँड: इंडियन्स, कॉलोनिस्ट्स अँड द इकोलॉजी ऑफ न्यू इंग्लंड' या ग्रंथात असा युक्तिवाद केला आहे की, युरोपियन वसाहतवाद्यांनी न्यू इंग्लंडमधील जंगलतोडीचा विपरीत, विनाशकारी परिणाम मूळ अमेरिकन लोकसंख्येवर झाला.

**पर्यावरणीय इतिहासाचा उदय आणि विकास :**

प्रबोधनकाळात पर्यावरणाविषयी जागरुकता वाढत गेली आणि संशोधन आणि अभ्यासाचे क्षेत्र म्हणून पर्यावरणीय इतिहासाचा उगम सन १९७० च्या दशकात अमेरिकेत झाला. यावर मोठ्या प्रमाणात पर्यावरणीय चळवळीचा प्रभाव होता. रॉडरिक नॅश, डोनाल्ड वर्स्टर आणि आल्फ्रेड क्रॉस्बी यासारख्या विद्वानांनी मानव आणि त्यांच्या नैसर्गिक वातावरणातील संबंधांचे परीक्षण करण्यास सुरुवात केली. क्रॉस्बी यांनी १९८६ मध्ये लिहीलेल्या 'इकोलॉजिकल इम्पीरिअलिझम' या आपल्या ग्रंथात असा युक्तिवाद केला की, युरोपियन वसाहतवादाने नवीन प्रजातींचा परिचय करून आणि भू-वापराच्या पद्धती बदलून जागतिक पर्यावरणीय

संबंधांना लक्षणीय आकार दिला. सन १९७०-८० च्या दशकात वाढत्या पर्यावरणीय संकट आणि निसर्गाच्या महत्त्वाबद्दल जागरूकता वाढल्याने या क्षेत्राचा उदय झाला. सुरुवातीला, पर्यावरणीय इतिहासकारांनी प्रदूषण आणि जंगलतोड यासारख्या समस्यांवर लक्ष केंद्रित केले. हळूहळू, हवामान बदलाचा इतिहास, शेती आणि संवर्धन यांसारख्या विविध विषयांचा समावेश होत गेला. फ्रेंच व अमेरिकेमध्ये प्रमुख दोन दृष्टिकोन आहेत. फ्रेंच दृष्टिकोन इतिहास आणि भूगोल यांच्या संमिश्रणातून विकसित झाला. फ्रेंच इतिहासकारांची अशी धारणा व विश्वास होता की निसर्ग ही एक अतिशय मजबूत शक्ती आहे, जी लोकांच्या जगण्याच्या पद्धतीला आकार देते. 'लाँग ड्युरी' ची (Long Durre) संकल्पना (म्हणजेच एक दीर्घ कालावधी ज्या दरम्यान सामाजिक प्रक्रिया विकसित होतात किंवा सामाजिक संरचना विकसित होतात) या क्षेत्रात प्रभावी ठरली. ही संकल्पना सांगते, की निसर्गात बदल खूप संथगतीने, हळूहळू होतो आणि मानवी कृती कदाचित त्यात फारसा बदल करू शकत नाहीत. तर अमेरिकन पर्यावरणीय इतिहास सन १९७० मधील पर्यावरणीय चळवळीनंतर सुरू झाला. या क्षेत्राने पर्यावरणाचा विध्वंस करणाऱ्या मानवी कृतींवर अधिक लक्ष केंद्रित केले. पर्यावरण इतिहासकारांनी युरोपियन वसाहतवाद आणि भांडवलशाहीच्या वाढीचा पर्यावरणावर कसा परिणाम झाला याचा अभ्यास केला. पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांकडेही त्यांनी पाहिले.

दक्षिण आशियाई देशातील परिस्थितीकीय, पर्यावरणीय इतिहास हे इतर लोकप्रिय इतिहासासारखेच सामाजिक चळवळींशी सामान्यत: जोडलेली दिसून येते. महेश रंगराजन या ख्यातनाम इतिहासकारांच्या मते, 'ब्रिटिश वसाहतकालीन साम्राज्य हे वरकरणी दक्षिण आशियातील एक वैश्विक जाळे भासत असले तरी त्यामध्ये नैसर्गिक साधनसंपत्तीचा पुरेपूर अनिर्बंध वापर, विनियोग करून राजकीय साम्राज्यवादाबरोबरच आर्थिक व परिस्थितीकीय साम्राज्यवाद भारतासारख्या देशावर लादण्यात आले होते'. ते पुढे असे म्हणतात की, 'वसाहतिक पर्यावरणाचा इतिहास हा उपेक्षित, अल्पसंख्याक, वंचित समुदायाच्या जीवनमानात झालेले आमूलाग्र बदल व त्याचे विपरीत परिणाम यानेच बहुतांश इतिहासाचा भाग व्यापलेले आहे. उदा. जंगलसंपत्तीचे झालेले विध्वंस हा दक्षिण आशियातील पर्यावरणीय कथनाच्या, रेखाटनाच्या अनुषंगाने एक संक्रमणाचा काळ मानता येईल अशी मांडणी ते करतात. परिणामस्वरूप, ही परिस्थितीकीय व राजकीय विजय दक्षिण आशियाच्या संदर्भात आल्फ्रेड क्रॉस्बीने मांडलेले 'परिस्थितीकीय साम्राज्यवाद' ("Ecological Imperialism') हा सिद्धांत कदाचित खरा ठरतो'.

**भारतातील पर्यावरण-विषयक इतिहास लेखन :**

निसर्गाविषयी मानवी धारणा, समजुती, श्रद्धा, भौगोलिक स्थळवर्णने यांचा विचार करता अगदी प्रागैतिहासिक काळापासून भारतीय इतिहासामध्ये विस्तृत विवेचन, रेखाटन आढळून येते. जगभरातल्या व भारतातल्या प्राचीन सभ्यता व संस्कृती नद्यांच्या काठी उगम पावलेले व विकसित झालेल्या आहेत. प्राचीन भारतीय ऐतिहासिक साहित्यात मानवांचे निसर्गाशी असलेले सौहार्दपूर्ण संबंध अगदी वैदिक साहित्यापासून ते विविध हिंदू, जैन, बौद्ध धार्मिक कथा, कादंबऱ्या, काव्ये, नाट्यकृती इत्यादीमध्ये प्रकर्षाने दिसून येते. इतिहासाचे भूगोल-निष्ट वर्णन, विवेचन आपल्याला मेगॅस्थेनीस, फाहियान, इत्सिंग, इब्न खाल्दून, अल्बेरुनी

यासारख्या ग्रीक, चीनी, अरबी विदेशी प्रवाशांच्या प्रवासवर्णनात आढळून येते. मुगल सम्राट बाबरचे बाबरनामा, अब्दुल फजलचे ऐन-ए-अकबरीमध्ये भौगोलिक स्थळे, हवामान, प्राणी-फळे, वनस्पती, जंगल प्राण्यांच्या शिकारीचे वर्णन, वनसंपदा या विषयी सुंदर चित्रण केलेले आढळते.

फ्रान्समधील अँनल्स इतिहासलेखन प्रवाहातून भारतात आधुनिक कालखंडात पर्यावरणविषयक इतिहास लेखनास सुरुवात झाली. भारतीय पर्यावरणवादी इतिहास लेखनाचा प्रारंभ साधारणपणे सन १९७० च्या दशकात सुरू झाला. भारतीय इतिहासकारांनी पर्यावरणीय रेखाटन व लेखनाला अँनल्स विचारपरंपरा आणि समकालीन पर्यावरण चळवळीच्या प्रभावातून सुरू झाली. भारतासंबंधी ब्रिटिशांच्या वनसंवर्धन धोरणाचा अभ्यास करणारी दोन ग्रंथ अतिशय महत्वपूर्ण मानले जातात. प्रसिद्ध पर्यावरणशास्त्रज्ञ डॉ. माधव गाडगीळ व इतिहासकार डॉ. रामचंद्र गुहा यांनी सन १९९२ मध्ये लिहिलेला 'धिस फिशर्ड लँड: एन इकॉलॉजीकल हिस्ट्री ऑफ इंडिया' हा ग्रंथ आहे. ब्रिटिश वसाहतकालीन पर्यावरण व त्याचे भारतावरील परिणाम याचे सटीक विवेचन यामध्ये करण्यात आले आहे. त्यानंतर रिचर्ड ग्रोव्ह या ब्रिटिश इतिहासकाराने पर्यावरण संवर्धनात ब्रिटीशांच्या योगदानाचे सविस्तर विवेचन केलेले दिसून येते. सन १९८२ मध्ये भारत सरकारने एक 'जंगल कायद्याचा मसुदा' जाहीर केला. जंगल कायदा राज्यसंस्थेची अस्तित्वात असलेल्या जंगलसंपत्तीवरील पकड जास्त भक्कम, दृढ झाली. याखेरीज जंगलाच्या परिसरात राहणाऱ्या मानवी समुदायाच्या जंगल साधनसंपदेवरील परंपरागत हक्क व अधिकार हिरावून घेणारा होता. सन १९७३-७४ मध्ये हिमालयातील गढवाल परिसरात 'चिपको आंदोलन' सुरू झाले. आधुनिक भारतीय पर्यावरणाच्या इतिहासकारामध्ये ब्रिटीशपूर्वकालीन भारतीय पर्यावरणाच्या परिस्थितीबद्दल वाद आहेत. डॉ. माधव गाडगीळ व इतिहासकार डॉ. रामचंद्र गुहा यानी लिहिलेल्या 'थिस फिशर्ड लँड: एन इकॉलॉजीकल हिस्ट्री ऑफ इंडिया' (१९९२) या ग्रंथात ब्रिटीशपूर्वकाळ हा पर्यावरणाच्या दृष्टीने सुवर्णकाळ होता आणि ब्रिटिशानी तो खंडित केला असे मानतात. परंतु रिचर्ड ग्रोव्ह या केंब्रिज विद्यापीठातील ब्रिटीश इतिहासकाराने गुहा व गाडगीळ यांच्या मताला 'ग्रीन इम्पिरिअलिजम' (Green Imperialism) या ग्रंथात विरोध केला आहे.

भारतातील पर्यावरणवादी चळवळी प्रभावित झाल्यामुळे भारतातल्या पर्यावरणाच्या इतिहासाला काही खास वैशिष्ट्ये प्राप्त झाली आहेत. सन १९८२ मधील 'जंगल/वन कायदा' विरोधी आणि 'चिपको चळवळीं'च्या प्रभावामुळे भारतातील पर्यावरणाच्या इतिहासकारांनी जंगलाच्या इतिहासावर लक्ष केंद्रीत केले. नंतरच्या काळात 'नर्मदा बचाव आंदोलन' व जलसंपत्तीच्या नियोजनाबाबत झालेल्या वादामुळे पर्यावरणाच्या इतिहासकारांनी आपल्या मांडणीत पाण्याला-जलसिंचनाला महत्त्व देण्यास सुरूवात केली. यामुळे बहुतेक पर्यावरणाच्या इतिहासकारांचे लक्ष 'जंगल आणि पाणी' या पर्यावरणाच्या दोन प्रमुख घटकांवर केंद्रीत झाले. भारतातील पर्यावरणाच्या इतिहासाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे इतिहासकारांनी 'ब्रिटीश साम्राज्यवादाला' आपल्या मांडणीत दिलेले महत्त्व होय. इतिहासकारांनी वेगवेगळ्या कारणांसाठी ब्रिटीश अंमलाला भारताच्या पर्यावरणाच्या इतिहासामधील एक ऐतिहासिक आणि वैशिष्ट्यपूर्ण कालखंड मानले आहे. अनेकांच्या मते ब्रिटिश अंमलामुळे भारतीय पर्यावरणातील शांतता भंग पावली. बहुतेक पर्यावरणाचे इतिहासकार ब्रिटिशांच्या वसाहती राज्याला भारताच्या पर्यावरणामध्ये आमूलाग्र परिवर्तन घडवून आणणारी शक्ती मानतात.

आधुनिक काळात गांधीजीनी मांडलेल्या पर्यावरणविषयक संकल्पना, विनोबा भावे, जयप्रकाश नारायण, सुंदरलाल बहुगुणा, मेधा पाटकर इ. मंडळीनी गांधीवादी सत्याग्रहाच्या परिप्रेक्ष्यातून (गांधीयन पर्यावरणवाद) केलेल्या त्यांच्या पर्यावरणीय आंदोलनातून व्यक्त होणारा मानवी व्यवहारांचा निसर्गाधिष्टीत वर्तणूक या क्षेत्रातील वेगळेपण दर्शवितो. या क्षेत्रातील विद्वान, संशोधक विविध ज्ञानशाखेतील असल्याचे दिसून विशेषत: डॉ. माधव गाडगीळ, रामचंद्र गुहा, वंदना शिवा, जयंत बंडोपाध्याय, महेश रंगराजन, एस. शिवरामकृष्णन, बिना अग्रवाल, ओ. पी. द्विवेदी, सुमित गुहा, अमिता बाविस्कर, घनश्याम शहा इत्यादींचा समावेश होतो. गांधीवादी पर्यावरणवाद, मार्क्सवादी पर्यावरणवाद, स्त्रीवादी पर्यावरणवाद, उपेक्षितांचे पर्यावरणवाद आणि दलित पर्यावरणवाद यासारख्या परिप्रेक्ष्यातून अथवा दृष्टीकोनातून विविध ज्ञानशाखेत सुसंवाद-विसंवाद, समन्वय साधून संशोधन/अभ्यास सुर आहे.

**रामचंद्र गुहा यांची पर्यावरण इतिहासाचा अभ्यास करण्याची पंचसूत्री :**

भारतातील प्रसिद्ध इतिहासकार रामचंद्र गुहा यांनी पर्यावरणाच्या इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी एक पंचसूत्री योजना विकसित केली आहे. रामचंद्र गुहा यांच्या मते, हे पाच घटक एकमेकांशी गुंफलेले आहेत आणि मानवी इतिहासाचा आकार देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. पर्यावरणीय इतिहासकार या योजनेचा उपयोग करून पर्यावरण आणि समाज यांच्यातील गतिशील संबंधांचा अभ्यास करू शकतात.

या योजनेचे पाच घटक खालीलप्रमाणे आहेत:

१) पर्यावरणीय पायाभूत सुविधा: यात माती, पाणी, जंगले, हवामान आणि इतर नैसर्गिक संसाधनांचा समावेश आहे.

२) अर्थव्यवस्थाः यात उत्पादन, व्यापार आणि वितरण यासारख्या आर्थिक क्रियाकलापांचा समावेश आहे.

३) सामाजिक रचना: यात कुटुंब, जात, धर्म आणि इतर सामाजिक गटांचा समावेश आहे.

४) राज्यव्यवस्थाः यात सरकार, कायदा आणि राजकीय व्यवस्था यांचा समावेश आहे.

५) संस्कृती: यात कला, धर्म, आणि विचारधारा यांचा समावेश आहे.

**गुहा यांच्या पंचसूत्रीचे फायदे :**

१) इतिहासाच्या अभ्यासाला एक व्यापक दृष्टीकोन प्रदान करते.

२) पर्यावरणीय घटकांना मानवी इतिहासाचा एक अविभाज्य भाग म्हणून मान्यता देते.

३) इतिहासकारांना पर्यावरण आणि समाज यांच्यातील परस्परसंबंधांचे अधिक चांगल्या प्रकारे विश्लेषण करण्यास मदत करते.

**पर्यावरणीय इतिहासाचे महत्त्व :**

१) पर्यावरणीय इतिहास हा मानवी समाज आणि पर्यावरण यांच्यातील संबंधांचा अभ्यास करणारा एक इतिहासातील उपविषय आहे. यात समाजाचा पर्यावरणावर कसा परिणाम झाला? आणि पर्यावरणाने समाजांना कसे आकार दिले याचा समावेश आहे.

२) भूतकाळातील मानवी क्रियाकलाप, कृती आणि पर्यावरणावरील त्यांच्या परिणामाचा अभ्यास करून, पर्यावरण इतिहासकार अनेक नवीन अंतर्दृष्टी शासनकर्ते, धोरणकर्ते, निसर्गाचे संतुलन/समतोल राखण्यासाठी नियोजनकर्त्यांना यांना व समाजाला प्राप्त करून देतात.

३) आज आपण हवामान बदल, प्रदूषण आणि जैवविविधता नष्ट होणे यासारख्या अनेक गंभीर पर्यावरणीय आव्हानांना तोंड देत आहोत. भूतकाळातील चुका टाळण्यासाठी आणि अधिक शाश्वत भविष्यासाठी मार्ग शोधण्यासाठी हे ज्ञान आपल्याला उपयोगी ठरू शकते.

४) पर्यावरणीय इतिहास केवळ भूतकाळातील घटनांचा अभ्यास करण्यापुरते मर्यादित नाही तर हे एक मौल्यवान साधन आहे की जे आपल्याला वर्तमान समस्यांचे निराकरण करण्यासाठी आणि अधिक शाश्वत भविष्यासाठी मार्ग शोधण्यासाठी मदत करू शकते.

५) पर्यावरणाच्या रक्षणासाठी नैतिक युक्तिवाद करणे आवश्यक असले तरी, पर्यावरणीय इतिहासाचा अभ्यास करणे हे सिद्ध करते की मानवी समाज आणि पर्यावरण एकमेकांशी जोडलेले आहेत आणि आपल्याला ग्रहाची काळजी घेणे आवश्यक आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. १**

अ) योग्य पर्याय निवडा.

१) इंट्रोड्युसिंग कल्चरल स्टडीज हा ग्रंथ कोणी लिहिला आहे.

अ) झियाउद्दीन सरदार ब) जेकब बर्कहार्ड

क) जर्गन हबरमास ड) रणजीत गुहा

२) सांस्कृतिक इतिहास' या संकल्पनेची अथवा विद्याशाखेची निर्मिती केली असे मानले जाते.

अ) झियाउद्दीन सरदार ब) जेकब बर्कहार्ड

क) जर्गन हबरमास ड) रणजीत गुहा

३) इंटरप्रिटेशन ऑफ कल्चर हा ग्रंथ कोणी लिहिला आहे.

अ) क्लिफर्ड गिर्ट्झ ब) जेकब बर्कहार्ड क) जर्गन हबरमास ड) रणजीत गुहा

४) पर्यावरणीय इतिहास संशोधन कोणत्या देशात प्रथम सुरू झाले.

अ) अमेरिका ब) फ्रान्स क) भारत ड) इटली

५) कोणत्या वर्षी 'पर्यावरणाचा इतिहास' ही संज्ञा प्रथमत: रुढ झाली असे मानले जाते.

अ) १९७२ ब) १९७३ क) १९७४ ड) १९७५

ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) संस्कृतीचे आशयघन वर्णन ही संकल्पना कोणी मांडली.

२) 'प्रातिनिधिक' व 'समाजविश्व' ह्या संकल्पना कोणी मांडल्या आहेत.

३) मानव हा निसर्गाचाच एक भाग आहे'' जी संकल्पना कोणी मांडली.

४) 'इकोलॉजिकल इम्पीरिअलिझम' हा ग्रंथ कोणी लिहिला आहे.

५) भारतीय पर्यावरणवादी इतिहास लेखन कोणत्या इतिहासकारांनी प्रथम केले.

## २.२.२ सूक्ष्म इतिहास, समकालीन इतिहास (Micro History, Contemporary History)

### अ) सूक्ष्म इतिहास लेखन (Micro History)

इतिहास म्हणजे भूतकाळात काय घडले, कसे घडले हे शोधून काढणे, घटना मानवी कर्तृत्वाने घडतात की, ज्यांचे प्रतिबिंब कागदपत्रांमध्ये उमटत असते, म्हणून पुराभिलेखागारातील अस्सल कागदपत्रांचा शास्त्रशुध्द पध्दतीने अभ्यास करून मानवी इतिहासांची मांडणी करणयाची संकल्पना विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात इतिहासकारांच्यामध्ये स्पष्ट होती. त्यांनी ह्या कागदपत्रांच्यामध्ये प्रतिबिंबीत झालेला राजे-रजवाड्यांच्या युध्दांचा, घटनांचा व अभिजनवादी घटकांचा इतिहास लिहिण्याचा कार्यक्रम जोमाने राबविला. पुराभिलेखागारात जतन करून ठेवलेली कागदपत्रे व त्या कागदपत्रात प्रतिबिंबीत झालेला इतिहास नेमका कोणाचा इतिहास सांगलात हा प्रश्न या काळातील इतिहासकारांना पडला नाही. मात्र सन १९७० च्या दशकातील जगभरातील इतिहासकारांचना हा प्रश्न भेडसावू लागला, यातून पुढे सूक्ष्म अर्थात सूक्ष्म इतिहासलेखन प्रवाहाचा उदय झाला.

### अ) सूक्ष्म इतिहासाचा अर्थ :

इतिहासलेखनातील हा नवीन प्रवाह सन १९७० च्या दशकात उदयास आला. 'मायक्रोहिस्ट्री' (Microhitory) या इंग्रजीमधील शब्दाला मराठीमध्ये 'सूक्ष्म इतिहास' अथवा 'अंशलक्षी इतिहास' हा शब्दप्रयोग रूढ झाला. अलिकडे इतिहासलेखनात 'सूक्ष्म' हा शब्दप्रयोग विशेष प्रचलित झालेला आहे. या इतिहासलेखन प्रवाहाची अनेकांनी व्याख्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे. मात्र जोओवानी लेवी (Giovanni Levi) या इटालियन इतिहासकाराने सूक्ष्म इतिहासाचा अर्थ लावताना इतिहास लेखनामधील निरीक्षणाचे प्रमाण कमी करून इतिहास लेखनात सूक्ष्म विश्लेषण व कागदपत्राचा सखोल अभ्यास करण्यावर भर दिलेला आहे. "Microscopic observation will reveal factors previously unobserved...... phenomena previously considered to be sufficiently described and understand assume completely new meanings by alterning the scale of observation. It in then possible to use these results to draw far wider generalizations."

### ब) सूक्ष्म इतिहासलेखन प्रवाहाचा उदय :

ब्रिटिश इतिहासकार इ. पी. थॉम्पसन यांनी शोषित वर्गाचा अथवा शुद्र लोकांचा (Little People) इतिहासाला त्यांचा विसर पडण्यापूर्वी त्यांचा इतिहास लिहिण्यासाठी तळातून इतिहास (History from below) लिहिण्याची संकल्पना मांडली. थॉम्पसन यांच्या अपारंपारिक मार्क्सवादी विचारप्रवाहाने पुढे दोन

वेगवेगळ्या इतिहास संकल्पनांना तत्त्वाधार पुरवला. पहिली संकल्पना म्हणजे 'सबाल्टर्न स्टडीज' अर्थात 'वंचितांचा इतिहास' या विचाराच्या इतिहासकारांच्या गटाने भारताच्या संदर्भात सन १९८० च्या दशकात रणजित गुहा आणि त्यांच्या साथीदारांनी वंचितांच्या परिप्रेक्षातून इतिहासलेखन सुरू केले. सबाल्टर्न गटातील इतिहासकारांनी आपल्या लेखनातून 'इतिहासात कुठल्याही प्रकारचा आवाज नसलेल्या वंचित जनसमूहांना आवाज देण्याच्या हेतूने इतिहास लेखन प्रकल्प हाती घेतला. थॉम्पसन यांच्या या विचारांचा प्रभाव इटलीमधील काही इतिहासकारांच्यावर देखील पडला. ह्याच इतिहासकारांनी पुढे 'मायक्रोहिस्ट्री' अर्थात सूक्ष्म इतिहासलेखनाचा परीप्रेक्ष्य व तात्त्विक भूमिका विकसित केली. इटलीमधील या गटामधील इतिहासकारांच्या मध्ये 'क्वॉडेर्नी स्टोरीसी' (Quaderni Storici) या पत्रिकेशी संबंधित कार्लो गिन्झबर्ग, इडोआर्डी ग्रेन्डी, जिओवानी लेवी व कार्लो पोनी इत्यादीचा समावेश होता. या समूहाने सूक्ष्म इतिहासाची सैध्दांतिक मांडणी करण्यास सुरूवात केली. क्वॉडेर्नी स्टोरीसी या इटालियन गटाची सूक्ष्म इतिहासलेखन पध्दतीची सैध्दांतिक पध्दती, विचार, मांडणी व दृष्टीकोण प्रसिध्दीस आला.

सूक्ष्म इतिहास ही एक ऐतिहासिक लेखन पध्दती आहे की, जी व्यक्ती आणि लहान गटांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास करते. ज्यामध्ये विविध कल्पना, प्रथा, परंपरा, विश्वास व विविध कृतीचा अभ्यास असतो की, ज्या पारंपारिक इतिहास लेखनापासून दूर राहिलेल्या आहेत. सन १९६० ते १९७० च्या दशकात हा गट सांस्कृतिक मानववंश शास्त्रातील विकासामुळे ऐतिहासिक भिन्नतेकडे व जागतिक अनुभवाकडे आकर्षित झाला, त्यामध्ये त्यांची रूची वाढली. विशेषत: क्लिफर्ड गिर्ट्झचे कार्य सूक्ष्म इतिहासलेखन प्रवाहाच्या विकासात महत्त्वाचे ठरले. क्लिफर्ड गिर्ट्झने या काळात केलेली संस्कृतीची संकल्पना व केलेली सैध्दांतिक मांडणी लोकप्रिय झाली की, जी व्यक्तीच्या बाह्य व व्यक्तीगत जगाचा संबंध समजावून घेण्याची व अभ्यासाची परवानगी देतो. इटालियन गटाच्या इतिहासकारांनी केलेली ही सैध्दांतिक मांडणी पुढे फ्रॉन्स व उत्तर अमेरिकेतील संशोधकांनी उचलून धरली, त्याचे अनुकरण करण्यास सुरूवात केली, मात्र त्यांचे प्रयत्न इटालियन इतिहासकारांच्या एवढी नव्हता. सन १९८० च्या दशकाच्या सुरूवातीस मोठ्या सामाजिक गटाच्या विरोधात हा प्रवाह उदयास आला की, ज्याचा उद्देश छोट्या-छोट्या घटना व प्रसंगाचा अभ्यास हा होता.

**क) सूक्ष्म इतिहासेखनाची वैशिष्ट्ये :**

सूक्ष्म इतिहास लेखनाची काही ठळक वैशिष्ट्ये जोवोवानी लेवी या इटालियन इतिहासकाराच्या सन १९९१ मध्ये प्रकाशित झालेल्या 'ऑन मायक्रोहिस्ट्री' या लेखामध्ये पहावयास मिळतात. सूक्ष्म इतिहासलेखन प्रवाहाची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :-

**१) क्षुल्लक व चित्र-विचित्र प्रसंगाचा अभ्यास :**

पारंपारिक इतिहासलेखन हे मागणी इतिहासात घडलेल्या महत्त्वाच्या घटनांचा अभ्यास करते मात्र सूक्ष्म प्रवाह अगदी क्षुल्लक वाटणाऱ्या प्रसंगाचा अभ्यास करतो. क्षुल्लक प्रसंगाचा गांभीर्याने अभ्यास करणे ही याची विशेषतः आहे. यामागे एक निश्चित भूमिका आहे. क्षुल्लक व चित्र-विचित्र प्रसंग अथवा घटना अभ्यासून

त्यांना इतिहास लेखनात स्थान प्राप्त करून देणे ही भूमिका नसून क्षुल्लक प्रसंगांचे विश्लेषण करून एखाद्या मोठ्या ऐतिहासिक प्रश्नामध्ये प्रवेश करणे ही आहे.

**२) अर्थशून्य भासणाऱ्या घटनांचा अभ्यास :**

पारंपारिक इतिहास लेखनात महत्त्वाच्या घटना व प्रसंगाचा अभ्यास केला जातो. अर्थशून्य भासणाऱ्या घटनांना जाणीवपूर्वक बगल दिली जाते. मात्र सूक्ष्म इतिहासकार अगदी क्षुल्लक, चित्र-विचित्र व अर्थशून्य वाटणाऱ्या एखाद्या प्रसंगावर अथवा घटनेचे अतिसूक्ष्म विश्लेषण करून समाजातील परंपरांचे आकलन करून घेतात. एका अर्थाने विषम बाजूचा अभ्यास करून समबाजू मांडण्याचा ते प्रयत्न करतात. अर्थशून्य भासणाऱ्या घटनांचा अभ्यास करून अर्थ निर्माण करता येतो, विपरीतता अभ्यासून एकरूपता मांडता येते अशी भूमिका मांडतात एका अर्थाने ते अर्थशून्य भासणाऱ्या घटनांचा विरोधाभासातून अभ्यास करतात.

**३) अभ्यासाचे क्षेत्र व आकार सूक्ष्म करण्यावर भर :**

पारंपारिक इतिहासलेखन एखाद्या व्यापक प्रदेशाचा अथवा कालखंडाचा अभ्यास करण्यास प्राधान्य देते. मात्र सूक्ष्म इतिहास लेखन एखाद्या ठिकाणी वास्तव्य करणाऱ्या मानवी समूह, कुटुंबाचा अथवा व्यक्तीच्या संदर्भातील एखादा सूक्ष्म विषय निवडून अभ्यास करते. ज्याप्रमाणे सूक्ष्मदर्शक यंत्राचा वापर करून एखादा शास्त्रज्ञ जिवाणूंच्या एखाद्या वेगळ्या जगाची ओळख करून देता तीच भूमिका येथे सूक्ष्म अभ्यासकाची असते. सूक्ष्म इतिहासातील सूक्ष्मीकरण केवळ अभ्यासाचे क्षेत्र अथवा आकार कमी करण्यापर्यंत मर्यादित नाही तर ते अभ्यासल्या जाणाऱ्या कालखंडाला देखील सूक्ष्म करते. सूक्ष्म एखाद्या कुटुंबाचा अथवा व्यक्तीचा काळाच्या एका विशिष्ट अल्पावधीचा अभ्यास करते. त्याच्या अभ्यासाचा विषय अल्पावधीक प्रसंगनिष्ठ असतो.

**४) सामान्य इतिहासावर प्रकाश :**

सूक्ष्म इतिहासलेखन प्रवाहातील इतिहासकार अस मानतात की, एखाद्या व्यक्तीला काळाच्या एका विशिष्ठ क्षणाला आलेला अनुभव समजून घेणे हे इतिहास संशोधकापुढील आव्हान आहे. मात्र एखाद्या छोट्या समूहाचा, कुटुंबाचा किंवा व्यक्तीचा सूक्ष्म अभ्यास हे विषय खास आहेत. म्हणून करत नसून त्यांचा प्रमुख हेतू हा सामान्यांच्या इतिहासावर प्रकाश टाकणे हा असतो. खास अथवा विशेष विषयाचा सूक्ष्म अभ्यास ऐतिहासिक विश्लेषणाच्या व्यापक प्रश्नांची चर्चा करण्याचा मार्ग मोकळा करेल अशी या गटातील इतिहासकारांची धारणा आहे.

**५) कथा व वृत्तांताना इतिहालेखनात स्थान**

सूक्ष्म इतिहास लेखन प्रणालीमध्ये कथाना खूप महत्त्व दिले जाते. सूक्ष्म इतिहास लिहिण्याचे प्रमुख ऐतिहासिक साधन म्हणजे सर्वसाधारण अथवा दुय्यम/कनिष्ठ दर्जाच्या व्यक्तीने स्वत:बद्दल अथवा एखाद्या घटनेबद्दल दिलेला वृत्तांत किंवा सांगितलेली कथा. एखाद्या सर्वसाधारण व्यक्तीने सांगितलेली कथा इतिहासात ठराविक परिस्थितीमध्ये नोंदवली जाते. यामध्ये कोर्टामधील त्याची साक्ष अथवा एखाद्या घटनेचा

तपास करताना घेतलेली त्याची जबानी याचा समावेश होतो. त्यामुळे सूक्ष्म इतिहास लेखनात अशा साधनांना महत्त्वाचे स्थान आहे. युरोपीय इतिहासकारांनी १३ व्या ते १७ व्या शतकात ख्रिस्ती धर्मातील पाखंडमत शोधून काढण्यासाठी निर्माण केलेल्या इन्क्विझिशन (Inquisition) न्यायालयाने निर्माण केलेल्या दस्तऐवजांचा उपयोग सूक्ष्म इतिहास लिहिण्यासाठी मोठ्या खुबीने केलेला आढळतो. यामध्ये सूक्ष्म इतिहासलेखन करणारे इतिहासकार सर्वसाधारण व्यक्तीने साक्ष देताना सांगितलेल्या कथा बारकाईने अभ्यासतात. त्यांचे लक्ष ह्या कथा कशा तयार केल्या गेल्या याकडे असते. सांगितलेल्या कथांचा अर्थ अधिकारी मंडळीनी कसा काढला हे समजण्याचा ते प्रयत्न करतात. कारण सूक्ष्म इतिहासकार सर्वसाधारण लोक स्वत:बद्दल काय कथा सांगतात. या बाबतीत संवेदनशील असतात. एका अर्थाने ते कथा कशा सांगितल्या जातात याची कथा सांगतात ( Letter of stories of how stories are told).

### ६) साध्या घटनेतील क्लिष्टता करतात :

सूक्ष्म इतिहासलेखनात संशोधक एखादी वरपांगी अथवा साधी वाटणारी घटना निवडतात व नंतर त्यामधील गुंतागुंतता अथवा क्लिष्टता स्पष्ट करतात. यासंबंधी जो ओवानी लेवी म्हणतात की, इतिहासकाराने नेहमी एखाद्या व्यक्तीने सांगितलेल्या कथेतील विरुध्द कथनाकडे (counter-narrativ) लक्ष दिले पाहिजे. एखादा व्यक्ती स्वत:ची कथा सांगताना त्यामधील वरपांगी महत्त्वाच्या वाटणाऱ्या गोष्टीच्या बुडाशी जाऊन दडलेले अर्थ शोधणे या संदर्भात महत्त्वाचे ठरते. व्यक्ती आपल्या कथेत काय सांगतो यापेक्षा तो काय सांगत नाही हेही तितकेच महत्त्वाचे ठरते. कथेमधील मौन हा कथेचा महत्त्वाचा घटक ठरतो.

या संशोधनावर अथवा काही सूक्ष्म इतिहासलेखन करणाऱ्या इतिहासकारावर क्लिफोर्ड गर्टज या मानववंशशास्त्राच्या विचारांचा प्रभाव जाणवतो. क्लिफर्ड गिर्ट्झ याने आपल्या "Thick Description : Toward an Interpretive theory of Culture' या लेखात इंडोनेशिया मधील बाली बेटावरील आदिवाशी लोकांच्या अभ्यासात वापरलेली 'दाट वर्णनाची' पध्दत. सूक्ष्म इतिहासकारांनी स्विकारलेली आहे. क्लिफर्ड गिर्ट्झ यांनी ती पध्दती वापरून ह्या आदिवासी लोकांच्या कोंबड्यांची झुंज ह्या खेळाचे बारीक निरीक्षण करून दाट वर्णन केले. कोंबड्याच्या झुंजीच्या खेळात वापरल्या जाणाऱ्या विधीतील चिन्हसंहितेची उकल केली. पुढे क्लिफर्ड गिर्ट्झ यांचा प्रिन्स्टन विद्यापीठातील विद्यार्थी रोबर्ट डार्नटन यांने आपल्या 'द ग्रेट कॅट मॅसॅकर' या सूक्ष्म इतिहासात याचा प्रभावी वापर केला. सन १७३० च्या दशकात पॅरिसमधील एका छापखान्यातील कामगारांनी आपल्या मालकांच्या मांजरांची कत्तल का केली हा प्रश्न हाताळला. डार्नटन यांने पुराव्यांचा खल करून कामगारांनी मांजराची कत्तल करताना केलेल्या विधीचे दाट वर्णन केले व त्याच्या मानसिकतेचा शोध घेतला, अर्थात एखाद्या वरपांगी व साध्या घटनेमागील क्लिष्टता स्पष्ट करण्याचा हा प्रयत्न होता.

### ड) सूक्ष्म इतिहासलेखन प्रवाहातील एक प्रमुख इतिहासकार : कार्लो गिंझबर्ग

सूक्ष्म इतिहासलेखन पध्दतीचा पहिल्यांदा उपयोग केला तो इटालियन इतिहासकार कार्लो गिंझबर्ग. सन १९७६ मध्ये गिझबर्ग यांनी 'चीज ॲण्ड वर्म्स' या शीर्षकाखाली १६ व्या शतकात इटलीमधील एक विचित्र

प्रसंग अभ्यासला व तो प्रसिध्द केला. यामध्ये त्यांनी मेनोकियो नावाच्या एका पिठाच्या गिरणी मालकावर ख्रिस्ती धर्माच्या विरुध्द पाखंडीपणा करण्याचा आरोप केला होता. त्याचे पाखंडमत शोधून काढण्यासाठी नेमलेल्या इन्क्विझिशन न्यायालयासमोर त्याला उभे करून त्याची दोनदा साक्ष घेण्यात आली. त्याचबरोबर त्याच्या इतर सहकाऱ्याच्याही साक्ष घेण्यात आल्या. मेनोकियाने आपल्या साक्षीमध्ये जग हे परमेश्वराने तयार केले नसून ते दुधापासून बनलेले चीझ कुजल्यामुळे निर्माण झाले आहे, अशी साक्ष दिली. त्यामुळे न्यायालयाने त्याला पाखंड्यात बाळगण्यासाठी मृत्युदंडाची शिक्षा दिली. गिझबर्ग याने ह्या घटनेचा तपशीलवार व सूक्ष्म पध्दतीने अभ्यास करून तत्कालीन सामान्य समाजाच्या तळाशी असलेल्या व सामाजिक चालीरिती व भूमिका उघड केल्या.

गिझबर्ग यांनी या ग्रंथातून अंतोनियो ग्रामचीच्या 'सांस्कृतिक धुरीणत्वाच्या' संकल्पनेचा ऊहापोह केलेला आहे. त्यांच्यामते, अभिजनवादी वर्गाच्या ह्या सांस्कृतिक धुरणीत्वाला तळातील लोक आव्हान देखील देतात. अभिजन वर्गाचे शोषित- अंकित लोकांच्या वर्गावर सांस्कृतिक धुरीणत्व प्रबळपणे प्रस्थापित असले तरी अनेक वेळेला ह्या धुरीणत्वाला ततळातून विरोध होत असतो. गिझबर्गच्या मतानुसार अभिजन वर्गाच्या सांस्कृतिक धुरीणत्वाला आव्हान किंवा प्रतिकार एखादी सामान्य व्यक्ती देखील करू शकते. त्याचा हा विरोध आपल्या वेगळ्या चालीरीती, कृत्य अथवा विचारांच्या माध्यमातून असतो. आणि अशा प्रकारच्या सामान्य घटकामधून सूक्ष्म इतिहासकार आपल्या लिखाणातून अशा प्रकारचे प्रसंग शोधून त्यांच्या आधारे सामान्य लोकांचा इतिहास लिहू शकतो.

गिझबर्ग यांनी या अभ्यासातून 'दडपशाहीची दफ्तरे' (Archives of Repression) ही संकल्पना मांडलेली आहे. त्यांच्या मते, जुन्या कागदपत्राची दफ्तरे ही दडपशाहीचे प्रतिनिधीत्व करतात. कारण मुळीच ही कागदपत्रे सामाजिक नियंत्रण करणाऱ्या संस्थानी निर्माण केलेली असतात. हे जरी खरे असले तरी ह्या दफ्तरांच्यामध्ये ज्यांना दडपण्यात आले अशा लोकांचे विचार, शब्द व कृत्य नियंत्रण करणाऱ्या संस्थाची इच्छा नसतानाही जतन केली जातात. हा एक विरोधाभासच आहे की, दडपशाहीच्या दफ्तरामध्ये आपल्याला अशा प्रकारच्या वंचित, शोषित, दुय्यम लोकाचा ज्यांना दडपले गेले त्यांचा आवाज सापडतो.

गिंझबर्ग हे संरचनावादाचा तिरस्कार करताना दिसतात, त्यांच्या मते, संरचनावादी दृष्टीकोन असं मानतो की, मानवाला माहित नसलेल्या व त्याच्या नियंत्रणबाह्य असलेल्या शक्ती अथवा घटक मानवी इतिहासाची दिशा ठरवतात. मार्क्सवाद संरचनावादाचा उत्तम नमुना आहे. मार्क्सवादी दृष्टिकोण एखाद्या व्यक्तीच्या अथवा वर्गाचा उत्पादनाच्या साधनांशी असलेला त्याचा संबंध इतिहास घडवतो. त्यामुळे इतिहास घडविण्यात लोकांना कोणत्याही प्रकारचे कारकत्व असत नाही. त्यामुळे गिझबर्ग अशा संरचनावादी विचारांना ते मानत नाहीत. उलट इतिहास घडविण्यात मानवाला कारकत्व असते व ते ओळखून त्याची पुर्नबांधणी करणे ही इतिहासकारांची जबाबदारी आहे, असे गिझबर्ग म्हणतात.

**इ) सूक्ष्म इतिहासलेखनाच्या मर्यादा :**

सूक्ष्म इतिहास लेखन काही निश्चित मर्यादा आहेत त्या खालीलप्रमाणे :-

१) सूक्ष्म इतिहास लेखनाचा मुख्य हेतू क्षुल्लक घटनांचा अभ्यास करून मोठ्या ऐतिहासिक प्रश्नामध्ये प्रवेश करणे हा जरी असला तरी अनेक इतिहासकारांना मोठे ऐतिहासिक प्रश्न हाताळणे सोयीस्कर वाटत नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे बहुतेक वेळेला त्यांचे विषय व्यक्ती किंवा प्रसंग केंद्रित असतात. अशा व्यक्ती ज्यांनी बंडखोरी किंवा कुठलातरी गुन्हा केलेला असतो. ज्यांचे हे कृत्य दडपण्यासाठी सत्ताधीशांनी त्यांची साक्ष नोंदवून ठेवलेली असते. वास्तविक पाहता हे काही सर्वसाधारण लोक ज्यांना इतिहासात कोणत्याही प्रकारचा आवाज नाही अशी नसतात. त्यांच्याकडे प्रस्थापित अभिजन वर्गाच्या सांस्कृतिक धुरीणत्वाविरुध्द आवाज उठविण्याचे धाडस असते. त्यांनी हे धाडस केले, म्हणूनच त्यांची साक्ष अभिजन वर्गाने निर्माण केलेल्या ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये नोंदवली गेलेली असते. अशावेळी इतिहासकाराला खऱ्याखुऱ्या सामान्य वंचित-शोषित लोकाबद्दल तर्क-वितर्क मांडता येतील काय?

२) सूक्ष्म इतिहास लेखनात इतिहासकार अल्पकालीन घटनांचा अथवा प्रसंगाचा अभ्यास करतो अशावेळी काळाच्या ओघात झालेले बदल अभ्यासणे व ते का? व कसे? घडून आले या प्रक्रियेचे विश्लेषण करू शकत नाही. अभ्यासाचा कालखंड अल्प असल्यामुळे समाजात दीर्घकालीन झालेले बदल दर्शवू शकत नाही.

३) सूक्ष्म इतिहास लेखनात वापरलेले एखादी साक्ष अथवा जबानी ही त्यांच्या स्वत:च्याच शब्दात आहे की नाही हे ठरवणे अवघड आहे. कारण न्यायालयातील कारकून साक्षीदाराने दिलेल्या साक्षीला शुध्द करून प्रस्तापितांच्या शब्दात लिहून ठेवत असे. ह्या प्रक्रियेमुळे साक्षीदाराने वापरलेली लोकसंस्कृती मधील शब्द गाळले जात किंवा त्याच्याऐवजी वेगळे अभिजनवादी शब्द वापरले जात किंवा त्याच्याऐवजी वेगळे अभिजनवादी शब्द वापरले जात. याचाच अर्थ असा की, कोणत्याही न्यायालयीन हा अथवा पोलिस तपासणीत दिलेली साक्ष ही साक्षीदाराने वास्तवात वापरलेल्या शब्दांचे पूर्णपणे प्रतिरूप नसते.

४) एखाद्या घटनेतील साक्षीदार हा त्याला विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देत असतो. त्यामुळे एका अर्थाने साक्ष देणारा व्यक्ती हा त्याने अनुभवलेल्या प्रसंगाचे पूर्ण वर्णन नसून त्याला ह्या प्रसंगाबद्दल विचारलेल्या काही प्रश्नांची उत्तरे असतात. त्यामुळे त्याने दिलेली साक्ष ही घडलेल्या प्रसंगाचे पूर्णपणे प्रतीरूपण करते का हा प्रश्न निर्माण होतो.

**ई) सूक्ष्म इतिहासलेखनाचे फायदे :**

सूक्ष्म इतिहास लेखनामध्ये काही अडचणी अथवा त्रुटी असल्या तरी त्यांचे अनेक फायदे अथवा जमेच्या बाजूदेखील आहेत. त्या खालीलप्रमाणे :-

१) सूक्ष्म इतिहासलेखन प्रवाह वाचकासमोर मानवी चेहरा असलेला इतिहास आणतो.

२) इतिहासातील खऱ्या खुऱ्या सामान्य लोकांच्या जीवनातील प्रसंगाबद्दल वाचकाला माहिती मिळते.

३) सूक्ष्म इतिहासामध्ये पुराव्याची शहानिशा (सूक्ष्म विश्लेषण) केलेली असते, त्यामुळे वंचित घटकांचा इतिहास समजण्यास मदत होते.

४) वंचित, शोषित व सर्वसाधारण लोकांचा व अगदी क्षुल्लक घटना अथवा प्रसंगाचा अभ्यास याचे प्रमुख आकर्षण आहे.

५) त्यांना कोणत्याही प्रकारे आपले मत व्यक्त करण्याचा अधिकार नव्हता, मात्र एखाद्या खटल्याच्या, तपासणीच्या किंवा तंट्याच्या परिस्थितीमुळे सत्ताधारी अथवा अभिजनवादी वर्ग त्यांच्या साक्ष अथवा जबानीची नोंद ठेवली.

**ब) समकालीन इतिहास**

'समकालीन' ही संकल्पना अथवा संज्ञा इंग्रजीमधील 'Contemporary' या शब्दाला मराठीत पर्यायवाची शब्द आहे. 'समकालीन' हा शब्द साहित्य क्षेत्रात मोठ्या खुबीने वापरला जातो. साहित्यिक, नाटककार, कवि, समीक्षक व टीकाकार या शब्दाचा वापर वारंवार करतात. आपण या ठिकाणी 'समकालीन' चा संबंध इतिहास लेखनाच्या दृष्टीकोनातून पाहणार आहोत. 'अलीकडील भूतकाळाचा' (Recent Past) यासाठी 'समकालीन इतिहास' ही संकल्पना अथवा संज्ञा वापरली जाते. एका अर्थाने ही संज्ञा विसाव्या शतकाच्या इतिहासाबद्दल असलेल्या ग्रंथांचे वर्णन करण्यासाठी वापरली जाते. एखाद्या इतिहास संशोधकाने स्वत:च्या जीवनाशी संबंधी अथवा समकालीन काळाशी संबंधीत इतिहास लेखन केलेले असेल तर अशा इतिहासाला समकालीन इतिहास म्हणून संबोधतो. 'समकालीन' या संज्ञेची जाणीव (साहित्य/ इतिहास) मुळात भारतीय नाही. सामाजिक व राजकीय तत्त्वज्ञानाच्या संदर्भात युरोपीय देशात २० व्या शतकात या संज्ञेचा वापर झाला. 'Contemporary' हा शब्द लॅटिनमधील 'Contem Porarious' पासून तयार झालेला आहे. 'con' म्हणजे एकत्र व 'Tempus', 'Tempur' म्हणजे काळ. यामधील 'Tempus' हा लॅटिन 'Tempur' हा इंग्रजी शब्द मात्र दोन्हीचा अर्थ वेळ, काळ या अर्थाने आहे. म्हणून 'Contemporary' म्हणजे एका काळात राहणारे अथवा 'ज्या काळात आहात त्या काळाशी सुसंगत असणे' म्हणजे आपण ज्या काळात राहतो, वावरतो, त्या काळातील घडलेल्या घटनांचा इतिहास. काही इतिहासकार व संशोधक समकालीन इतिहासाला ऐतिहासिक अभ्यास करण्यासाठीचा विषय निवडण्याची पध्दती मानतात, वर्तमानकाळातील समस्या अथवा प्रश्नावर आधारलेल्या विषयांच्या अभ्यासाला समकालीन इतिहास म्हटले जाते.

**समकालीन इतिहासाची व्याख्या :**

समकालीन इतिहासाची निश्चित अशी व्याख्या आज तरी उपलब्ध नाही. इतिहासकार व संशोधक यांच्यामध्ये सकालीन इतिहासाच्या संकल्पनेवरून मतमतांतरे आहेत. काही इतिहास संशोधक आधुनिक इतिहासाचा एक उपघटक म्हणून या ज्ञानशाखेच्या संकल्पनेकडे पाहतात, तरीही काही इतिहास संशोधकांनी 'समकालीन इतिहासाला परिभाषित करण्याच्या प्रयत्न केलेला दिसतो. जर्मन इतिहासकार हरमन हीमपेल ह्यांनी सन १९५७ मध्ये समकालीन इतिहासाची व्याख्या 'सर्वात शेवटच्या किंवा सर्वात अलीकडील उलथापालथीच्या घटनेपासून सुरू होणारा काळ' अशी केली होती. (Any Present time begins with the last catastrophe, the most recent one) समकालीन इतिहासाची हरमन हीमपेल यांची व्याख्या

आपण मानली तर समकालीन इतिहासाचा कालखंड हा प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक इतिहासाच्या कालखंडाप्रमाणे न बदलणारा नसून तो सातत्याने बदलणारा बनतो.

गिओफ्री बाराक्लोव यांनी सन १९६४ मध्ये 'ॲन इंट्रॉडक्शन टू कंटेम्परारी हिस्ट्री' हा ग्रंथ प्रसिध्द केला. यामध्ये 'समकालीन इतिहास' यासंबंधी बाराक्लोव यांनी अशी भूमिका मांडलेली आहे की, 'समकालीन इतिहास' हा आधुनिक इतिहासापेक्षा 'गुणवत्ता व आशया'मध्ये (Quality and Content) वेगळा असतो. या दृष्टीकोणातून समकालीन इतिहासाची व्याख्या करताना बाराक्लोव म्हणतात की, 'आजच्या जगात आस्थित्वात असलेले प्रश्न जेव्हा सदृश्य आकार घ्यायला लागतात, तेव्हापासून समकालीन इतिहास सुरू होतो.' (Contemporary History begins when the problems which are actual in the world today first take visible shape.)

**ब) समकालीन इतिहास लेखनाचा विकास :**

समकालीन इतिहास लेखनाचा मुख्य उद्देश अलीकडील भूतकाळातील काही पैलू अथवा वर्तमान काळातील काही घटना, विकासाच्या संकल्पना, संदर्भ आणि त्याची ऐतिहासिकता समजून घेणे असा असला तरी 'हिस्ट्री' हा शब्द ज्या 'हिस्टॉरिया' या ग्रीक भाषेतील शब्दावरून आला आहे. त्याचा मूळचा अर्थ 'समकालीन घडामोडीचे ज्ञान' असा होतो. थ्युसीडीडीजने (सनपू. ४००-४५५) पेलोपॉनेशियन आणि अथेनियन लोकांच्यामधील युध्दाचे कथन व लेखन केलेले आहे. थ्युसीडीडीज स्वत: या युध्दात सहभागी होता. युध्द सुरू होताच त्याने आपल्या लिखाणाला सुरुवात केली होती. या ग्रंथात थ्युसीडीडीजने एक खंत व्यक्त केलेली आहे की, त्याला दूरवरच्या भूतकाळाबद्दल किंवा स्वत:च्या काळाच्या पूर्वीच्या कालखंडाबाबत अचूक ज्ञान मिळणे अशक्य होते. म्हणजे दूरवरच्या भूतकाळाचा इतिहास लिहीण्यावर साधनांच्या असल्यामुळे इतिहासाच्या ज्ञानशाखेवर अनेक प्रश्न व संशय निर्माण होतात. थ्युसीडीडीज यासारख्या इतिहासकारांनी लिहीलेला 'अलीकडच्या भूतकाळाचा इतिहास' हा दूरवरच्या भूतकाळाचा इतिहास बनला, हळूहळू जात दूरवरच्या भूतकाळाच्या अभ्यासाला मान्यता प्राप्त होत गेली.

**१) १९ व्या शतकातील दृष्टीकोण :**

१९ व्या शतकापर्यंत लिहीले गेलेले सर्व इतिहास अलीकडील भूतकाळाचा इतिहास अर्थात समकालीन इतिहास सांगणारे होते. याचे प्रमुख कारण म्हणजे या काळात दूरवरच्या भूतकाळाचा शास्त्रशुध्द पध्दतीने अभ्यास करण्यासाठी लागणारे संशोधन तंत्र व साधने तपासण्याची पध्दती विकसित झालेली नव्हती. छापखाने अस्तित्वात येण्याच्या अगोदर कागदपत्रे सहजासहजी मिळवणे शक्य नव्हते. दूरवरच्या भूतकाळाबद्दल लिखित कागद अथवा पुरावे हे जवळजवळ अस्तित्वातच नव्हते आणि जे उपलब्ध होते ते त्रोटक व विखुरलेल्या स्वरूपात उपलब्ध होते. त्यामुळे १९ व्या शतकाच्या पूर्वीच्या व पूर्वाधातील इतिहासकारांना आपले लिखाण स्वत:च्या निरीक्षणावर व समकालीन व्यक्तीच्या मुलाखतीच्या आधारे लिहावे लागत होते.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात युरोपियन इतिहासकारांध्ये असा विचार प्रबळ झाला की, एखादी घटना घडून गेल्यानंतर, एखादी पिढी संपल्यानंतरच त्या घटनेचा वस्तुनिष्ठपणे इतिहास लिहीला जावू शकतो. वस्तुनिष्ठ इतिहास म्हणजे, वर्तान काळातील वाद अथवा प्रश्नांचा कोणताही संदर्भ न घेता, 'जे काही घडले ते लिहिणे' (to write history "as it actually happened") इतीहासकाराचे काम भूतकाळाचे मापन करणे नाही अथवा वर्तान काळातील लोकांना भविष्यकाळाच्या फायद्यासाठी कोणतीही शिकवण द्यायची नाही तरी फक्त 'जे घडले ते सांगणे' हे आहे असा युक्तीवाद या काळात रान्केने केला. रान्केच्या या विचारांचा प्रभाव २० व्या शतकाच्या शेवटपर्यंत जगाच्या काना कोपर्यातील इतिहास अभ्यासक, संशोधकांच्यावर होता. भारतामध्ये रान्के प्रभावाचे प्रत्ययंतर आजही वारंवार दिसून येते.

**२) २० व्या शतकातील बदल :**

२० व्या शतकाच्या उत्तरार्धात अनेक तत्त्वज्ञ विचारवंतांनी इतिहास संशोधनाच्या पध्दती व वैज्ञानिक संशोधनाच्या पध्दतींची तुलना सुरू केली. इतिहास लेखन पूर्णपणे वस्तुनिष्ठ होवू शकते का हा ह्या विचारवंतांच्यामधील वादाचा अथवा तुलनेचा विषय होता. इतिहास लेखनाच्या पूर्ण वस्तुनिष्ठतेवर प्रश्नचिन्ह उभे केले गेले. पहिले व दुसरे महायुद्ध यासारख्या मोठ्या घटना युरोपच्या धर्तीवर घडल्या, या घटनाचे विश्लेषण करण्यासाठी, त्याची कारणमिमांसा, चिकीत्सा करण्यासाठी 'अलीकडच्या भूतकाळाचा अभ्यास करणे क्रमप्राप्त झाले. विशेषत: दुसर्या महायुध्दामुळे जागतिक इतिहासाचे एक नवीन पर्व सुरू झाले असा समज अनेक संशोधक, अभ्यासकांचा झाला होता.

१९८० च्या दशकात एक विशिष्ठ ज्ञानशाखा म्हणून समकालीन इतिहासाचा विकास झालेला होता. याकाळात सामाजिक परिवर्तनाचा वेग आणि स्थित्यंतरांचा अभ्यास करणे इतिहासकारांना गरजेचे वाटत होते. अलिकडील भूतकाळ राजकीय आणि सार्वजनिक जीवनामध्ये वाद निर्माण करत होता. विशेषत: दुसर्या महायुध्दानंतर कल्याकारी राज्य स्थापन करण्याच्या संबंधात राजकीय पक्षाची भूमिका व अभिजनवादी वर्गाची भूमिका यासारखे वादाचे मुद्दे होते. यासाठी ऐतिहासिक व आंतरशाखीय पध्दतीशास्त्राचा वापर करून या विवादाचा अलीकडील भूतकाळाचा विश्लेषणात्मक पातळीवर अभ्यास करण्यासाठी प्रयत्न सुरू झाले, यातून इ. स. १८८६ मध्ये समकालीन ब्रिटीश इतिहास संस्थेची स्थापना झाली. (Center for Contemporary British History) त्यानंतर हे केंद्र समकालीन इतिहासकारांचे आकर्षण ठरले. युरोपीय इतिहासकारांनी २० व्या शतकाच्या उत्तरार्धात मोठ्या प्रमाणात समकालीन इतिहास लिहीण्यास सुरुवात केली.

सन १९९० च्या दशकात नेदरलँडमध्ये समकालीन इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी एका संस्थेची स्थापना झाली. त्यानंतर इ. स. १९९९ मध्ये ही संस्था लंडन मध्ये आणली गेली. या संस्थेतील संस्थापक अथवा अभ्यासकांना जर्मनीमध्ये नेमके काय घडत होते किंवा का घडले हे जगाला दाखवून द्यायचे होते, जाणून घ्यायचे होते. या काळात अलिकडच्या भूतकाळाचा अभ्यास करण्याची सर्वात जास्त गरज पश्चिम जर्मनीतील अभ्यासकांना वाटू लागली. पारंपारिक समाजापासून अलिप्त असलेल्या अभ्यासपूर्ण 'वस्तुनिष्ठ' इतिहासाने जर्मनीतील लोकांना 'जीवन जगण्यासाठी योग्य दिशा दाखवण्यात अपयश आले होते' आणि

म्हणूनच जमर्नीमधील लोकांनी हिटलरच्या हुकूमशाहीला पाठिंबा दिला होता अशी भावना जमर्न इतिहासकरांच्यामध्ये उदयास आली होती. ह्या भावनेच्या प्रभावाखाली जमनीतील इतिहासकारांनी 'समकालीन इतिहास' लिहीण्याच्या प्रकाराला मान्यता दिली.

**३) विश्वसनीय साधनांची संकल्पना व समकालीन इतिहास :**

इतिहास लेखन पध्दतीमध्ये शासकीय कागदपत्रे व पुराभिलेखागारातील लिखित साधनांना लिओपोल्ड रान्के व इतर आधुनिक विज्ञानवादी विचारवंतांनी खूप महत्त्व दिले होते. 'विश्वसनीय साधनांची' (Reliable Sources) इत्यादीची त्यांची एक संकल्पना होती, ज्यामध्ये त्यांच्या वैज्ञानिक इतिहासलेखनाच्या दृष्टीकोणातून 'पुराभिलेख गटातील लिखित साधनांना' अनन्यसाधारण महत्त्व होते. लिखित साधनाशिवाय इतिहास लिहीता येत नाही (No document NO History) ह्या रान्केवादावर इतिहासकारांचा विश्वास होता. स्वत: रान्के जुना बाजारात जाऊन कागदपत्र विकत घेत असे. महाराष्ट्रामध्ये वि. का. राजवाडे व डी. बी. पारसनीस यासारखे इतिहासकार की जे रान्केंच्या संकल्पनेवर विश्वास ठेवणारे होते ते पायपीट करून अनेक खटाटोप करून अस्सल लिखित कागदपत्रे मिळवित असत. २० व्या शतकाच्या पूर्वार्धात पुणे शहरामध्ये मराठा इतिहासाच्या कागदपत्रावरून इतिहासकारांच्या दोन गटात राजकारण झाले होते.

१९ व्या शतकातील रान्के आणि इतर इतिहासकारांच्या वैज्ञानिक दृष्टीकोणातून इतिहास लेखन करण्याच्या पध्दतीचा प्रभाव आजदेखील आपल्यावर जाणवतो. ह्या प्रभावामुळेच अलीकडच्या अर्थात समकालीन इतिहास लिहीणे हे इतिहासकाराचे काम नाही अशा प्रकारचा समज आपल्यामध्ये दृढ झाला आहे. वर्तमानकाळाच्या जास्त जवळ असलेल्या भूतकाळाचा इतिहास लिहीला तर इतिहासकारांचा ऐतिहासीक परिप्रेक्ष्य चुकतो आणि त्यांना वस्तुनिष्ठ व नि:पक्षपाती लिखाण करता येत नाही असे आजदेखील संशोधकाला वाटते.

युरोपमधील इतिहास अभ्यासक व संशोधकांचा इतिहास लेखनातील शासकीय कागदपत्रांच्या अर्थात पुराभिलेखागारातील कागदपत्रांच्या महत्त्वावरील विश्वासाला २० व्या शतकाच्या मध्यास तडा गेला. उदा. दुसर्या महायुध्दकाळातील एका ज्यू धर्माच्या मुलीने लिहीलेल्या 'डायरी ऑफ आने फ्रांक' मधील रोजनिशीतील मजकुरावरून येते. आने फ्रांकने एका ठिकाणी उच्च शिक्षित गेरीत बोल्केन्स्टीन यांनी रेडिओवर केलेल्या विनंतीचा उल्लेख केला आहे. बोल्केनस्टीन यांनी लोकांना त्यांनी लिहीलेल्या डायर्या, पत्र, आठवणी व रोजनिशी गोळा करण्यासाठी विनंती केली होती. बोल्केनस्टीन यांच्यामते, इतिहास हा नुसत्या शासकीय निर्णय अथवा कागदपत्रांच्या आधारे लिहीला जाऊ शकत नाही, जर नाझी लोकांनी ज्यू लोकांवर काय-काय आणि कसे अत्याचार केले हे जर भविष्यकाळात लोकांना समजायचे असेल तर साधारण कागदपत्रे गोळा करून इतिहास लिहीणे गरजेचे होते. कारण दैनंदिन व्यवहाराच्या नोंदी ठेवण्याची आवश्यकता समाजाला वाटत नाही, तर या गोष्टी पुराभिलेखागारामध्ये सापडत नाहीत. जनसामान्याच्या दैनंदिन व्यवहाराबाबतीत पुराभिलेखागार मौन बाळगतो, त्यामुळे घडून आलेला बदल, सामाजिक, राजकीय, आर्थिक स्थित्यंतर त्याला दिलेला प्रतिसाद किंवा केलेला प्रतिकार जाणून घेण्यासाठी इतर साधनांच्याकडे पहावे लागते.

### ४) अंतरिमकाळाची संकल्पना व समकालीन इतिहास :

वस्तुनिष्ठ इतिहासलेखन करण्यासाठी घडणार्या घटना आणि इतिहासलेखनाचा काळ यांच्यामध्ये विशिष्ठ अंतर असणे गरजेचे असते अशी कल्पना आपल्यामध्ये रूढ झालेली आहे. ह्याच अंतराच्या कल्पनेमुळे इतिहास आणि वर्तमान काळामध्ये एक 'अंतरिक काळ' म्हणजे साधारण ३० वर्षाचा असला पाहीजे असा समज आहे. अनेक देशांच्यामध्ये सरकारी कागदपत्रे ३० वर्षांनी खुली करण्याची पध्दती आहे, त्यामुळे हा काळ गृहित धरला जातो, त्यामुळेच सरकारी कागदपत्रे, गोपनीय अभिलेख, अहवाल इत्यादी दस्तावेज अभ्यासल्याशिवाय एका परिपूर्ण इतिहासाची मांडणी करता येणार नाही असा अनेक इतिहासकारांचा समज आहे. सरकारी कागद प्राप्त झाल्यानंतरच एखाद्या काळाचा अथवा घटनेचा इतिहास लिहीला जाऊ शकतो आणि म्हणूनच समकालीन इतिहास कधीच परिपूर्ण होऊ शकत नाही असे अनेक इतिहासकारांना वाटते. मात्र आपल्याला हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे की, जुन्या पिढीतील इतिहास लेखकांनी 'अभिलेखागारातील सरकारी कागदपत्राच्या उपलब्धतेच्या आधारे लिहीलेला इतिहास आणि वर्तमानकाळाच्यामधील ३० वर्षाच्या अंतराळाच्या नियमाला आज फार अर्थ उरलेला नाही.

### ५) पारंपारिक साधनांच्या पलिकडे एक नवीन दृष्टीकोण :

सन १९८०-९० च्या दशकापासून इतिहास लेखनाचे नवीन दृष्टीकोण अथवा प्रवाह आणि पध्दती निर्माण झालेल्या दिसतात. यालाच नूतन इतिहास (New History) असे संबोधले जाते. यामध्ये प्रामुख्याने सामाजिक इतिहास, नागरी इतिहास, स्त्रीवादी इतिहास, लिंगभेद, पुरुषत्वाचा इतिहास, वंचित इतिहास, स्थानिक इतिहास, लिंगभेद आणि पुरुषत्वाचा इतिहास, अंशलक्षी इतिहास, समकालीन इतिहास इत्यादीचा समावेश होतो. नूतन इतिहासाचे लिखाण करताना शासकीय कागदपत्रे कितपत उपयोगी पडतील अथवा वापरात येतील हा एक प्रश्नच आहे. कारण वर उल्लेख केलेल्या पारंपारिक इतिहास लेखनाच्या कल्पना, संकल्पना व समज हे अत्यंत संकुचित स्वरूपाचे आहेत हे आता बहुतेक इतिहासकारांना जाणवू लागलेले आहे. इतिहास लेखन पध्दतीमध्ये आधीच्या काळात सरकारी कागदपत्रांना जेवढे महत्त्व दिले जात होते, तेवढे या नवीन दृष्टीकोणवादी इतिहास लेखनात होत नाही. No document No History हा आग्रह सद्यस्थितीत विशेषत: भारतासारख्या देशात एका मर्यादेपलीकडे ताणता येणार नाही. इतिहासाच्या कक्षा जसजशा रुंदावल्या, तसतशा अपारंपारिक साधनाकडे अधिक औदार्याने पाहण्याचा दृष्टीकोणही आढळून येत आहे. कारण कोणत्याही काळाचे इतिहास कथन करण्यासाठी पुराभिलेखागारातील सरकारी लिखित साधनांची उपलब्धता अनिवार्य असते असे आता आपल्याला म्हणता येणार नाही. अशासकीय अथवा गैरसरकारी कागदपत्रे, दस्तावेज, आठवणी, अहवाल, वृत्तपत्रे, रोजनिशी, मालमत्तेची कागदपत्रे इत्यादीसारखी सामान्य अथवा तळागाळातील लोकांना इतिहास लोहीण्यासाठी किती महत्त्वाची आहेत हे वंचित इतिहास लेखन प्रवाह अभ्यासकानंतर लक्षात येते. सरकारी कागदपत्रे इतिहास लेखनासाठी महत्त्वाची नाहीत असे नाही, मात्र आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, ही कागदपत्रे सरकारी दृष्टीकोनाचे प्रतिनिधीत्व करतात.

## ६) समकालीन इतिहास लेखनाची गरज :

समकालीन इतिहास लेखनाचे जागतिक स्तरावरील महत्त्व पाहता भारताच्या अथवा महाराष्ट्राच्या समकालीन इतिहास लेखनासाठी पुढे येण्याची गरज आहे. २१ वे शतक सुरू होऊन त्याची दोन दशके आता संपलेली आहेत. २१ व्या शतकात २० व्या शतकातील सन १९५० ते पुढे या समकालीन इतिहासलेखनास काहीच हरकत नाही. स्वातंत्र्योत्तर भारतात एकाच कळात नागरी क्रांती, औद्योगिक क्रांती, हरितक्रांती, धवलक्रांती, लोकशाही सशक्तीकरण, राजकीय स्थरीकरण आणि अभिसरण, सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक बदल मोठ्या प्रमाणात झालेले आहेत. मात्र ह्या मूलभूत स्थित्यंतरांचा राष्ट्र, प्रदेश, जात, वर्ग, लिंग आणि आर्थिक दृष्टीकोणातून इतिहास व विश्लेषणात्मक दृष्टीकोणातून लिखाण करणे हे महत्त्वाचे आहे. स्वतंत्र भारतातील जातिव्यवस्थेवर साहित्यिक अथवा राजकीय उद्देशाने लिहीलेले शेकडो ग्रंथ पहावयास मिळतात, मात्र एकाही इतिहासकाराने स्वातंत्र्योत्तर काळातील भारतातील जातीव्यवस्थेचे विश्लेषण करणारा अथवा उत्क्रांती अभ्यासणारा इतिहास लिहीलेला नाही. कोणत्याही इतिहासकाराने समकालीन भारतातील निवडणूका अथवा बदलत्या निवडणूक प्रक्रीयेचा अथवा लोकशाही स्थित्यंतरांचा इतिहास लिहीलेला आढळत नाही, त्यासाठी समकालीन इतिहास लेखन गरजेचे आहे.

## ७) समकालीन इतिहास लेखनातील समस्या :

समकालीन इतिहासातील विषय अथवा प्रश्न निवडून संशोधन करणाऱ्या इतिहासकारांना इतर कालखंडातील विषयाचे संशोधन करणाऱ्यांपेक्षा वेगळ्या समस्यांना तोंड द्यावे लागते.

### १) संदर्भ साधने जमा करणे :

समकालीन इतिहास लेखन करण्यासाठी पहिली अडचण अथवा समस्या संदर्भ साधने जमा करण्याची आहे. समकालीन इतिहास लिहीताना एका ठिकाणी एखाद्या पुराभिलेखागारात एकत्रित जमवलेली अथवा विषयनिहाय वर्गीकरण केलेली लिखित साधने सहसा मिळत नाहीत. सरकारी कागदपत्रे संशोधकास देण्यास नोकरशहा टाळाटाळ करतात, त्यामुळे विविध ठिकाणी जावून मूळ अप्रकाशित साधनांचा शोध घ्यावा लागतो. समकालीन विषयाच्या संदर्भात कागदपत्राची कमतरता नाही, मात्र ती एका छताखाली अथवा पुस्तक, ग्रंथस्वरूपात उपलब्ध होत नाहीत. विशालकाय माहिती जमा करणे हे खरे आव्हान आहे.

### २) संदर्भ साधनांची विपुलता :

एका बाजूस समकालीन इतिहासाची साधने जमा करणे हे इतिहास संशोधकाला जसे आव्हान आहे तसेच आव्हान समकालीन घटनांच्या संदर्भात उपलब्ध असलेल्या संदर्भ साधनांच्या विपुलतेचे एकीकडे आव्हान आहे. समकालीन इतिहासकाराला प्रश्न हा साधनांच्या कमतरतेचा नसून साधनांच्या विपुल उपलब्धतेचा आहे. इतर कालखंडाचे इतिहासकार आपल्या संशोधनाच्या विषयाची सर्व उपलब्ध साधने वाचण्याचा प्रयत्न करतो, मात्र समकालीन इतिहासकाराला हे करणे शक्य नाही, विशेषत: आजच्या माहिती जालाच्या विस्फोटाने हे अशक्यप्राय झालेले आहे. त्यामुळे त्याला सर्व साधने वाचून संपवणे अशक्य आहे.

**३) अपारंपारिक साधनाचा वापर :**

समकालीन इतिहास संशोधकाला पारंपारिक साधनांच्याबरोबर अपारंपारिक संदर्भ साधनाचा मोठ्या प्रमाणावर आपल्या लेखनासाठी वापर करावा लागतो. विशेषत: मौखिक इतिहास, कारण समकालीन इतिहासल लेखकाला फक्त लिखित पुराव्यावर भिस्त ठेवून चालत नाही, त्यासाठी मौखिक हा पर्याय राहतो. ज्या घटनांच्या, व्यक्तीच्या, समूहाचा इतिहास लिखित स्वरूपात मागे राहिलेला नाही किंवा जे घटक समूह शांतच राहिले. त्यांच्या इतिहासाची पुर्नप्राप्ती करण्याचे मौखिक साधन हे उत्तम आहे मात्र मौखिक इतिहासाच्या मर्यादा व धोके लक्षात घेऊन त्याचा सावध उपयोग करणे गरजेचे ठरते. मौखिक इतिहासाचा वापर समकालीन इतिहासकाराने खुबीने आणि आंतरविद्याशाखीय दुवा वापरून करणे गरजेचे आहे.

**४) माहिती तंत्रज्ञांचा वापर :**

२१ वे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. जशी विज्ञानक्षेत्रात याने क्रांती केलेली आहे. तशीच पारंपारिक क्षेत्रातही, माहिती तंत्रज्ञान युगाचाउदय समकालीन इतिहास लेखकांना एक प्रकारे वरदान आणि आव्हानदेखील आहे. सन१९९० च्या दशकापासून कागदपत्रे पूर्णपणे इलेक्ट्रॉनिक पध्दतीने संग्रहित करण्यास सुरूवात झाली. त्यापूर्वी तयार केलेले दस्तऐवज इलेक्ट्रॉनिक स्वरूपात रूपांतरित करण्यास सुरूवात झाली. ती सहजपणे उपलब्ध होऊ शकतात, त्याची सहज चौकशी केली जाऊ शकते, अथवा संकेतस्थळावर सहजतेने उपलब्ध होतात. त्यामुळे समकालीन इतिहास लेखकाला माहिती तंत्रज्ञानाचा वापर आणि प्रचंड प्रमाणात उपलब्ध साधने हाताळणे समस्या प्रधान आहे.

**५) मुलाखतीच्या माध्यमातून साधने तयार करणे :**

समकालीन इतिहास लेखकांने साधने अभ्यासण्याबरोबरच मुलाखती घेऊन साधने तयारदेखील केली पाहिजेत. नूतन इतिहासाचे विषय उदाहरणार्थ सबाल्टर्न (वंचित) अथवा स्त्रीवादी इतिहासलेखनासाठी ऐतिहासिक साधने मिळवणे अथवा प्राप्तहोणे अवघड, आणि म्हणूनच इतिहासकार कोणतीही 'आवाज नसलेल्या' (Voiceless) तळागाळातील लोकांच्या किंवा सामान्य स्त्रियांचा इतिहास लिहू शकत नाही. अशा परिस्थितीत समकालीन इतिहासकारांनी ह्या लोकांच्या मौखिक इतिहासाच्या शास्त्रानुसार मुलाखती घेऊन त्या टंकलिखित करून त्यांचे एक साधन म्हणून वापर करणे व साधन तयार करणे क्रमप्राप्त होते, असे केल्यास भविष्यकाळातील इतिहासकारांना एक मौलिक ऐतिहासिक साधन मिळण्याची शक्यता निर्माण होते.

**६) टीकात्मक भूमिकेतला वाचक :**

समकालीन इतिहासलेखनामधील सर्वात महत्त्वाची अडचण म्हणजे त्यांनी लिहीलेल्या इतिहासाचा वाचक हा टीकात्मक भूमिकेतून वाचन करणारा असतो. इतिहासाचा विषय समकालीन असल्यामुळे वाचकाला त्याबद्दल काही ना काही माहिती असते. प्राचीन अथवा मध्ययुगीन कालखंडाबाबत असे घडत नाही कारण वाचक बहुधा त्याबाबत अनभिज्ञ असतो, त्यामुळे या कालखंडातील केलेले लेखन तो मान्य करतो. समकालीन इतिहासाच्या वाचकाला विषयाबद्दल काही राजकीय अथवा तात्विक पूर्वग्रह असण्याची

दाट शक्यता असते. समकालीन इतिहास वाचक स्वत:ची एक भूमिका घेऊन वाचत असतो. अशा परिस्थितीत वाचकाने इतिहासकाराच्या विश्लेषणाला अथवा मांडणीला नाकारण्याची किंवा आव्हान देण्याची शक्यता जास्त असते.

**७) पूर्वग्रह :**

समकालीन इतिहासलेखकाला स्वत:च्या पूर्वग्रहाला सामोरे जावे लागण्याची शक्यता जास्त असते. अलीकडील भूतकाळाच्या इतिहासकाराची आपल्या विषयाबद्दल प्रबळ व पूर्वक कल्पित मते असण्याची दाट शक्यता असते. कागदपत्रे व पुरावे तापसण्याआधीच त्याला आपले अभ्यासाचे निष्कर्ष माहीत असतात, असे असल्यामुळे ऐतिहासिक साधनांमध्ये तो आपल्या निष्कर्षाला दुजोरा देणारेच पुरावे शोधण्याची शक्यता जास्त असते. जे पुरावे त्याच्या निष्कर्षा विरोधात जातात त्यांच्याकडे तो जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतो. इतर कालखंडातील इतिहास लेखनाच्या तुलनेत समकालीन इतिहास लेखनात याची शक्यता जास्त असते. त्यामुळे समकालीन इतिहासलेखकाने कोणत्याही व्यक्तीचे, घटनेचे अथवा व्यक्ती समूहाचे वकीलपत्र घेऊन चालणारनाही. आपली भूमिका नि:पक्षपातीपणाची घ्यावी लागेल.

**८) वस्तूनिष्ठता (सत्य लिहिण्याची क्षमता) :**

समकालीन इतिहासलेखनामध्ये हयात असलेल्या व्यक्तीबद्दल किंवा कार्याबद्दल वस्तूनिष्ठपणे मांडणी करणे आणि सर्वकाही खरेखुरे सांगणे हे मोठे आव्हान आहे. एकतर संबंधीत व्यक्ती जीवंत असतात त्या यातील काही गोष्टींना आक्षेप घेवू शकतात अथवा एखाद्या व्यक्तीचा जनमानसात मोठा प्रभाव असतो, त्यामुळे त्या व्यक्तीचे वस्तूनिष्ठपणे चित्रण केले तर जनसमूहाच्या रोषाला सामोरे जावे लागते. या संदर्भात य. दि. फडके म्हणतात की, ''इतिहासकाराच्या दृष्टीने सर्व माणसे कालवश झालेली असतात! समकालीन इतिहास लिहिण्याने हयात असलेल्या व्यक्तींना तसेच दिवंगत व्यक्तींना सारखीच वागणूक देण्याची तयारी ठेवली पाहिजे. हयात असलेल्या तसेच दिवंगत झालेल्या व्यक्तीविषयी हातचे राखून न ठेवता समकालीन इतिहासकाराने मोकळेपणाने खरे बोलले पाहिजे. तशी त्याच्या मनाची तयारी नसेल तर समकालीन इतिहास लिहिण्याच्या न पडता त्याने इतिहासपूर्व काळातील विषय संशोधनासाठी व लेखनासाठी निवडावा.''

**९) समकालीन इतिहासाच्या संकल्पनेतील घोळ :**

आधुनिक इतिहास व समकालीन इतिहासाच्या संकल्पनेत स्पष्ट अशी संकल्पना नाही. काही इतिहासकार आधुनिक इतिहासात समकालीन इतिहास समाविष्ठ आहे असे म्हणतात. मात्र काही इतिहासकार समकालीन इतिहास आधुनिक इतिहासासारखा नाही असे म्हणतात. त्यामुळे समकालीन इतिहासाची व्याख्या अथवा संकल्पना हीच मूळात समस्या आहे. कारण पारंपारिक पुरणामतवादी (conservative) इतिहासकारांनी इतिहास लेखनावर मर्यादा घालून दिलेल्या आहेत. त्यांनी जीवंत स्मृतीला बाहेरचा रस्ता दाखवलेला आहे. अर्थात जिवंत स्मृतींना त्यांच्या इतिहासाच्या परिभाषेत स्थान नाही. यांच्यावर रान्केच्या विचारांचा प्रभाव आहे. तो म्हणतो की, सध्या अस्तित्वात असलेल्या कोणत्याही ऐतिहासिक पध्दतीच्या सहाय्याने समकालीन इतिहासाशी संपर्क साधू शकत नाही. या संदर्भात बाराक्लोव म्हणतात की, समकालीन

हा एक अतिशय लवचक शब्द आहे, ज्याचा भिन्न लोकांसाठी भिन्न अर्थ आहे. समकालीन इतिहास हा शब्द ते पिढीच्या इतिहासाचा आहे असे म्हणतात, ते म्हणतात. "The phrase contemporary history is the history of generation for simple reason that generations overlap."

**८) समकालीन इतिहासाचे फायदे :**

समकालीन इतिहास लेखनात अनेक अडचणी, आव्हाने व समस्या असल्या तरी एक मोठा फायदा असतो, इतर कालखंडाच्या इतिहासकारांना मिळत नाही. कारण ते त्या समकालीन घटनाचे प्रत्यक्ष साक्षीदार अथवा त्या कालखंडाच्या समकालीन असतात. त्यामुळे या कालखंडावर लिखाण केल्याचे अनेक फायदे आहेत, ते खालीलप्रमाणे :-

**१) वर्तमान मानसिकतेचे विश्लेषण :**

समकालीन इतिहास लेखकाला अलीकडील भूतकाळातील व वर्तमान लोकांच्या भावना समजून घेण्याची संधी असते. दूरवरच्या भूतकाळाचा इतिहास लिहिणार्या अभ्यासकाला ही संधी प्राप्त होत नाही. आपण ज्या काळावर, त्या काळातील घटना, विकास, स्थित्यंतरे, चळवळी व विविध सामाजिक-सांस्कृतिक घटकांच्यावर अभ्यास करत असतो, त्यामागील लोकांच्या भावनिकतेचा वेध घेण्याची क्षमता आणि संधी समकालीन इतिहासलेखकाला मिळते. एखाद्या घटनेमागील मानसिक समजून घेण्याची क्षमता वर्तमानकाळातील लोकांना येते आतिदूरच्या भूतकाळाच्या इतिहासासंबंधी ही संधी नसते. कारण इतिहास लेखक म्हणून पुराण्यांच्या आधारे जरी त्या काळाचा इतिहास लिहिलेला असला तरी तो त्या काळातील लोकांच्या भावना व मनोभूमिका समजावून होवू शकत नाही. समकालीन इतिहासलेखक आपण जगलेल्या काळाचा इतिहास लिहीत असल्यामुळे त्याला मात्र हे शक्य होते.

**२) विशिष्ठ विषयाच्या इतिहासलेखनाचे आद्यप्रवर्तक :**

समकालीन इतिहास लेखनकाराला विशिष्ठ विषयाच्या इतिहास लेखनाचे आद्यप्रवर्तक होण्याची संधी मिळते. संशोधकाला दिशा देण्यासाठी दुय्यम साधने उपलब्ध नसतात अथवा इतर संशोधकांनी तयार केलेल्या घटनांचा कालानुरूप नसतो अथवा सर्वमान्य असलेले घटनांचे विश्लेषण देखील उपलब्ध नसतात. हे सर्व पहिल्यांदाच समकालीन इतिहास लेखकाला तयार करावे लागते व त्यासाठी त्याला प्रचंड मेहनत करावी लागते, मात्र या मेहनतीचा मोबदला त्याला एखाद्या विषयाचा पहल्यांदा इतिहास लिहीण्याची संधी प्राप्त होते. यासंबंधी प्रसिध्द समकालीन इतिहासकार रामचंद्र गुहा म्हणतात, ''जेव्हा तुम्हाला स्वातंत्र्योत्तर बंगालच्या सामाजिक इतिहासाच्या कोणत्यातरी पैलूवर पहिला ग्रंथ लिहीता येत असेल तेव्हा वसाहतवादी बंगालच्या सामाजिक इतिहासाच्या कोणत्यातरी पैलूवर चारशेवा ग्रंथ का लिहावा जेव्हा तुम्हाला प्रसिध्द लेखिका महाश्वेतादेवी यांच्या जीवन व कार्यावर पहिला ग्रंथ लिहीता येत असेल तेव्हा बंकिमचंद्र चटर्जीच्या जीवनावर विसावे किंवा तिसावे पुस्तक का लिहावे.''

### ३) आंतरविद्याशाखेय दृष्टीकोण :

समकालीन इतिहास लेखकाला आंतर विद्याशाखेय दृष्टीकोणातून लिखाण करण्याची खूप संधी आहे. हे जरी खरे असले तरी ज्या विषयावर आपणास संशोधन करावयाचे आहे त्या विषयाशी संबंधित आंतर विद्याशाखेय अंतरसंबंध निर्माण करणे अथवा तशा प्रकारचे प्रारूप तयार करण्यासाठी संशोधकाला आंतरविद्याशाखेय अनुबंध निर्माण करता येतात. उदा. एखाद्या व्यक्तीला राज्यशास्त्रामध्ये आवड असेल तर त्यांने राज्यशास्त्रातील आपल्या संशोधनाबद्दल जागरूक असले पाहिजे. सामाजिक इतिहासासंबंधी सामजशास्त्रातील व मानववंशशास्त्रातील अलीकडील संशोधन अथवा इतर समाजशास्त्रीय संशोधन व समाजशास्त्रज्ञ इ. समकालीन इतिहास लेखकांसाठी आंतरविद्याशाखेय संकल्पना, सिध्दांत अथवा पारूप वापरण्यासाठी संधी व मोठा वाव आहे, कारण या विद्याशाखामधील अलीकडील भूतकाळातील घटनावर, विकासावर जे संशोधन झालेले असते. त्याच्या संशोधनातून समकालीन इतिहास अथवा अलिकडील भूतकाळ त्या-त्या परीप्रेक्षातून व दृष्टीकोणातून समजावून घेवू शकतो व एक नवीन आंतरविद्याशाखीय प्रारूप तयार करू शकतो.

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. २**

अ) योग्य पर्याय निवडा.

१) भारतामध्ये सबार्टन दृष्टीकोनातून कोणी लिखाण केले आहे.

अ) रणजित गुहा ब) इरफान हबीब क) ताराचंद ड) यापैकी नाही

२) 'दडपशाहीची दफ्तरे' ही संकल्पना कोणी मांडली.

अ) कार्लो गिंझबर्ग ब) जेकब बर्कहार्ड क) जर्गन हबरमास ड) रणजीत गुहा

३) सूक्ष्म इतिहासलेखन प्रवाह कोणत्या देशात उदयास आला.

अ) इटली ब) फ्रान्स क) इंग्लंड ड) अमेरिका

४) 'हिस्ट्री' हा शब्द कोणत्या भाषेतून आलेला आहे.

अ) ग्रीक ब) इटालियन क) पोर्तुगीज ड) यापैकी नाही

५) 'अंतरिक काळ' म्हणजे किती वर्षे.

अ) ३० ब) ४० क) ५०) ड) ६०

ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) क्लिफर्ड गिर्ट्झ यांनी कोणता ग्रंथ लिहिला आहे.

२) 'सांस्कृतिक धुरीणत्वाच्या' संकल्पनेचा ऊहापोह कोणी केलेला आहे.

३) 'द ग्रेट कॅट मॅसॅकर' हा ग्रंथ कोणी लिहिला आहे.

४) सर्वात शेवटच्या किंवा सर्वात अलीकडील उलथापालथीच्या घटनेपासून सुरू होणारा काळ ही व्याख्या कोणाची आहे.

५) 'ॲन इंट्रॉडक्शन टू कंटेम्परारी हिस्ट्री' हा ग्रंथ कोणी प्रसिध्द केला आहे.

## **२.२.३ स्थानिक इतिहास, मौखिक इतिहास :** (Local History, Oral History)

### **अ) स्थानिक इतिहास**

इतिहास म्हणजे गाडलेले मुडदे उकरून काढणे, इतिहास म्हणजे राजा आणि राणी, इतिहास म्हणजे युद्ध, इतिहास म्हणजे गतकालीन राजकारण, इतिहास म्हणजे नेत्यांची चरित्र असा एक समज सर्व सामान्याच्या मध्ये आहे. इतिहासकार 'नो डॉक्युमेंट नो हिस्टरी' या विधांनावरती श्रद्धा ठेवत असल्याने ते या परीघाच्या बाहेर पाहावयास तयार नव्हते आणि नाहीत. इतिहासाचे पारंपरिक स्वरूप मर्यादित आहे. २० व्या शतकाच्या पूर्वार्धामध्ये जे-जे घडले ते-ते लिहणे अथवा पुराभिलेखागारातील कागदपत्रांच्या सहाय्याने कागदपत्रात ज्या घटनांचे प्रतिबिंब उमटले आहे त्याची मांडणी करण्याची संकल्पना रूढ होती. पुराभिलेखागारातील कागदपत्रांच्यामध्ये प्रतिबिंबीत झालेला राजे-राजवाडे, युद्ध, घटना व अभिजनवादी घटकांचा इतिहास लिहिण्याचा हा प्रकार जोमत सुरू होता. पुराभिलेखागारातील कागदपत्रांच्यामध्ये जतन करून ठेवलेला इतिहास नेमका कोणाचा इतिहास सांगतात हा प्रश्न त्याकाळातील इतिहासकारांना पडला नाही. मात्र इतिहास लेखनाचा हा पारंपरिक दृष्टीकोण आता मागे पडत आहे. इतिहास म्हणजे राजा आणि राणी असे समीकरण न राहता इतिहास म्हणजे मानवी समाजाची सर्वांगीण कहाणी या अर्थाने 'मनुष्य' हा इतिहासलेखनाच्या केंद्रस्थानी आलेला आहे. मानवी जीवनाशी संबंधित सर्वच अंगोपांगांचा ऊहापोह आता इतिहासात आणि इतिहासलेखनात होणे अपेक्षित आहे. इतिहासातील नव-नवीन दृष्टीकोन व प्रवाहाच्यामुळे इतिहासलेखन समृद्ध बनत आहे. इतिहासातील या विविध दृष्टीकोनाच्याबरोबर इतिहासाची आंतरविद्याशाकीय (Interdisciplinary) मांडणी होवू पाहत आहे. ॲनाल्स परंपरा इतिहासलेखनात रूढ झाल्यानंतर आंतरविद्याशाकीय मांडणी अधिक बळकट झाली. इतिहासात केवळ समग्रलक्ष्यी (Macro History) इतिहासाला महत्व नसून अंशलक्ष्यी (Micro History) इतिहासही तितकाच महत्वाचा बनला आहे. यातून 'स्थानिक इतिहासलेखन' परंपरा अथवा पद्धती विकसित झाली. स्थानिक इतिहास लेखन हे ॲनाल्स परंपरेचे फलित आहे. सद्य स्थितीत जगभरात स्थानिक इतिहासलेखन परंपरेला चालना मिळालेली आहे.

### **स्थानिक इतिहासलेखनाची संकल्पना :**

इतिहासलेखनाचे अनेक प्रवाह उदयास आलेले दिसतात. यामध्ये अलिकडील काळात विशेष प्रसिध्दीत आलेला इतिहास लेखन प्रवाह म्हणजे 'स्थानिक इतिहास' अथवा 'स्थानीय इतिहास' हा होय. स्थान म्हणजे ठिकाण किंवा स्थानिक म्हणजे मूळचा म्हणजे स्थानांचा अथवा ठिकाणांचा इतिहास. डॉ. अरुण टिकेकर यांनी 'स्थानिक इतिहास' (Local History) ऐवजी 'स्थानीय इतिहास' (Localised

History) असा मराठी शब्दप्रयोग केलेला आहे. वास्तविक पाहता स्थानिक इतिहासाची संकल्पना युरोपमध्ये उदयास आली. युरोपात उदयाला आलेल्या या शाखेने इतिहासात मोलाची भर घातली आहे. इतिहासाची भौगोलिक निकषांवर केली गेलेली विभागणी किंवा भूगोलाधारित इतिहास म्हणजे स्थानिक इतिहासलेखन. स्थानाची भौगोलिक मर्यादा लहान आहे. स्थानिक इतिहासात गावाचा इतिहास समाविष्टकेला जातो. भारतातील प्रत्येक गावाला स्वत:चा असा एक इतिहास, स्वत:ची अशी एक संस्कृती आहे. भारतामध्ये ही संकल्पना नवीन असली तरी या संकल्पनेतून या अगोदरच अनेक शहरांचा इतिहास लिहीलेला आहे. प्राचीन काळी आपल्याकडे जी स्थलमहात्म्य होती त्याचाच हा आधुनिक व शास्त्रीय अवतार आहे. स्थानिक इतिहास लेखनात 'गाव' ही भौगोलिक संकल्पना महत्त्वाची आहे. एखाद्या गावात राहणार्या व्यक्तीला स्थानिक अथवा गावकरी म्हणतात. त्या स्थानिकांची स्वाभाविकपणे आपल्या गावाशी एक विशिष्ठ नाळ आणि भावना जोडलेल्या असतात. स्थानिक इतिहासकार इतिहास लिहिताना त्या भावना ऐतिहासिक घटना आणि त्या घटनांशी संबंधित असलेल्या व्यक्ती यांच्या माध्यमातून शब्दबध्द करतो. ऐतिहासिक, भौगोलिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय आणि प्रशासकीय असे बहुविध पैलू स्थानिक इतिहात लक्षात घेतले जातात. या प्रत्येक घटकाचा स्वतंत्रपणे विचार केला गेला असला तरीही हे सारे घटक आतून एकमेकांशी जोडलेले असतात. यासंबंधी डॉ. अरूण टिकेकर म्हणतात की, ''हा एका अर्थान भूतकाळात रमू पाहणार्याचा छंद. आपल्या गावाचा वा शहराच्या तसंच त्या शहरातील आपल्या ऋणानुबंधाबद्दल आपुलकी, प्रसंगी अभिमान वाटणं ही सहजभावना होय. आपल्या गावाबद्दलच्या काही स्मृती आनंददायक, तर काही क्लेशदायक असू शकतात. पण घटना घडून बरीच वर्षे उलटल्यामुळे आनंददायक व क्लेशदायक अशा दोन्ही स्मृतीबद्दल कातरता येत असते. ही स्मृतिकातरता प्रभावी शैलीत पडकण्यावर स्थानीय इतिहासकाराचे यश अवलंबून असते'' एका अर्थाने स्थानिक इतिहास हा प्रादेशिक इतिहासाचा एक उपविभाग आहे. स्थानिक इतिहासाच्या संदर्भातील केवळ घटनांची जंत्री नसून ती एक चिकित्सक, अन्वयार्थी, सैद्धान्तिक आणि आंतरविद्याशाखीय संशोधनाला चालना देणारी स्वतंत्र शाखा आहे. डॉ. अरुण टिकेकर लिहितात, 'हा ग्रंथ साकार करण्यासाठी इतिहास शाखांतील तुलनेनं सर्वांत नव्या म्हणता येईल, अशा 'स्थानीय इतिहास' या संकल्पनेचा वापर केला आहे. ही संकल्पना नवीन असली, तरी जुन्या काळातील अनेक लेखकांनी शहरांविषयी म्हणजे सांस्कृतिक केंद्राविषयी लिहिताना अनुभवली आहे. आपल्या गावाविषयी आणि गावकऱ्यांविषयी प्रेम वाटणं, जिव्हाळा वाटणं ही स्वाभाविक भावना असल्यामुळे तो प्रत्येकाचा स्वभावधर्म असतो. 'स्थानीय इतिहासकार' त्या भावना ऐतिहासिक घटना आणि त्या घटनांशी जोडलेल्या व्यक्ती यांच्याआधारे शब्दबद्ध करतो. कधी स्वत:च्याच स्मरणातून, तर कधी इतरांना बोलकं करून त्यांच्याकडून वदवून घेतलेल्या 'मौखिक' इतिहासाच्या रूपात. 'स्थानीय इतिहास' ही देखील ग्रामचीच्याच औधत्यपूर्ण आव्हानातून उमललेली आणि इतिहास लेखनाच्या पुनर्विचारातून प्रकटलेली संकल्पना असल्याचं मानता येतं. सांस्कृतिक केंद्र असलेल्या नगराचे भौगोलिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक, वैचारिक असे आलेख काढले गेले आणि अशा अनेक सांस्कृतिक केंद्रांच्या व्यापक व सर्वांगीण इतिहासाच्या साह्यानं सर्व देशाचा इतिहास लिहिला गेला, तर तो निश्चितच समृद्ध व सर्व समाजघटकांना न्याय देणारा असणार, ही कल्पना पुढे आली आणि त्यातूनच स्थानीय

इतिहासाची संकल्पना दृढ झाली. एखाद्या शहराचा स्थानीय इतिहास म्हणजे त्या शहराचा व्यापक अर्थाने लिहिलेला सामाजिक व सांस्कृतिक इतिहास. इतिहासरूपी अस्थींच्या सांगाड्याला ऐतिहासिक उदाहरणांच्या साह्यानं रक्त-मांस चढवून तो सजीव करण्याचा प्रयत्न स्थानीय इतिहास लेखनात असतो. सर्वांगीण इतिहास म्हणजे बहुशाखीय इतिहास हे स्थानीय इतिहासाचं लक्ष्य असल्यामुळे पारंपरिक ऐतिहासिक साधनांबरोबर चित्रं-छायाचित्रं; अशा अपारंपरिक साधनांचा उपयोगही स्थानीय इतिहासात केला जातो. म्हणून स्थानीय इतिहास लेखक, पुरातत्त्व संशोधक, भूगोलतज्ज्ञ, भूगर्भतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, कलेइतिहासतज्ज्ञ, वाङ्मयेतिहासतज्ज्ञ अशा वेगवेगळ्या भूमिका करत असतो. स्थानीय इतिहासकाराला कोणताही विषय वर्ज्य नाही. अगदी पेहेरावातील फॅशन्सपासून आहारातील रूचीवैचित्र्यापर्यंत सर्व विषयांचा यथायोग्य वापर स्थानीय इतिहासासाठी होऊ शकतो.' थोडक्यात एखाद्या स्थानाभोवती किंवा ठिकाणाभोवती केंद्रीत राहून त्या स्थानाचे इतिहास लेखनकरणे म्हणजे स्थानिक इतिहास होय.

**स्थानिक इतिहास लेखनाची सुरुवात :**

१६ व्या शतकात इंग्लंडमध्ये स्थानिक इतिहास लेखन संकल्पनेचा उदय झाला. लंडन शहराचा सूक्ष्म पध्दतीने सर्वेक्षणकरून त्यावर आधारीत सन १८९४ मध्ये ४४ खंड प्रकाशित झाले. स्थानिक इतिहास लेखनाच्या माध्यमातून एवढे मोठे लिखाण होणार हे पहीले शहर. रॉबर्ट डॉय यांनी स्थानिक इतिहासाविषयी केलेले लेखन महत्त्वाचे आहे. यातून पुढे लंडन विद्यापीठात "Institute of Historical Research' स्थापन झाले. त्यामुळेच लंडन शहराला स्थानिक इतिहासाची जननी असे म्हणतात. याच काळात फ्रान्समध्ये स्थानिक किल्ले, नाणी, चर्च, शस्त्रास्त्रे, संग्रहालये, घराणी इत्यादीचा इतिहास लिहिण्यास प्रारंभ झाला. १९ व्या शतकामध्ये स्थानिक इतिहास लेखनाचा हा प्रवाह अमेरिका खंडामध्ये पोहचला. अमेरिकेतील व्यापारी, उद्योगपती, प्रसिध्द व्यक्ती, चर्चचा कारभार पाहणारे अधिकारी व मिशनरी यांनी १८४० च्या दशकात आपपाल्या क्षेत्रातील उदयोग व्यवसायाचा इतिहास लिहीण्यास सुरूवात केली. इंग्लंडमधून अमेरिकेमध्ये स्थायिक झालेल्या लोकांनी स्थानिक पातळीवरील उद्योग, अमेरिकन स्वातंत्र्ययुध्दात भाग घेतलेले स्थानिक नेते, स्थानिक भौगोलिक घटकांचा अभ्यास करून त्याविषयांच्या स्थानिक इतिहासाची मांडणी केली.

स्थानिक इतिहास लेखनाचा भारताच्या विशेषत: महाराष्ट्राच्या दृष्टीकाणातून विचार केल्या सन १८३६ मध्ये प्रसिध्द झालेले गोविद माडगावकरांचे 'मुंबईचे वर्णन', सन १९६८ मध्ये प्रसिध्द झालेले ना. वि. जोशी यांचे 'पुणे शहराचे वर्णन', आर.व्ही. सबनीस यांचे 'नोट्स ऑन कोल्हापूर' या ग्रंथाद्वारे १९ व्या शतकामध्ये स्थानिक इतिहासाचा पाया घातला. विसाव्या शतकात स्थानिक इतिहासाची ही परंपरा अधिक वृध्दींगत झाली. डी. बी. पारसणीस यांनी स्थानिक इतिहासलेखनाशी संबंधित महत्त्वाचे ग्रंथ त्यांनी लिहिले. यामध्ये दिल्ली अथवा इंद्रप्रस्थ, नोट्स ऑन सातारा महाबळेश्वर, सांगली स्टेट, पन्हाळा; पूना इन बायगॉन डेज हे ग्रंथ महत्त्वाचे आहेत. ना. गो. चापेकरांचे 'बदलापूर', (१९३३) पु. पा. गोखले यांचे 'जागृत सातारा', (१९३५) दे. गो. लांडगे यांचे 'नागपूरचा सांस्कृतिक इतिहास', (१९५४) राजूरकरांचा 'चंद्रपूरचा इतिहास', (१९५६) अरूण टिकेकर व अभय टिळक यांनी संपादीत केलेले 'शहर पुणे: एका सास्कृतिक संचिताचा मागोवा' (२०००) डॉ. अवनिश सोवणी यांचे 'हरवलेले पुणे' यासारख्या अनेक ग्रंथाचा उल्लेख होतो.

महाराष्ट्रामध्ये स्थानिक इतिहास लेखनाची अनेक उदाहरणे देता येतील मात्र अखिल भारतीय स्तरावर स्थानिक इतिहास लेखनाची संकल्पना व सैध्दांतिक मांडणी रोमिला थापर यांनी सन १९७६ मधील पंजाब इतिहास परिषदेच्या अध्यक्ष पदावरून केलेल्या प्रादेशिक व स्थानिक इतिहास या विषयावर केलेल्या मांडणीपासून झाली असे मानले जाते. तेव्हापासून भारतात यानवीन विचार प्रवाहाचा खर्या अर्थाने अभ्यास सुरू झाला.

**प्रादेशिक इतिहासातून स्थानिक इतिहासाकडे :**

इतिहासाची व्याप्ती स्थल व काल सापेक्ष आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी याची प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक अशी काळाच्या आधारावर विभागणी केली जाते किंवा स्थलाच्या निकषावर केली जाणारी विभागणी जशी की जागतिक, राष्ट्रीय, प्रादेशिक आणि स्थानिक इतिहास. इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी वि. का. राजवाडे यांनी देशिक प्रकार नमूद केलेला आहे. यामध्ये त्यांना विशिष्ट भूप्रदेशाचा म्हणजेच प्रादेशिक इतिहास अभिप्रेत होता, तर प्रादेशिक इतिहासाचा पोटविभाग म्हणून स्थानिक इतिहासाची ओळख आहे. प्रादेशिक इतिहासाच्या मांडनीतून राष्ट्रीय इतिहास आकारास येतो. मात्र राष्ट्राच परिपूर्ण व सुसंगत इतिहास साकारण्यासाठी प्रादेशिक व स्थानिक इतिहास महत्व पूर्ण ठरतो. यासंदर्भात डॉ. राजा दिक्षित यांनी प्रादेक्षिक इतिहासाची मांडणी करताना स्थानिक इतिहासाला केंद्रस्थानी ठेवलेले आहे हे म्हणतात की, ''इतिहास हा वैश्विकता आणि विशिष्ठता या दोहोचा वेध असतो, त्यातील अनेकदा दुर्लक्षित राहणारा विशिष्टतेचा पैलू प्रादेशिक इतिहासामुळे प्रकाशात येतो. प्रादेशिक इतिहासाचा पोटविभाग म्हणजे स्थानिक इतिहास होय.'' दिक्षित पुढे असे म्हणतात की, प्रादेशिक इतिहासात भौगोलिकतेला महत्व असले, तरी मानसिकता व संस्कृती अधिक महत्वाची असते. मात्र प्रादेशिक इतिहास हा संकुचित प्रादेशिकतावादी असता कामा नये हे पथ्य पाळणे महत्वाचे आहे असे ते आवर्जून नमूद करतात.

२० व्या शतकात प्रादेशिक इतिहास ही संकल्पना उदयास येवून इतिहास संशोधनाचा एक महत्त्वाचा भाग बनली. प्रादेशिक इतिहासाचे सूक्ष्म अध्ययन करण्यासाठी त्याची लहान-लहान भागात विभागणी केली गेली. ज्यातून स्थानिक इतिहास या संकल्पनेचा उदय झाला. आज संशोधकाचे आवडीचे क्षेत्र म्हणून स्थानिक इतिहासाकडे पाहीले जाते. इतिहासाच्या जडणघडणीमध्ये समाजातील प्रत्येक घटकाचा वाटा असतो. प्रत्येक स्तरातील व्यक्ती, घटना यांच्या माध्यमातून स्थलकालसापेक्ष इतिहास घडत असतो. स्थानिक व प्रादेशिक इतिहासातून राष्ट्रीय इतिहास आकार घेतो. प्रादेशिक इतिहासाच्या मांडणीमध्ये भूतकाळ हा राष्ट्रीय नव्हे तर, स्थानिक परिवेशामध्ये सामावलेला असतो. स्थानिक व प्रादेशिक इतिहासाच्या साहाय्याने राष्ट्राचा सर्वांगीण इतिहास लिहीला जाऊ शकतो. प्रादेशिक व स्थानिक इतिहास हा राष्ट्रीय इतिहासाचा अविभाज्य भाग आहे.

**स्थानिक इतिहास लेखनाचा उद्देश :**

इतिहास संधोधक अथवा अभ्यासकाला जागतिक, राष्ट्रीय किंवा राज्यस्तरावरील घटना माहीत असतात. मात्र एखाद्या गातातील घटना अथवा वास्तूची माहिती नसते. आपण त्या गावात लहानाचे मोठे

झालो त्या गावाबद्दलची देखील माहिती नसते. वास्तविक पाहता व्यक्ती, व्यक्ती समूह, सामाजिक वैशिष्ट्ये हे इतिहासाचे अनुबंध स्थानिक इतिहासाशी जवळीक ठेवणारे असतात. स्थानिकता हे पारंपारिक भारतीय समाज व्यवस्थेचे वैशिष्ट्ये आहे. प्रत्येक गावावर प्राचीन ते आधुनिक काळापर्यंत अनेक राजसत्तानी राज्य केलेले आहे, त्या राजसत्तेच्या स्थित्यंतराच्या अनेक खानाखुना अनेक गावागावात विखुरलेल्या आहेत. बर्याच प्रसंगी एखादे गाव विशिष्ट राजसत्तेमुळे प्रकाशात आलेले नसते तर ते गाव त्यांच्या सांस्कृतिक, सामाजिक व वैशिष्ट्यामुळे प्रसिध्दीस आलेले असते त्यामुळे अशा प्रकारच्या स्थानिक ठिकाणांचा अथवा घटनांचा अभ्यास करणे हा स्थानिक इतिहास लेखनाचा उद्देश आहे.

**स्थानिक इतिहास लेखनाचे महत्त्व :**

स्थानिक इतिहास लेखनाचे अवलोकन केले असता त्याचे विविध दृष्टीकाणातून महत्त्व लक्षात येते. व्यक्ती आणि स्थळ हे इतिहास अभ्यासाचे मुख्यविषय आहेत. मानवी जीवनाचे अभ्यासाच्या आणि आकलनाच्या सोयीसाठी विभाजन केले असले तरी हे मानवी जीवन समग्र व व्यामिश्र आहे. समाजाचा इतिहास सामाजिक जीवनाची विविध अंगे असल्यामुळे सामाजिक दृष्टीकोणातून लिहीलेला असतो. यामध्ये मुख्य वर्ण विषय समाजाची जडणघडण, समाजाची जीवनप्रणाली, त्यांच्या चालीरीती, रूढी, परंपरा, संस्कृती, धार्मिक  निष्ठा, समाजातील भिन्न घटकांचे परस्परसंबंध, कुटुंबसंस्था, त्यांचे स्वरूप उदर निर्वाहाची साधने, उद्योग, करमणुकीची साधने, कलाभिव्यक्तीचे प्रकार, सामाजिक संस्था, सामाजिक स्थित्यंतरे इत्यादी अनेक विषयांचा अभ्यास यामध्ये समाविष्ठ असतो.

स्थानिक इतिहास हा भौगोलिकदृष्ट्या स्थानिक संदर्भाच्या विशेषत: स्थानिक समुदायावर लक्ष केंद्रीत करतो. यामध्ये प्रामुख्याने सांस्कृतिक व सामाजिक पैलूंचा अंतर्भाव असतो. 'स्थल' इतिहासातील दूसरे महत्त्वाचे परिमाण आहे. कारण स्थानिक संदर्भ व्यक्ती जीवनाप्रमाणेच समाज जीवन देखील प्रभावित करतो. स्थानिक इतिहासातून आर्थिक इतिहासाचे अध्ययन होत असते; त्यामध्ये शेती व शेतीशी संबंधीत उद्योगधंदे, व्यापार, दळणवळण, व्यापारी संस्था, ग्रामीण बँका इत्यादीचे महत्त्व अधोरेखित केले जाते. याशिवाय दोन भूभागांचा सामाजिक, आर्थिक दृष्टीकोणातून तुलनात्मक अभ्यास केला जातो. दुर्लक्षित व वंचिताचा अभ्यास स्थानिक पातळीवर संशोधनासाठी उपलब्ध झाला आहे. थोडक्यात, आपण स्थानिक इतिहास लेखनाच्या माध्यमातून आपण;

१) एखाद्या गावाची, घटनेची, स्थानाची सूक्ष्मपणे व विस्तृत मांडणी करू शकतो.

२) स्थानिक इतिहासलेखनाच्या माध्यमातून संस्कृती संवधनाचा प्रयत्न करू शकतो.

३) समाज जीवनाची नैतिक आचारसंहिता मांडू शकतो.

४) स्थानिक इतिहासाच्या माध्यमातून लोकसंस्कृतीचा अभ्यास करू शकतो.

५) दुर्लक्षित घटक, प्रथा, रूढी, परंपरा, आचार, विचार, आहार, अलंकार, पोशाख, खाद्य, कथा, पुराणकथा, दंतकथा, म्हणी, वाक्य प्रचार  याचा नव्याने विचार करू शकतो.

**स्थानिक इतिहास लेखन पद्धती :**

स्थानिक इतिहास लेखन ही नवीन संकल्पना आज झपाट्याने विकसित होत आहे. 'नो डॉक्युमेंट नो हिस्टरी' हा प्रवाह महत्त्वाचा असला तरी याच्या व्यतिरीक्तही इतिहासलेखन केले जावू शकते हे आज सहप्रमाण सिध्द होत आहे. यासाठी अनेक नवनवीन आधुनिक पध्दती वापरल्या जात आहेत जसे की, ऐतिहासिक संशोधन पध्दती (पारंपारिक), क्षेत्र भेट, सर्वेक्षण, मुलाखत, प्रश्नावली, मौखिक व पुरातत्वीय या पध्दती अथवा माध्यमांचा आधार घेवून स्थानिक इतिहास लेखन केले जावू शकते. वरील प्रारूपाच्या अनुषंगाने स्थानिक इतिहासाचे लेखन केले जात आहे व कले जावू शकते. याशिवाय यामध्ये इतर अनेक अति विशिष्ठ घटक समाविष्ठ होऊ शकतात.

**स्थानिक इतिहास लेखनातील महत्त्वाचे पैलू/घटक**

स्थानिक इतिहासलेखन करताना खालील पैलूचा अथवा घटकांचा स्वतंत्रपणे अभ्यास केला जाऊ शकतो ते प्रमुख पैलू पुढीलप्रमाणे :-

| भौगोलिक पार्श्वभूमी | ऐतिहासिक पार्श्वभूमी | सामाजिक जीवन | सांस्कृतिक जीवन | आर्थिक जीवन |
|---|---|---|---|---|
| जमीन, जमिनीचे प्रकार | प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक | लोकसंख्या, स्त्री-पुरुष प्रमाण | सांस्कृतिक संस्था | शेती, शेतीचे प्रकार, औजारे |
| भौगोलिक सीमा | ऐतिहासिक स्थळे | धर्म/ पंथ | जत्रा, यात्रा, उरूस | पीके, पीक पद्धती |
| नद्या, नाले ओढे, तलाव, विहिरी (पाण्याचे स्त्रोत) | ऐतिहासिक स्मारके | कुटुंब संस्था, सामाजिक स्थित्यंतरे | मनोरंजन, संगीत, गायन, वादन, लोकगीते, गाणी, ओव्या | जलसिंचन, जलसिंचनाचे प्रकार |
| पर्जन्य | घटना विशेष | प्रथा, परंपरा, रूढी, विवाह पद्धती | खेळ, क्रीडा प्रकार (लहान मुलांचे, स्त्रीयांचे व पुरषांचे) | व्यापार, व्यापरी जमाती, व्यापारी माल |
| हवामान | व्यक्ति विशेष | जाती पोटजाती | म्हणी, वाक्य प्रकार | पतपेढी (बँका) |
| जंगल संपदा, पशु पक्षी, वृक्ष संपदा | ऐतिहासिक दंथ कथा | आचार, विचार , निष्ठा, आहार, पोशाख, आभूषणे | भाषा, भाषा प्रकार, बोली, खाद्य संस्कृति | दळणवळण, दळणवळनाची साधने |

**ऐतिहासिक घटक :**

स्थानिक इतिहास लेखनामध्ये सर्वात महत्त्वाचा पैलू अथवा घटक म्हणून ऐतिहासिक पार्श्वभूमीला महत्त्व आहे. कोणत्याही गावाचे ऐतिहासिक महत्त्व, गावाची प्राचीनता, गावाच्या नावाची व्युत्पत्ती गांवाशी संबंधित पुराणकथा, दंतकथा, लोकसमजूती इत्यादी महत्त्वाच्या असतात. बर्याचवेळी गावाच्या नावातच त्या गावाचा इतिहास दडलेला असतो. उदा. कोल्हापूर या नावाचा व्युत्पत्ती शोधण्याचा प्रयत्न केला तर आपणास त्या नावातच त्याच्याशी संबंधी पुराणकथा पहावयास मिळतात. प्रत्येक गावाला प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक असा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे, या इतिहास काळात त्या-त्या गावांचा विकास व जडण-घडण झालेली आहे. मात्र पुरेशा प्रमाणात लिखित पुरावे नसल्या कारणाने शेकडो, हजारो गावांचा इतिहास शब्दबध्द झालेला नाही. त्यामुळे स्थानिक इतिहास लेखनामध्ये त्या-त्या गावांची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासली जाणे महत्त्वाचे आहे, यामध्ये नव संशोधकांना अधिक वाव आहे.

**भौगोलिक घटक :**

जगातील प्रत्येक देशाला, त्या देशातील राज्यांना, प्रांताना, जिल्ह्यांना, तालुक्यांना काही विशेष प्रसंगी गावांनाही विविध भौगोलिक परिसस्थिती लाभलेली असते. काळानुरूप त्यात बदलही होत जातो, त्या विशिष्ट भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास स्थानिक इतिहास लेखनात केला जावू शकतो. उदा. एखाद्या गावातील जमीनीचे प्रकार, पर्जन्यमान, जंगलसंपदा, पशु-पक्षी, त्या गावाच्या भौगोलिक सीमा, पाण्याचे स्रोत इत्यादीचा अभ्यास केला जावू शकतो. इतिहास आणि ऐतिहासिक घटनावर भौगोलिक घटक परिणाम करत आधारीत व्यवसाय आणि ज्या असतो, त्यामुळे या भौगोलिक घटकाचा त्या-त्या गावावर काय परीणाम होतो किंवा झालेला आहे याचाही आपण अभ्यास करू शकतो. उदा. नदी, तलाव, ओढे, असलेली गावे, तेथील शेती व शेतीवर गावात नदी, तला, ओढे नाहीत तेथील शेती, शेतीवर आधारीत व्यवसाय असा तुलनात्मक अभ्यास. कोणात्याही ऐतिहासक घटनेचा अभ्यास करण्याआधी ती घटना ज्या ठिकाणी घडली तेथील भौगोलिक घटक अभ्यासणे आवश्यक असते अन्यथा त्या घटनेचा व्यवस्थित अर्थबोध होत नाही. उदा. शिवाजी महाराज पन्हाळा किल्ल्यावरून कसे निसटले हे त्यांच्या रणचातुर्य जेवढे महत्त्वाचे आहे तेवढेच तेथील भौगोलिक परीस्थितीही महत्त्वाची आहे. विशिष्ठ भौगोलिक परिस्थितीचा तेथील पशुपक्षी, शेती, व्यक्ती व व्यक्तीसमूहावर परीणाम होत असतो. त्याचा अभ्यास महत्त्वाचा आहे.

**सामाजिक घटक :**

प्रत्येक गावाचा एक विशिष्ठ सामाजिक संरचना असते. स्थानिक इतिहास लेखनामध्ये त्या-त्या गावातील सामाजिक जीवन व त्यामध्ये झालेले स्थित्यंतर समावीष्ठ करू शकतो. गावातील लोकसंख्या, लोकसंख्येत झालेला बदल, कुटुंब संस्था, कुटुंब संख्येत झालेला बदल, विविध जाती, पोट जाती, पंथ, रूढी-परंपरा, आचार-विचार, प्रथा, सामाजिक संस्था, आभूषणे, आहार अशा अनेक अंगाने स्थानिक इतिहासात लेखन केले जाऊ शकते. उदा. काही गावात व जातीत लग्न, प्रथा, विशिष्ठ केल्या जातात. गावामध्ये विविध जमातीचे लोक राहतात. त्यांची आडनावे प्रामुख्याने गोत्र, गाव, व्यवसाय व हुद्दा या

घटकांवरून मिळालेली असतात. गावाचा इतिहास लिहीताना स्त्रियांची स्थिती, स्थान, दर्जा, स्त्री-पुरुष समानता व प्रमाण, मुलींचे शिक्षण, हुंडाप्रथा, विवाह पध्दती इत्यादी संबंधी माहीती नव्याने मांडू शकतो.

**सांस्कृतिक घटक :**

एखाद्या गावातील सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करताना तेथील धार्मिक परंपरा, सण, उत्सव, जत्रा, यात्रा, महोत्सव त्यातील प्रथा, परंपरा, संकेत पूजाविधी, दंतकथा, पुराणकथा इत्यादीचा अभ्यास करणे गरजेचे असते. कारण प्रत्येक गावात विविध देवी-देवतांची मंदीरे, दर्गे मशिदी आहेत आणि त्या-त्या गावात विशिष्ठ पध्दतीने त्यांच्या जत्रा-यात्रा साजर्या केल्या जातात, त्याची नोंद स्थानिक इतिहासात होणे गरजेचे आहे. याशिवाय काही गावात अतिविशिष्ठ खेळ, क्रीडा प्रकार, मनोरंजनांची माध्यमे व कला प्रकार आहेत, त्याचाही या ठिकाणी सखोल अभ्यास केला जावू शकतो. उदा. शिराळा येथील नागपंचमी, कवठेएकंद येथील शोभेची दारू उडवण्याची प्रथा, काही गावात दीपावली, बैल पोळा, पाडवा विविध पध्दतीने साजरा केला जातो. सांस्कृतिक जीवनाच्या माध्यमातून त्या गावातील सामाजिक-धार्मिक आर्थिक अनुबंध समजावून घेवू शकतो. साहित्तीक-सांस्कृतिक अनुबंध समजावून घेवू शकतो. काही गावातील यात्रा-जत्रा विशिष्ठ संकेताच्या आधारावर संपन्न होतात. याचाही या माध्यमातून अभ्यास होवू शकतो. सांस्कृतिक जीवन हे ज्या कृषी घटकावर आधारीत आहे, ते अनेक सण-समारंभ कृषक जीवनाचे द्योतक आहेत. त्यामुळे त्या कृषक जीवनाचा प्रभाव व सांस्कृतिक अनुबंध समजावून घेवू शकतो.

**आर्थिक घटक :**

भारतातील बहुतांश खेड्यांचे अथवा गावांचे अर्थकारण हे शेती अर्थात कृषी जीवनावर आधारीत आहे. त्या-त्या गावातील जमीन, जमिनीचे प्रकार, शेती, शेतीचे प्रकार, शेती आधारीत जोडधंदे, उद्योगधंदे, व्यापार, दळणवळण, जाती आधारीत व्यवसाय, व्यापारी जाती-जमाती इत्यादीचा अभ्यास स्थानिक इतिहास लेखनांच्या माध्यमातून गावपातळीवर केला जावू शकतो. उदा. एखाद्या गावातील एकूण कृषी क्षेत्रफळ, लागवडी खालील शेती, हंगाम, पिक पध्दती, शेतीची पध्दती, शेती उत्पादन बाजारपेठ, उत्पादन खर्च, हत्यारे, मळणी, नांगरी, कोळपणी अशा कीतीतरी अंगाने अभ्यास करून त्या गावाचे अर्थकारण समजावून घेवू शकतो. सांगोला, आटपाडी, मोडनिंब, पंढरपूर, अकलूज येथे पशु-पक्षांचा बाजार भरतो, कोटीच्या धर्तीवर आर्थिक उलाढाल होते. याचाही अभ्यास होवू शकतो. कोल्हापूर जवळील पट्टण कोडोली येथे बिरदेव यात्रेत घोंगड्याचा बाजार भरतो असे आणि कीतीतरी उदाहरणे आपणास सहज पहावयास मिळतात.

**राजकीय व प्रशासकीय जीवन :**

राजकीय व प्रशासकीय घटकामध्ये एखाद्या गावाचे देश, राज्य, जिल्हा, तालुका पातळीवरील राजकारणातील योगदान, प्रशासनातील योगदान, राजकीय घडामोडी, स्वातंत्र्य, सहकार चळवळीतील योगदान कर्तृत्ववान व्यक्ती, संस्था यांचाही अभ्यास केला जावू शकतो.

## ब) मौखिक इतिहास :

इतिहासलेखन व आधुनिक संदर्भ साधनांचे क्षेत्र अधिक विस्तारत आहे. इतिहासलेखनात नवनविन विचार प्रवाहांचा अंर्तभाव झालेला आहे. वंचितांचा इतिहास, ॲनल्स, संरचनावादी, स्थानिक, सामाजिक, सांस्कृतिक, खाद्य संस्कृतीचा इतिहास इत्यादी नवनवीन प्रकारचे इतिहासलेखन प्रवाह एकाच घटनेचे विविध अंगानी इतिहास लेखन करताना दिसतात. या नविन विचारप्रवाहांनी नव्याने ऐतिहासिक साधनांचे महत्व, चिकित्सा, विश्लेषण अथवा प्रचलित साधनांचा नव्या पध्दतीने वापर करण्यास सुरुवात केलेली आहे. यामध्ये मौखीक परंपरा आणि साधनां अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. मौखिक साधने किंवा मौखिक इतिहास म्हणजे इतिहास लेखनासाठी उपयुक्त ठरणाऱ्या व्यक्तिगत, कौटुंबिक, समूहिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि दैनंदिन जीवनातील महत्त्वपूर्ण घटनांसंबधी मौखिक स्वरूपातील माहितीचा संग्रह आणि अभ्यास होय. लिखित साधनांपेक्षा मौखिक साधनांची विश्वासार्हता कमी मानली जात असली, हे जरी खरे असले तरी जेथे लिखित साधनाचा अभाव असतो तेथे मौखिक साधने काळजीपूर्वक उपयोगात आणता येतात. मानवी समाजात काही समूहाकडे-जमातींकडे लिखित साधनांचा अभाव होता अथवा त्यांना लेखन कलेची माहिती नव्हती. त्याचप्रमाणे लेखन कलेची माहिती असून देखील काही समूहांनी आपली माहिती मौखिक परंपरेनेच पिढ्यानपिढ्या संक्रमित केली आणि पाठांतराद्वारे पिढ्यानपिढ्या त्यांचे जतन देखील केले. अशा पद्धतीने ज्ञान, स्मृति, भूतकालीन घटना, पारंपारिक कथा-गाणी, पारंपारिक कायदे यांचे ग्रहण, संवर्धन आणि संक्रमण होत राहिले. पारंपारिक कथा, दंतकथा, मिथके, म्हणी, पोवाडे, ओव्या, गाणी इत्यादींचा अंतर्भाव मौखिक परंपरेत केला जातो. मौखिक परंपरेतून मिळालेल्या माहितीची लिखित अथवा पुरातत्त्वीय साधनांशी पडताळणी करून इतिहासकार त्या माहितीचा वापर करतात. अशा पडताळणीमुळे माहितीच्या सत्यासत्यताची तपासणी करता येते.

ऐतिहासिक घटना किंवा घडलेले प्रसंग बऱ्याच वेळा लिहून ठेवलेले नसतात किंबहुना ते त्यांना शक्यही नव्हते. कारण प्राचीन काळापासून साक्षरतेचे प्रमाण अल्प होते. त्यामुळे त्या घटना किंवा प्रसंगांची नोंद झाली नाही. परंतु मौखिक साधनांच्या मधून ते प्रतिबिंबित झालेले दिसते. मौखिक परंपरेत प्रसंग किंवा घटना सारखीच असते परंतु सांगणारी व्यक्ती वेगळी असते, त्यामध्ये तो स्वत: ची भर घालून अधिक रंजकता आणण्याचा प्रयत्न करत असतो किंवा केलेला असतो. त्यामुळे घटना व प्रसंग सारखाच असतो परंतु त्यातील नावे वेगवेगळी असतात. तो प्रसंग किंवा घटना अनेक मौखिक साधनांच्या माध्यातून वर्षानुवर्षे सांगण्याचे काम चालू असते. त्यामुळे प्रसंगातील वस्तूनिष्ठता लुप्त होते. परिणामी मौखिक साधनांचा इतिहास लेखनामध्ये फारसा उपयोग होत नाही, त्याचे महत्वही राहत नाही, हे जरी खरे असले तरी अशा मौखिक साधनांच्या माध्यमातून जी माहिती प्राप्त होते अथवा त्यामधुन जो अर्थबोध होतो त्या माहितीच्या आधारे पूर्वी घडलेल्या घटनांच्या ऐतिहासिक सत्यापर्यंत जाता येते. जेव्हा एखाद्या महत्वाच्या घटनेविषयी कोणताही लिखित अस्सल पुरावा किंवा साधन उपलब्ध होत नाही तेव्हा अशा मौखिक साधनांच्या आधाराने काही अंशी त्या घटनेवर प्रकाश टाकणे शक्य होते. मौखिक साधनांच्यामधून मिळालेल्या ऐतिहासिक माहितीची तर्क संगत दृष्टीकोणातून चिकित्सा किंवा अभ्यास करून त्या संबंधीत घटनेचा उचीत अन्वयार्थ काढता येतो.

मौखिक साधनांच्या माध्यमातून परंपरागत चालत आलेल्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय इतिहासावर प्रकाश टाकण्यास मदत होते. त्याचबरोबर तत्कालीन आचार-विचार, रुढी-परंपरा, आहार-विहार इत्यादी संबंधी माहितीही मिळते.

**मौखिक इतिहासाची संकल्पना :**

ऐतिहासिक घटनांमधील साक्षीदारांकडून त्यांच्या स्मृतींवर आधारित माहिती गोळा करणे व त्यांचे विश्लेषण करणे म्हणजे मौखिक इतिहास होय. ही क्रिया एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिकपद्धतीने जात असते. असंरचित मुलाखतीच्या माध्यमातून व्यक्तीकडून एखाद्या घटनेची, कार्यक्रमाची किंवा क्रियेची माहिती गोळा करण्याची ही पद्धती होय. मौखिक इतिहास हा व्यक्तिच्या आठवणींवरती आधारित असतो. भूतकाळात घडलेल्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक या घटना व्यक्ती तिच्या आठवणींच्या आधारे एखाद्यास सांगतो व ऐकणारा त्या आठवणींच्या आधारावरून विश्लेषण करीत असतो. मौखिक इतिहासपद्धती ही ऐतिहासिक दस्तऐवजीकरणासाठी वापरात येणारी सर्वात जुनी पद्धती मानली जाते. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यात युरोपियन समाजात प्रामुख्याने अशिक्षितसर्वसामान्य समाजावरील संशोधनात मौखिक इतिहासपद्धतीचा वापर केला गेला. मौखिक इतिहासपद्धतीचा वापर ब्रिटनमधील कामगारांची परिस्थिती समजून घेण्यासाठी केला गेला. पहिल्या व दुसऱ्या जागतिक युद्धांतील साक्षीदारांकडून युद्धाच्या आठवणी जाणून घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर या पद्धतीचा वापर करण्यात आला.

मौखिक इतिहास हे एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या विधानांची, अनुभवांची आणि आठवणींची एक पद्धतशीर संकलन आहे, जे इतिहासकारांनी सादर केले आहे. एक मौखिक इतिहासकार प्राप्त केलेल्या मौखिक माहितीची तपासणी, परीक्षण आणि विश्लेषण करतो. कारण मौखिक इतिहास वैयक्तिक विधानांच्या स्मृतीवर आधारित असतात. त्यामुळे त्यात विचलन होण्याची शक्यता आहे. म्हणूनच कागदपत्रे आणि अभिलेखावर आधारित इतिहासकार त्यावर टीका करतात. त्यांच्या मते मौखिक इतिहास म्हणजे एखाद्या विशिष्ट व्यक्तीचे वैयक्तिक असते. म्हणून अशा प्रकारचा इतिहास बर्याच मर्यादित आणि अरुंद असू शकतो. मात्र हे हे पूर्ण सत्य नाही.

औद्योगिकीकरणाच्या अगोदर मौखिक परंपरा समाजांचे एक महत्त्वाचे अंग होते. जगभरात या काळात शिक्षण व तंत्रज्ञान प्रसार पाहिजे तेवढा झालेला नव्हता. इतिहासाच्या निर्मिती, संप्रेषण आणि संवर्धनात मौखिकतेची भूमिका महत्त्वपूर्ण होती. हेरोडोटस, कल्हन, इब्न बतुता, अल्बेरुनी, बर्नियर मध्याकालीन प्रवाशांचे लेखन आधुनिक इतिहासकारांच्या लेखनाचे प्रमुख साधन आहे, मात्र आपण हे लक्ष्यात ठेवले पाहिजे की यांचे लिखान मौखिक माहितीवर आधारित आहे. आपण जर फाह्यान, हूनत्संग आणि मार्को पोलो यासारख्या प्रवाशांच्या लेखनाबद्दल बोललो तर त्यांनी त्यांच्या प्रवासात भेटलेल्या सर्वसामान्य लोक, शेतकरी, व्यापारी, कलाकार, राज्यकर्ते आणि अधिकारी इत्यादींचे अनुभव जाणून घेतल्यानंतरच ते लिपीबद्ध केले आहेत, या अर्थाने जर आपण याचा विचार केला तर एक प्रकारे हा मौखिक इतिहासच आहे. या दृष्टीकोणातून पहिले तर मौखिक इतिहास आणि लेखी इतिहास परस्परांना पूरक आहेत. त्या दोघांमध्ये एक

समान धागा आढळतो. कधीकधी मौखिक इतिहास चुकीचा असू शकतो आणि लिहिलेला इतिहास चुकीचा अथवा विपरित देखील असू शकतो. उदा. प्राचीन भारताचा इतिहास लिहिण्यासाठी जर आपण वेदांचा साधन म्हणून उपयोग केला तर ते स्पष्टपणे मौखिक परंपरावर अवलंबून आहे. कारण वेद लिखित येण्यागोदर ते मौखिक होते.

युरोपीय इतिहासकार मिशलेट आणि बर्कहार्ड सारख्या इतिहासकारांच्या मते १९ व्या शतकापर्यंत इतिहासलेखनात मौखिकता महत्त्वपूर्ण होती. परंतु संस्थात्मक व्यावसायिक इतिहासकारांनी या पद्धतीला धक्का दिला कारण त्यांना कागदपत्रे महत्वाची वाटत होती एका अर्थाने ते 'no documents, no history' या विधानावर काम करत होते त्यामुळे त्यांना असे वाटत होते की मौखिक इतिहासलेखन हे कागदपत्रे अथवा दस्तऐवजांवर आधारित नाही. सन १९४८ मध्ये डॅलन नेवील व पॉल थॉमसन यांनी मौखिक इतिहासाचा वापर सुरू केला. या पद्धतीवरती पॉल थॉमसन यांनी सन १९८७ मध्ये लिहिलेले 'द वॉइस ऑफ द पास्ट-ओरल हिस्ट्री' हे अतिशय मूलभूत पुस्तक आहे. सन १९७० च्या दशकात आंतरराष्ट्रीय स्तरावर मौखिक इतिहासाला प्रोत्साहन देण्याचे काम पोल थॉम्पसनने यांनी केले. ''ब्रिटीश ओरल हिस्ट्री सोसायटी'' च्या माध्यमातून मौखिक इतिहासाला प्रोत्साहन देण्याची महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. सन १९७० च्या दशकात आंतरराष्ट्रीय स्तरावर आणखी एक महत्वाची भूमिका मायकेल फ्रिसच यांनी बजावली. त्यांच्या ''अमेरिकन स्टडीज ऑफ हिस्ट्री'' मध्ये त्यांनी असा एक प्रश्न उभा केला की, खरोखरच मौखिक इतिहासाच्या माध्यमातून जो इतिहास पुढे आलेला आहे तो खरोखरच घडला आहे किवा काय? हा प्रश्न मौखिक इतिहास जगभरातील इतिहासकारांचा आणि संस्थांचा चर्चचा विषय झाला होता

**इतिहासलेखनाची बदलती संकल्पना आणि मौखिक इतिहास :**

इतिहास म्हणजे गाडलेले मुडदे उकरून काढणे, इतिहास म्हणजे राजा आणि राणी, इतिहास म्हणजे युद्ध, इतिहास म्हणजे गतकालीन राजकारण, इतिहास म्हणजे नेत्यांची चरित्र असा एक समज सर्व सामान्याच्या मध्ये आहे. इतिहासकार 'नो डॉक्युमेंट नो हिस्टरी' या विधानावरती श्रद्धा ठेवत असल्याने ते या परीघाच्या बाहेर पाहावयास तयार नव्हते आणि नाहीत. इतिहासाचे पारंपरिक स्वरूप मर्यादित आहे. २० व्या शतकाच्या पूर्वार्धामध्ये जे-जे घडले ते-ते लिहणे अथवा पुराभिलेखागारातील कागदपत्रांच्या सहाय्याने कागदपत्रात ज्या घटनांचे प्रतिबिंब उमटले आहे त्याची मांडणी करण्याची संकल्पना रूढ होती. पुराभिलेखागारातील कागदपत्रांच्यामध्ये प्रतिबिंबीत झालेला राजे-राजवाडे, युद्ध, घटना व अभिजनवादी घटकांचा इतिहास लिहिण्याचा हा प्रकार जोमत सुरू होता. पुराभिलेखागारातील कागदपत्रांच्यामध्ये जतन करून ठेवलेला इतिहास नेमका कोणाचा इतिहास सांगतात हा प्रश्न त्याकाळातील इतिहासकारांना पडला नाही. मात्र इतिहास लेखनाचा हा पारंपरिक दृष्टीकोण आता मागे पडत आहे. इतिहास म्हणजे राजा आणि राणी असे समीकरण न राहता, इतिहास म्हणजे मानवी समाजाची सर्वांगीण कहाणी या अर्थाने 'मनुष्य' हा इतिहासलेखनाच्या केंद्रस्थानी आलेला आहे. मानवी जीवनाशी संबंधित सर्वच अंगोपांगांचा ऊहापोह आता इतिहासात आणि इतिहासलेखनात होणे अपेक्षित आहे. इतिहासातील नव-नवीन दृष्टीकोन व प्रवाहाच्यामुळे इतिहासलेखन समृद्ध बनत आहे. इतिहासातील या विविध दृष्टीकोनाच्याबरोबर इतिहासाची

आंतरविद्याशाकीय (Interdisciplinary) मांडणी होवू पाहत आहे. ॲनाल्स परंपरा इतिहासलेखनात रूढ झाल्यानंतर आंतरविद्याशाकीय मांडणी अधिक बळकट झाली. इतिहासात केवळ समग्रलक्ष्यी (Macro History) इतिहासाला महत्व नसून अंशलक्ष्यी (Micro History) इतिहासही तितकाच महत्वाचा बनला आहे. यातून 'स्थानिक इतिहासलेखन' परंपरा अथवा पद्धती विकसित झाली. स्थानिक इतिहास लेखन हे ॲनाल्स परंपरेचे फलित आहे. सद्य स्थितीत जगभरात समकालीन, स्थानिक आणि मौखिक इतिहासलेखन परंपरेला चालना मिळालेली आहे. समकालीन आणि स्थानिक इतिहास लेखनात मौखिक परंपरांची भूमिका तितकीच महत्वाची आहे.

**मौखिक इतिहासलेखन आणि संशोधन पद्धती :**

इतिहासलेखन व पुर्नलेखनासाठी अनेक प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांचा आधार घ्यावा लागतो. याशिवाय इतिहासलेखन परिपूर्ण होत नाही. प्राचीन व ऐतिहासिक घटना व व्यक्तीच्या संदर्भात संशोधन करताना काही घटना किंवा व्यक्तीच्या संबंधी-परिपूर्ण माहिती अथवा साधने उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे आशा ऐतिहासिक घटना किंवा व्यक्तीचा इतिहास लिहिताना काही वेळा पोकळी राहिलेली दिसते. राजकीय, सामाजिक, धार्मिक किंवा सांस्कृतिक इतिहास संदर्भ साधनांच्या शिवाय परिपूर्ण होवू शकत नाही. संदर्भ साधनांच्या कमतरतेमुळे निर्माण झालेली ही पोकळी भरून काढण्याचे काम मौखिक साधने काही प्रमाणात पूर्ण करतात. मौखिक साधने म्हणजे पिढ्यान-पिढ्या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिक स्वरूपात आलेले साहित्य होय. साहित्यामध्ये देखील मौखिक साहित्य नावाचा स्वतंत्र प्रकार आहे. असे साहित्य लिहिलेले नसते व त्याचा कर्ता बऱ्याच प्रसंगी अज्ञात असतो, परंतु ते पिढ्या-दर -पिढ्या मौखिक स्वरूपात परंपरेने चालत आलेले असते. यामध्ये लोककथा, दंतकथा, पुराणकथा, पोवाडे, खंडकाव्य, वीरगीते, ओव्या, जात्यावरची गाणी, म्हणी व वाक्प्रचार इत्यादी चा समावेश होतो. वास्तविक पाहता मौखिक इतिहास अथवा इतिहासलेखणाचा मुख्य उद्देश संभाषणाद्वारे एखादी घटना अथवा किंवा घटनाक्रमाचे विश्लेषण करणे किंवा त्यांचे वर्णन करणे हा आहे. या मध्ये मुख्यतःजे मुख्य प्रवाहात सामील होत नाहीत त्यांचा आवाज सामील केरून घेण्याची प्रकिया आहे. त्यांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देते. ज्यामध्ये ते आपला मुद्दा मांडू शकतात. यामध्ये त्याचा आधार म्हणजे लोकांची थेट मुलाखत. मौखिक इतिहासाने लोकांच्या वृत्ती आणि अनुभवांचा इतिहासात समावेश करून इतिहासात बदल घडवून आणले. मौखिक साधनाचे ऐतिहासिक संशोधनाच्या दृष्टीने, ढोबळ मानाने दोन प्रकार पडतात, एक मौखिक परंपरा आणि दूसरा मुलाखत. मौखिक परंपरा म्हणजे, परंपरेने, एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होणारी विभिन्न स्वरूपातील मौखिक माहिती होय, याला आपण मौखिक वाङ्ममय देखील म्हणू शकतो.

सिडनी हुक, 'द हिरो इन हिस्ट्री' या ग्रंथात मौखिक इतिहास लेखांनासंबंधी असे म्हणतात की, 'इतिहासकारांच्या दृष्टीकोणातून इतिहासाचे स्पष्टीकरण आणि कथनांपेक्षा मौखिक इतिहासाची संशोधन पद्धत अधिक क्लिष्ट आहे. मौखिक इतिहासात मुलाखत अधिक तथ्यात्मक आणि विश्लेषणात्मक असणे आवश्यक आहे. त्यांच्याकडे एखाद्या घटनेचा किंवा परिस्थितीचा प्रत्यक्ष अनुभव असावा लागतो. अशा मुलाखतींचा उपयोग युद्ध, व्यवसाय, शेती, पत्रकार, स्थलांतर, कामगार, महिला, क्रीडा, संगीत, परोपकार,

मानवाधिकार चळवळी, विज्ञान, साहित्य, नृत्य आणि परदेशी संबंध इतिहासावर प्रकाश टाकण्यासाठी केला जाऊ शकतो. इतर अनेक विषयांप्रमाणे, ऐतिहासिक परिस्थितीवर प्रकाश टाकण्यासाठी, त्याचे विश्लेषण आणि त्यांचे वर्णन करण्यासाठी मौखिक इतिहासाची स्वतःची संशोधन पद्धत आहे. हे सामूहिक गट, व्यक्ती आणि समुदायाच्या मानवी स्मरणशक्तीशी संबंधित अभ्यासाचा विषय आहे. मौखिक इतिहासावर आधारित आख्यानिक कथा सामान्य माणसाचे जीवन आणि कथा, ऐतिहासिक ज्ञानाचा एक भाग म्हणून त्यांची निराशा आणि आकांक्षा प्रस्तुत करतात. अशा प्रकारे मौखिक इतिहास सध्याच्या आणि भविष्यातील पिढ्यांसाठी एक उदयास येणारी शिस्त म्हणून व्यावहारिक उपयुक्त आहेत.'

मौखिक इतिहासाचे आणखी एक अभ्यासक रीची डोनाल्ड यांनी आपल्या 'रेकॉर्डिंग ओरल हिस्ट्री' ग्रंथात मौखिक इतिहासलेखांना संबंधी, 'सामाजिक शास्त्राच्या इतर क्षेत्रांप्रमाणे मौखिक इतिहासाची संशोधन पद्धत पद्धतशीर आणि सर्वसमावेशक आणि कथात्मक असावी लागते. मौखिक इतिहासकलेखकांचा असा विश्वास आहे की इतिहासकारांनी दिलेल्या व्याख्या आणि कथनांपेक्षा त्यांचा इतिहासातील अनुभव अधिक जटिल आहे. एखाद्या ऐतिहासिक घटनेशी संबंधित मुलाखतीद्वारे क्वचितच ऐतिहासिक पुरावे मिळू शकतात. परंतु, कधीकधी अशा घटनेत इतिहासाच्या कोणत्याही शाखांविषयीच्या आपल्या कल्पनांमध्ये बदल घडण्याची क्षमता असते' असे रीची यांनी नमूद केले आहे. मौखिक इतिहासामध्ये आंतरिक टीका, बाह्य टीका, निर्णयाचे मूल्य कमी करणे आणि सामान्यीकरण यासारख्या वैज्ञानिक इतिहासाच्या लेखनासाठी अंगीकृत संशोधन पद्धती स्वीकारली जाऊ शकते. मौखिक इतिहासाची वर्गवारी आणि वैचारिक बांधिलकी देखील आहे. त्याचे निर्मूलन ही एक कठीण प्रक्रिया आहे. हे मुख्यत: सामाजिक विज्ञान म्हणून इतिहासाच्या वाढीमुळे होते. सामाजिक विज्ञान म्हणून ते केवळ एक तथ्यात्मक कथनच नाही तर तथ्यांचे वैज्ञानिक स्पष्टीकरण देखील आहे.

**समकालीन इतिहास लेखन आणि मौखिकता (मुलाखत)**

समकालीन इतिहास लेखनासाठी अत्यंत उपयुक्त तंत्र म्हणून मुलाखत पद्धतीचा वापर केला जातो. व्यक्तीगत अथवा सामूहिक पद्धतीने मुलाखत घेवून इतिहासकार त्याचा उपयोग समकालीन इतिहास लेखनासाठी करू शकतो. स्वातंत्र्योत्तर भारतात एकाच कळात नागरी क्रांती, औद्योगिक क्रांती, हरितक्रांती, धवलक्रांती, लोकशाही सशक्तीकरण, राजकीय स्थरीकरण आणि अभिसरण, सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक बदल मोठ्या प्रमाणात झालेले आहेत. मात्र ह्या मूलभूत स्थित्यंतरांचा राष्ट्र, प्रदेश, जात, वर्ग, लिंग आणि आर्थिक दृष्टीकोणातून इतिहास व विश्लेषणात्मक दृष्टीकोणातून लिखाण करणे हे महत्त्वाचे आहे. स्वतंत्र भारतातील जातिव्यवस्थेवर साहित्यिक अथवा राजकीय उद्देशाने लिहीलेले शेकडो ग्रंथ पहावयास मिळतात, मात्र काही अपवाद वगळता स्वातंत्र्योत्तर काळातील भारतातील जातीव्यवस्थेचे विश्लेषण करणारा अथवा उत्क्रांती अभ्यासणारा इतिहास लिहीला गेला नाही. त्यासाठी समकालीन इतिहास लेखन गरजेचे आहे, आणि ते मौखिक (मुलाखत) साधनाच्या माध्यमातून सहज शक्य आहे.

समकालीन इतिहास संशोधकाला पारंपारिक साधनांच्याबरोबर अपारंपारिक संदर्भ साधनाचा मोठ्या प्रमाणावर आपल्या लेखनासाठी वापर करून घेवू शकतो. विशेषत: मौखिक इतिहास, कारण समकालीन इतिहासल लेखकाला फक्त लिखित पुराव्यावर भिस्त ठेवून चालत नाही, त्यासाठी मौखिक हा पर्याय राहतो. ज्या घटनांच्या, व्यक्तीच्या, समूहाचा इतिहास लिखित स्वरूपात मागे राहिलेला नाही किंवा जे घटक समूह शांतच राहिले. त्यांच्या इतिहासाची पुर्नप्राप्ती करण्याचे मौखिक साधन हे उत्तम आहे मात्र मौखिक इतिहासाच्या मर्यादा व धोके लक्षात घेऊन त्याचा सावध उपयोग करणे गरजेचे ठरते. या संबंधी बॅलार्ड यांनी आपल्या 'न्यू मुमेंट्स इन द स्टडी अँड टिचिंग ऑफ हिस्ट्री' या ग्रंथात 'मौखिक इतिहास लेखनपद्धतीत मुलाखत अधिक तथ्यात्मक आणि विश्लेषणात्मक असणे आवश्यक आहे. त्यांच्याकडे एखाद्या घटनेचा किंवा परिस्थितीचा प्रत्यक्ष अनुभव असणे आवश्यक आहे. खरं तर त्यांच्या मुलाखतींचा उपयोग युद्ध, व्यवसाय, शेती, पत्रकारिता, लोकसमूहांचे स्थलांतर, कामगार, महिला, क्रीडा, संगीत, परोपकार, मानवाधिकार चळवळी, विज्ञान, साहित्य, नृत्य आणि परदेशी संबंध इतिहासावर प्रकाश टाकण्यासाठी केला जाऊ शकतो. भूतकाळातील मौल्यवान माहिती मौखिक साधनांच्या माध्यमातून पुन्हा जमा केली जावू शकते.

मौखिक इतिहासाचा वापर समकालीन इतिहासकाराने खुबीने आणि आंतरविद्याशाखीय दुवा वापरून करणे गरजेचे आहे. नूतन इतिहासायाचेविषय उदाहरणार्थ सबाल्टर्न (वंचित) अथवा स्त्रीवादी इतिहासलेखनासाठी ऐतिहासिक साधने प्राप्त होणे अवघड. इतिहासकार कोणतीही 'आवाज नसलेल्या' (Voiceless) तळागाळातील लोकांच्या किंवा सामान्य स्त्रियांचा इतिहास लिहू शकत नाही. अशा परिस्थितीत समकालीन इतिहासकारांनी ह्या लोकांच्या मौखिक इतिहासाच्या शास्त्रानुसार मुलाखती घेऊन त्या टंकलिखित करून त्यांचे एक साधन म्हणून वापर करणे व साधन तयार करणे क्रमप्राप्त होते, असे केल्यास भविष्यकाळातील इतिहासकारांना एक मौलिक ऐतिहासिक साधन मिळण्याची शक्यता निर्माण होते. घटना किंवा परिस्थितीबद्दल चांगली स्मरणशक्ती किंवा ज्ञान सर्वच व्यक्तींची मुलाखत घेणे शक्य नाही. काही प्रातिनिधिक स्वरुपात घटनेत प्रत्यक्ष सहभागी, स्वतच्या डोळ्यांनी एखादी घटना पहिली असलयास, प्रवर्तक आणि वैचारिक मांडणी केलेल्या व्यक्तींची निवड महत्वाची असते. मात्र अशा व्यक्तींच्या अनुपस्थितीत, परंपरा, वारसा किंवा प्रथा कायम ठेवणार्या समुदायाची स्मृतीची  निश्चित मदत घेतली जावू शकते.

**आठवण, स्मृती आणि मौखिक इतिहास :**

मौखिक इतिहासाचा वापर सन १९८० मध्ये 'इतिहास' व 'आठवणी' यांच्या सहसंबंधातील उदयामुळे मोठ्या प्रमाणावर होऊ लागला. आठवण ही मौखिक इतिहासाचा खूप मोठा आधार आहे. आठवण ही सामाजिक उत्पादनाचे प्रभावी साधन मानता येत; कारण आठवणीतून दैनंदिन जीवनातील भूतकाळ व वर्तमानकाळ यांना जोडणारे ज्ञान तयार होत असते. मौखिक इतिहासपद्धतीमुळे दुर्लक्षित घटकांची जाणीव, संवेदना समजून घेण्यास मदत होते. मौखिक इतिहास हा सत्ताधारी घटकाकडून न येता, तो थेट भोगलेल्या व्यक्तिच्या तोंडून बाहेर येत असतो. ग्लक यांच्या मते, 'ज्या स्त्रियांनी औपचारिक शिक्षण घेतले नाही किंवा ज्या स्त्रियांना संवाद साधण्यास जमत नाही, अशा स्त्रियांची माहिती घेण्यासाठी व त्यांना सशक्त बनविण्यासाठी मौखिक इतिहास महत्त्वाचे साधन आहे.

इतिहास जेवढा ग्रंथांच्यामध्ये आहे तेवढेच इतिहासाच्या बाहेर सुद्धा आहे? जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या आठवणी जगतात आणि ज्या कोठेही नोंदवल्या गेलेल्या नसतात. एखाद्या व्यक्तीने एखाद्या घटनेची आठवण कशी जगावावी हे त्याचे स्वत:चेच वर्णन असते, की जे दुसर्यापेक्षा पूर्णपणे भिन्न असते. विस्थापित, शोषित, पिडीत, बलात्कार अथवा पुनर्वसित यांचे स्वत:चे अनुभव असतात. सार्वजनिक आठवणींमध्ये नोंदलेल्या अशा घटनांकडे दुर्लक्ष करून कोणत्याही जाती, समाज किंवा राष्ट्राचा संपूर्ण इतिहास आपण जाणू शकतो का, यात मला शंका आहे. आठवणी कोण, काय, कोण आणि कसे संग्रहित करतात यावर बरेच काही अवलंबून आहे. असे असूनही, एखाद्या वांशिक गट किंवा व्यक्तीस एखाद्या घटनेची आठवण कशी होते, कोणाकडे, ज्याच्या समोर ती सांगितली जाते, मुख्य घटनेबद्दल किंवा तिच्या कोणत्याही उप-घटनेबद्दल त्याचा-त्याचा दृष्टिकोन काय आहे, हे ऐतिहासिक तथ्यांशी समांतर होते की नव्हते याचे उत्तम ज्ञात असले पाहिजे.

वैयक्तिक आठवण आणि स्मृती मौखिक इतिहासाची महत्त्वपूर्ण बाजू आहेत. मुलाखत घेणार्याला तांत्रिक कौशल्य आणि अनुभव आवश्यक असतो. मुलाखत घेणार्या व्यक्तीकडून काय शोधायचे आहे आणि काय काढायचे आहे याविषयी माहिती असणे आवश्यक आहे. प्रश्नांचा संबंध परस्पर संबंधित क्षेत्रावर केंद्रीत असला पाहिजे. जेणे करून अधिक अंतरदृष्टीने समश्येवर प्रकाश टाकता येईल. मौखिक इतिहासकार त्यासाठी व्यावसायिकदृष्ट्या सुसज्ज आणि अनुभवी असणे गरजेचे असते. ऐतिहासिक घटनेच्या कोणत्याही पैलूवर त्यांचे प्राथमिक ज्ञान असणे आवश्यक आहे. या संबधी बर्खहार्ड, आपल्या 'जजमेंट्स इन हिस्ट्री अँड हिस्टोरीन्स' या ग्रंथात म्हणतो की, मौखिक इतिहास केवळ स्मृतीवर आधारित आहे. म्हणून मुलाखत घेणार्याने घटनेची किंवा प्रथेची चांगली स्मरणशक्ती ठेवली पाहिजे. घटनेची तारीख किंवा तपशील कदाचित बरोबर असू शकत नाहीत आणि त्या तपासण्यासाठी किंवा अस्सल लिखित स्त्रोतांद्वारे तपासले जाणे आवश्यक आहे. मुलाखत किंवा त्याच्या आत्मचरित्राची कोणतीही घटनेची नोंद अथवा डायरी देखील त्याच्या कथनात किंवा अनुभवासाठी पूरक म्हणून वापरली जाऊ शकते. अशा परिस्थितीत मुलाखतदारास मुलाखती घेणार्या उपक्रम, योगदान आणि सहभागाची चांगली माहिती असणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, संगीतकार आणि साहित्य यासारख्या क्षेत्रांवर सामाजिक कार्यकर्त्याकडून माहिती गोळा करण्याचा अर्थ नाही, जोपर्यंत तो त्या क्षेत्रांमध्ये काम करणारे आणि प्रत्यक्षय अनुभवी असत नाहीत तो पर्यन्त त्याला काही अर्थ उरत नाही. आठवण, स्मृती आणि मौखिक इतिहास या संदर्भात आपण 'द सीन्स वुइ मेड- ॲन ओरल हिस्टरी ऑफ एक्स्पेरिमेंटल थिएटर इन मुंबई' हे शांता गोखले यांच्या ग्रंथाचे एक उत्तम उदाहरण म्हणून देवू शकतो. याशिवाय आपण नेहरू स्मारक संग्रहालयाने सन १९६६ मध्ये जी मौखिक इतिहासाचा प्रकल्प सुरू केला त्याचाही उल्लेख विशेषकरून करावा लागेल. या मध्ये त्यांनी १३५१ विविध महत्व पूर्ण व्यक्तीच्या मुलखीत घेवून त्याचे या पैकी ८८२ प्रतिलेख नेहरू स्मारक संग्रहालयाच्या वाचनालयात उपलब्ध आहेत.

मौखिक इतिहास अनुभवाच्या अधिक व्यक्तिपरक पैलू प्रकट करतो. आयुष्याचा दीर्घ अनुभव असलेला एखादा माणूस म्हणजे त्याच्या जीवनातील अनुभवांमधील एक महत्त्वाचा स्त्रोत सामग्री किंवा मौल्यवान दस्तऐवज. त्याचे जतन केवळ मौखिक इतिहासाद्वारे शक्य आहे. मौखिक इतिहासाच्या रूपातील असे

अनुभव मौखिक इतिहासाच्या योग्य संग्रहात जतन केले जाणे आवश्यक आहे. त्यांची सामग्री, नाव, व्यवसाय, कालावधी आणि महत्त्व यासारख्या तपशीलांसह दस्तऐवजीकरण केले जाऊ शकते. दुर्दैवाने, भारतीय आणि सरकारी संस्था अशा दोन्ही संस्थांना मौखिक इतिहास अभिलेखाचे किंवा अशा प्रकल्पांचे उपनगरीय गट किंवा उपेक्षित विभागांचा इतिहास नोंदविण्याचे महत्त्व कळले नाही. मौखिक इतिहास एखाद्या रस्त्याच्या इतिहासातील लोकांना मदत करतात.

**प्रादेशिक, स्थानिक इतिहास आणि मौखिकता :**

प्रादेशिक किंवा स्थानिक इतिहासामध्ये कुटुंबांची भूमिका प्रमुख आहे. कौटुंबिक इतिहासाचे लेखन ही प्रादेशिक किंवा स्थानिक इतिहासाच्या पुनर्रचनेची एक परिपूर्ण आवश्यकता आहे. दुर्दैवाने आपल्या शैक्षणिक कामांमध्ये असा नवीन प्रवाह समोर आला नाही. मौखिक परंपरा आणि व्यक्तींच्या स्मृती अशा लिखाणांसाठी सिंहाचा वाटा पुरवतात. या दिशानिर्देशातील मुलाखती स्थलांतर, शेती, उद्योग, संस्कृती आणि कौटुंबिक प्रणालीशी संबंधित मुद्यांना उजाळा देऊ शकतात. सेटलमेंट पॅटर्न, परस्परावलंबन, सामाजिक संबंध, विवाह संबंध कौटुंबिक इतिहासात आढळू शकतात. येथे तथ्यात्मक कथन आणि स्मरणशक्तीच्या आधारे माहिती एकत्रित केली जाऊ शकते. महिला मुलाखतदारांना कौटुंबिक रीतिरिवाज, कौटुंबिक संसाधनांचा वापर, स्थानिक भांडणे आणि संघर्ष यासंबंधी अधिक तपशीलवार माहिती प्रदान करण्यात मदत होईल. स्थानिक कार्यक्रम राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींशी कसे जोडले जातात हे सामान्य लोक शिकतात. ऐतिहासिक चौकशीच्या प्रकाराबद्दल लोकांशी संवाद साधण्याची ही संधी आहे. समाज किंवा आदिवासी गट किंवा उपेक्षित विभाग यांच्या एकत्रित स्मृती मौखिक इतिहासकारांनी त्यांचे प्रथा, शिष्टाचार, विधी आणि सामान्य अनुभव प्रकाशात आणण्यासाठी अथवा करण्यासाठी नोंदवल्या जाऊ शकतात. येथे, पुरुष किंवा स्त्रिया किंवा आदिवासी किंवा स्थलांतरितांचा विशिष्ट गट त्यांचे सामान्य अनुभव सार्वजनिक करू शकतात. कोणतीही अतिशयोक्ती किंवा अनुमानानुसार अथवा अतिअंदाजीत असल्यास त्या समुहा अथवा गटांकडूनच दुरुस्त होण्याची शक्यता आहे. समुदायाची स्मरणशक्ती किंवा सामूहिक स्मरणशक्ती निश्चित करण्यासाठी एकत्रित मुलाखतीचा किंवा समुदायाचा मुलाखत घेण्याचा दृष्टीकोन म्हणजे एखाद्या विशिष्ट सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीत त्यांच्या अनुभवांशी संबंधित असलेल्या एखाद्या समुदायाचा किंवा आदिवासींच्या मौखिक इतिहासाचा मागोवा घेण्यासाठी योग्य पद्धत आहे. मौखिक इतिहासाद्वारे, भूतकाळाच्या तथ्यांचे संपूर्ण विश्लेषण करण्यासाठी, संस्कृतीचे मौखिक रूप आणि ज्ञान पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जातो, अनेक अर्थाने मौखिक इतिहास अनेक समाजांच्या भूतकाळच्या पुनर्रचनेत अत्यंत महत्वाची भूमिका बजावतो.

**मौखिक इतिहासाचे भारतीय परिप्रेक्ष्यातून संशोधन :**

पाश्चात्त्य देशात आंतर्विद्याशाखीय अभ्यास प्रगतावस्थेस पोहचलेले आहेत. मौखिकतेसंबंधीचा विचार प्रथम त्यांच्याकडे मांडला गेला. मिलमन पॅरी यांचे होमरविषयक संशोधन, आल्बर्ट लॉर्ड यांचे 'द सिंगर ऑफ टेल्स', रूथ फिनेगन यांचा 'ओरल पोएट्रीः इटस् नेचर, सिग्निफिकन्स ॲण्ड सोशल कॉन्टेक्स्ट', वॉल्टर

आँग यांचा 'ओरॅलिटी ॲण्ड लिटरसी' हे ग्रंथ महत्वाचे आहेत. भारतीय मौखिक साहित्य आणि साधंनांचा शोध घ्यायला इंग्रजानी सुरुवात केली. इंग्रजांनी वसाहतींवादा संबंधी जे धोरण स्वीकारले होते त्यानुसार ज्या ठिकाणी राज्य करावयाचे तेथील लोक लोकजीवन, भूतकाळ, वाङ्ममय, चालीरीती, प्रथा, परंपरा, आचार, विचार, समजुती यांची बारकाई अभ्यास करण्यास प्रारंभ केला, त्यांच्या राजकीय धोरणाचा तो एक महत्त्वाचा भाग होता. येथील लोकसंस्कृतीचा परिचय करून घेण्याचा एक मार्ग म्हणून त्यांनी येथी समाजजीवन, धर्मजीवन, सांस्कृतिक जीवन यांचे अवलोकन करण्यास सुरुवात केली. मौखिक वाङ्मयाचाही त्यांनी अभ्यास करण्यास सुरवात केली. विल्यम् जोन्स यांच्या प्रेरणेने आणि प्रयत्नाने 'एशियाटिक सोसायटी ऑफ बंगाल' या संस्थेची कलकत्ता येथे सन १८७४ मध्ये स्थापना करण्यात आली. या संस्थेनेच प्रथम लोकसाहित्याच्या संशोधन आणि संकलनास सुरुवात केली. भारतातील इंग्रज अधिकारी आणि ख्रिस्ती धर्मोपदेशक यांचे भारतीय लोकसंस्कृती विषयक कुतुहल जागे झाले आणि ते भारतीय लोकसाहित्याच्या अभ्यासाकडे वळले. कर्नल टॉड हे राजस्थानचे रेसिडेंट असताना राजस्थानी लोकसंस्कृती आणि लोकसाहित्याचा त्यांनी अभ्यास केला. राजस्थानी मौखिक वाङ्मयातील कथा-गीते आणि पोवाडे त्यांना मिळाले. सन १८२९ मध्ये कर्नल टॉड यांनी या अभ्यासाला प्रारंभ केला आणि 'एनल्स ॲण्ड एंटिक्विटिझ ऑफ राजस्थान' हा मौलिक ग्रंथ साकार केला. सन १८५४ मध्ये रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुखपत्रातून जे. एलट यांनी 'पंजाबची वीरगाथा' हा लेख लिहिला आणि पंजाबी लोकजीवनात प्रचलित असलेल्या पराक्रमाची गाथा शब्दरूप केली. प्रो. व्हीस डेव्हिड्स यांनी 'द बुद्धिस्ट स्टोरीज' हे देखील यातील उत्तम उदाहरण आहे.

मेरी फ्रिअरचे 'ओल्ड डेक्कन डेज' (१८६८), चार्ल्स ग्रोवरने 'दक्षिण भारतातील लोकगीते' (१८७१), डॉल्टनचे 'डिस्क्रिप्टीव्ह एन्थोलॉजी ऑफ बंगाल' (१८७२), तारादत्त यांचे 'हिंदुस्थानातील पोवाडे आणि दंतकथा' (१८८२), लाल लालबिहारी डे यांनी लिहिलेले 'बंगालच्या लोककथा' (फोकटेल्स ऑफ बंगाल) (१८८३), सर रिचर्ड कारनॅक टेंपल यांचे 'पंजाबच्या लोककथा', (लीजंड ऑफ द पंजाब) (१८८४), इ. जे. रोबिन्सन यांचे 'दक्षिण भारतातील लोकगीते व लोककथा' (१८८५), ग्रियर्सन यांनी लिहिलेला 'भोजपुरी गीते' (१८८६), कुक यांनी लिहिलेला 'पॉप्युलर रिलिजन ॲन्ड फोक लोअर ऑफ नॉर्दन इंडिया' (१८९६), थर्स्टन याचे 'ओमेन्स ॲण्ड सुपरस्टिशन्स ऑफ सदर्न इंडिया' आणि 'कास्टस् ॲण्ड ट्राइब्ज ऑफ सदर्न इंडिया' इत्यादी ग्रंथ भारतीय मौखिक आणि लोक साहित्याच्या दृष्टीकोणातून मौलिक स्वरूपाचे आहेत. मराठी लोकसाहित्याच्या अभ्यासाचा जाणीवपूर्वक प्रयत्न वि. का. राजवाडे यांनी केला. सन १९२५ मध्ये त्यांनी 'सज्जनगडावरील लोकगीत' आणि 'सूर्यनारायणची कहाणी व सूर्यव्रत' या शीर्षकाने 'आदित्य राणुबाईची कहाणी' हस्तलिखितवरून असे दोन लेख प्रकाशित केले प्रकाशित केली. डी. डी. कोसंबी यांचे 'मिथ अँड रियलिटी' शं. गो. दाते यांनी 'लोककथा' (१९३०), दुर्गा भागवत यांनी 'सातपुड्यातील गोंड जमातीची लोकगीत' (१९५०), इत्यादी भारतीय अभ्यासकांनी या संबंधी महत्वपूर्ण काम केले आहे. याच बरोबर भारतीय हिन्दी लेखकांनी भारतीय मौखिक आणि लोकसाहित्याच्या अभ्यासाला प्रारंभ केला. डॉ. दिनेशचंद्र सेन, रायबहादूर शरचंद्रराय, रामन त्रिपाठी, देवेंद्र सत्यार्थी वगैरेंचा प्रामुख्यणे उल्लेख होतो.

**मौखिक परंपरेचे धोके**

युरोपमधील बर्याच पत्रकारांनी आणि इतिहासकारांनी समकालीन इतिहासलेखनात साहित्य म्हणून अशी अनेक पुस्तके दिली आहेत ज्यामुळे आपल्याला इतिहास पुन्हा समजण्यास भाग पाडले आहे. इतिहासाची मौखिक परंपरा दीर्घकाळ टिकणारी आहे, परंतु ती कधीतरी नोंदविली जाणे देखील आवश्यक आहे. अशा स्त्रोतांचा धोका देखील कमी नाही, कारण बर्याच वेळा लोक आपल्या समुदायाचा अभिमान बाळगण्यास अतिशयोक्तीही करतात. पण त्यात सत्याचा काही अंश नक्कीच आहे. हा तुकड्याची चाळण करून तो समोर आणण्याची जबाबदारी इतिहासकारांची आहे.

**स्वयंअध्ययन प्रश्न क्र. ३**

अ) योग्य पर्याय निवडा.

१) यांनी 'स्थानिक इतिहास' (Local History) ऐवजी 'स्थानीय इतिहास' (Localised History) असा मराठी शब्दप्रयोग कोणी केलेला आहे.

अ) डॉ. अरुण टिकेकर ब) राजा दिक्षित

क) ना. गो. चापेकर ड) वि. का. राजवाडे

२) स्थानिक इतिहास लेखन संकल्पनेचा उदय कोणत्या देशात झाला.

अ) इटली ब) फ्रान्स क) इंग्लंड ड) अमेरिका

३) मुंबईचे वर्णन' हा ग्रंथ कोणी लिहिला आहे.

अ) डॉ. अरुण टिकेकर ब) गोविंद माडगावकर

क) ना. गो. चापेकर ड) ना. वी. जोशी

४) मिथ अँड रियलिटी हा ग्रंथ कोणी लिहिला आहे.

अ) डी. डी. कोसंबी ब) राजा दिक्षित

क) डॉ. दिनेशचंद्र सेन ड) रामन त्रिपाठी

५) सातपुड्यातील गोंड जमातीची लोकगीत हा ग्रंथ कोणी लिहिला आहे.

अ) दुर्गा भागवत ब) ताराचंद क) शं. गो. दाते ड) यापैकी नाही

ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) जागृत सातारा हे पुस्तक कोणी लिहिले आहे.

२) प्रादेशिक इतिहास ही संकल्पना कोणत्या शकत उदयास आली.

३) 'द वॉइस ऑफ द पास्ट-ओरल हिस्ट्री हा ग्रंथ कोणी लिहिला आहे.

४) सिडनी हुक यांनी कोणता ग्रंथ लिहिला आहे.

५) ओल्ड डेक्कन डेज हा ग्रंथ कोणी लिहिला आहे.

## २.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

पुनरुज्जीवन काळ: रिव्हाइव्ह लॅटिन मुळापासून आला आहे re म्हणजे पुन्हा आणि vivere म्हणजे जगणे. तर, पुनरुज्जीवित शब्दाचा अर्थ ''पुन्हा जगणे'' असा होतो.

सूक्ष्म : सूक्ष्म घटक अथवा भाग अथवा प्रसंग अथवा घटना.

अभिजन : उच्च स्थानावरील लोक अथवा श्रेष्ठ (सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय.)

सबाल्टर्न : वंचित, तळागाळातील व्यक्ती अथवा समूह.

मौखिक : पाठांतराच्या माध्यमातून परंपरेने चालत आलेले.

मुलाखत : तोंडी पद्धतीने माहिती प्राप्त करण्याचे तंत्र.

सर्वेक्षण : समस्येचे शास्त्रशुद्ध पद्धतीने केलेले परीक्षण.

## २.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयं-अध्ययन प्रश्न क्र. १ ची उत्तरे

अ) योग्य पर्याय निवडा.

१) अ) झियाउद्दीन सरदार    २) ब) जेकब बर्कहार्ड

३) अ) क्लिफर्ड गिर्ट्झ    ४) अ) अमेरिका

५) अ) १९७२

ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) क्लिफर्ड गिर्ट्झ    २) जर्गेन हॅबरमास    ३) डोनाल्ड वर्स्टर

४) आल्फ्रेड क्रॉस्बी    ५) डॉ. माधव गाडगीळ व डॉ. रामचंद्र गुहा

स्वयंअध्ययन प्रश्न क्र. २

अ) योग्य पर्याय निवडा.

१) अ) रणजित गुहा    २) अ) कार्लो गिंझबर्ग    ३) अ) इटली

४) अ) ग्रीक    ५) अ)

ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) कार्लो गिंझबर्ग    २) अंतोनियो ग्रामची    ३) रोबर्ट डार्नटन

४) हरमन हीमपेल    ५) गिओफ्री बाराक्लोव

स्वयंअध्ययन प्रश्न क्र. ३

अ) योग्य पर्याय निवडा.

१) अ) डॉ. अरुण टिकेकर

२) अ) इटली

३) ब) गोविंद माडगावकर

४) अ) डी. डी. कोसंबी

५) अ) दुर्गा भागवत

ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) पु. पा. गोखले

२) २० वे शतक

३) पॉल थॉमसन

४) द हिरो इन हिस्ट्री

५) मेरी फ्रिअर

## २.५ सारांश

सांस्कृतिक इतिहास; भौतिकवादी अर्थशास्त्र, तसेच, राजकीय अर्थशास्त्राचे वैश्विक दावे स्पष्टपणे नाकारतो. वस्तुनिष्ठतेचा अट्टाहास नाकारुन; इतिहासाच्या पुनर्बांधणीमध्ये कल्पनेलाही महत्व देतो. स्पष्टीकरणापेक्षा; अन्वयार्थांना महत्व देतो. गीझ आणि टायलरच्या मते अन्वयार्थावर भर देणारी सामाजिक शास्त्रे आवश्यक आहेत. यामध्ये कार्यकारणभाव आणि स्पष्टीकरणापेक्षा, 'आकलनाला' महत्वाचे स्थान असेल. अर्थात, अशा दाव्यांमध्ये व्यक्तीनिष्ठेचा किंवा सापेक्षतेचा दोष दिसून येतो. पण, वैश्विक सिध्दांताच्या आधारे, छोट्या-छोट्या संस्कृतींचा अर्थ लावण्यापेक्षा; त्या संस्कृतींच्या परिप्रेक्ष्यात, त्यांचे चिकित्सक आकलन महत्वाचे ठरते आहे. अशा प्रकारे, संस्कृतीच्या युरोपियन श्रेष्ठत्वाच्या व्याख्येपासून प्रारंभ होऊन, आता, संस्कृतीची व्यापक कल्पना पुढे आलेली आहे. तसेच फक्त कला-साहित्यच नव्हे तर यामध्ये, सर्व स्तरांतील समाजाची, सर्व स्तरातील वर्तन/अभिव्यक्ती महत्वाची बनलेली आहे. भव्यदिव्य सिध्दांतापेक्षा, मर्यादित स्थळ/अवकाशातील समाजांचा 'समग्र अभ्यास' हा केंद्रस्थानी येऊ लागलेला आहे.

इतिहासाचे पारंपरिक स्वरूप मर्यादित आहे. मात्र इतिहास लेखनाचा हा पारंपरिक दृष्टीकोण आता मागे पडत आहे. इतिहास म्हणजे राजा आणि राणी असे समीकरण न राहता इतिहास म्हणजे मानवी समाजाची सर्वांगीण कहाणी या अर्थाने 'मनुष्य' हा इतिहासलेखनाच्या केंद्रस्थानी आलेला आहे. मानवी जीवनाशी संबंधित सर्वच अंगोपांगांचा ऊहापोह आता इतिहासात आणि इतिहासलेखनात होणे अपेक्षित आहे. इतिहासातील नव-नवीन दृष्टीकोन व प्रवाहाच्यामुळे इतिहासलेखन समृद्ध बनत आहे. इतिहासातील या विविध दृष्टीकोनाच्याबरोबर इतिहासाची आंतरविद्याशाकीय मांडणी होवू पाहत आहे. इतिहासात केवळ समग्रलक्ष्यी इतिहासाला महत्व नसून अंशलक्ष्यी इतिहासही तितकाच महत्वाचा बनला आहे. त्याचबरोबर सध्यस्थितीत स्थानिक पातळीवरील दुर्लक्षित व वंचित घटकाचा सर्वांगीण अभ्यास होण्याची संधी नव संशोधकांना संशोधनासाठी उपलब्ध झाला आहे. स्थानिक इतिहासकारांनी मौखिक साधनांचा उपयोग लेखी साधनांनी देलेल्या माहितीची खात्री करण्यासाठी करावा आणि लेखी साधनांचा उपयोग मौखिक साधनांची

विश्वासार्हता तपासण्यासाठी करावा. मौखिक साधनांचा वापर इतिहासकारांना लोकांच्या भावना आणि माणुसकी याबद्दलची जाणीव देतो. तत्कालीन लोकांच्या प्रेरणा, प्रवृत्ती, स्वप्ने समजून घ्यायची असतील तर आपल्याला त्यांच्या मुलाखती आणि मौखिक परंपरा समजून घेणे आवश्यक ठरते.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) टिपा लिहा:

१) स्थानिक इतिहासलेखनाची संकल्पना

२) स्थानिक इतिहास लेखनातील महत्त्वाचे पैलू/घटक

३) मौखिक इतिहासाचे महत्व

४) मौखिक इतिहासाचे भारतातील संशोधन

५) सर्वेक्षण पद्धतीच्या मर्यादा

६) मुलाखत तंत्राची वैशिष्ट्ये

७) पर्यावरणीय इतिहास म्हणजे काय

ब) खालील प्रश्नांची सविस्तर चर्चा करा.

१) स्थानिक इतिहासलेखनाची सविस्तर चर्चा करा.

२) मौखिक इतिहासलेखन आणि संशोधन पद्धतीची चर्चा करा.

३) पर्यावरणीय इतिहासाचे महत्त्व सांगा.

४) पर्यावरणवादी इतिहासातील विविध दृष्टीकोनांचा आढावा घ्या.

५) सांस्कृतिक इतिहासलेखन आणि संशोधन पद्धतीची चर्चा करा.

६) सूक्ष्म इतिहासलेखन आणि संशोधन पद्धतीची चर्चा करा.

७) समकालीन इतिहासलेखन आणि संशोधन पद्धतीची चचा करा.

## २.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठी पुस्तके


१) नाडगोडे, गुरुनाथ., सामाजिक संशोधन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८६.

२) कुंभोजकर, ग. वि., संशोधन पद्धती व संख्याशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८९.

३) कोठेकर, शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, नागपूर, २००५

४) वांबूरकर, जास्वंदी., (संपा.) इतिहासातील नवे प्रवाह, डायमंड प्रकाशन

५) टिकेकर, अरुण., (संपा.) शहर पुणे: एका सांस्कृतिक संचिताचा मागोवा, खंड पहिला, निळुभाऊ लिमये फौडेशन, पुणे, २०००

६) दिक्षित, राजा., इतिहास वाङ:मय, संपादक जाधव, र. ग., मराठी वाङ:मयाचा इतिहास, खंड, ७, भाग तीन, पुणे २०१०

७) विद्या, व्यवहारे, लोकसाहित्य आणि लोक संस्कृती, प्रतिमा प्रकाशन, २००२

८) ढेरे, रा. चि., लोकसाहित्य: शोध आणि समीक्षा, पद्मगंधा प्रकाशन, पुणे २००९

९) खोले, विलास, मराठीतील मौखिक साहित्याचे संकलन, मौखिता आणि लोकसाहित्य (संपा.) वाकोडे मधुकर, करोगल सुषमा, साहित्य अकादमी, २००८

१०) पाटील, अवनीश, स्थानिक इतिहास संशोधांनाची सहाय्यक पद्धती, भारतातील स्थानिक इतिहास आणि सांस्कृतिक ओळख, नदाफ, हाजी., (संपा.) ज्ञानजोत प्रकाशन, कोल्हापूर, २०२०

११) भांडारकर, पु. ल., सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, १९७६.

१२) पाटील अवनीश : 'ब्रिटीशकालीन पर्यावरणविषयक इतिहासलेखन त्यातील काही प्रश्न', 'संशोधन पत्रिका', शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद, इतिहास विभाग, कोल्हापूर, फेब्रु. २०१०, पृ.१६८-१७५

१३) Guha Ramachandra : 'Environmentalism: A Global History', Delhi: Penguin Books, India, 2014

१४) Gadgil Madhav and Guha Ramachandra: "This Fissured Land: An Ecological History of India', Oxford University Press, 1992.

❑❑❑